रजिस्ट्री सं. डी. 221

# भारत का राजपत्र
# The Gazette of India
# भारताचे राजपत्र

असाधारण
EXTRAORDINARY
असाधारण

भाग 12 अनुभाग 1
Part XII Section 1
भाग बारा अनुभाग 1

प्राधिकार से प्रकाशित
PUBLISHED BY AUTHORITY
प्राधिकारद्वारे प्रकाशित


सं. 1] नई दिल्ली, 22 दिसम्बर, 2005/1 पौष (शक) 1927 [खण्ड 14

No. 1] NEW DELHI, 22nd December 2005/1 Pausa (SAKA) 1927 [Vol. 14

अंक १] नवी दिल्ली, २२ डिसेंबर २००५/१ पौष (शके) १९२७ [खंड १४


स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

विधि और न्याय मंत्रालय

(विधायी विभाग)

नई दिल्ली, दिनांक 22 दिसम्बर 2005/1 पौष (शक) 1927

(1) दि राईट टू इन्फॉर्मेशन एक्ट, 2005 का मराठी अनुवाद राष्ट्रपति के प्राधिकार से प्रकाशित किया जाता है और ये प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, 1973 (1973 की 50) की धारा 2 के खण्ड (क) के अधीन उनके मराठी प्राधिकृत पाठ समझा जाएगा ।

MINISTRY OF LAW AND JUSTICE

(LEGISLATIVE DEPARTMENT)

New Delhi, dated 22nd December 2005/1 Pausa (Saka) 1927

The Translation in Marathi of (1) The Right to Information Act, 2005 is hereby published under the authority of the President and shall be deemed to be the authoritative texts thereof in Marathi under clause (a) of Section 2 of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 (50 of 1973).

(एक) एखादे काम, दस्तऐवज, अभिलेख यांची पाहणी करणे ;

(दोन) दस्तऐवजांच्या किंवा अभिलेखांच्या टिपण्या, उतारे किंवा प्रमाणित प्रती घेणे ;

(तीन) साहित्याचे प्रमाणित नमुने घेणे ;

(चार) डिस्केट्स, फ्लॉपी, टेप, व्हिडिओ कॅसेट या स्वरूपातील किंवा कोणत्याही अन्य इलेक्ट्रॉनिक प्रकारातील माहिती किंवा जेथे अशी माहिती संगणकात किंवा अन्य कोणत्याही उपकरणात साठविलेली असेल त्याबाबतीत मुद्रित प्रती (प्रिंट-आऊट) यामार्फत माहिती मिळविणे, याबाबतच्या अधिकाराचा समावेश होतो;

(ट) " राज्य माहिती आयोग " याचा अर्थ, कलम १५ च्या पोटकलम (१) अन्वये घटित केलेला राज्य माहिती आयोग, असा आहे ;

(ठ) " राज्य मुख्य माहिती आयुक्त " आणि " राज्य माहिती आयुक्त " याचा अर्थ, कलम १५ च्या पोटकलम (३) अन्वये नियुक्त केलेला राज्य मुख्य माहिती आयुक्त आणि राज्य माहिती आयुक्त, असा आहे ;

(ड) " राज्य जन माहिती अधिकारी " याचा अर्थ, पोट-कलम (१) अन्वये पदनिर्देशित केलेला राज्य जन माहिती अधिकारी, असा आहे आणि त्यामध्ये, कलम ५ च्या पोटकलम (२) अन्वये अशाप्रकारे पदनिर्देशित केलेल्या राज्य सहायक जन माहिती अधिकाऱ्याचा समावेश होतो ;

(ढ) " त्रयस्थ पक्ष " याचा अर्थ, माहिती मिळण्याची विनंती करणारी नागरिकाव्यतिरिक्त अन्य एखादी व्यक्ती, असा आहे आणि त्यामध्ये, सार्वजनिक प्राधिकरणाचा समावेश होतो.

## प्रकरण दोन

### माहितीचा अधिकार आणि सार्वजनिक प्राधिकरणांवरील आबंधने

३. या अधिनियमाच्या तरतुदींना अधीन राहून, सर्व नागरिकांना माहितीचा अधिकार असेल. माहितीचा अधिकार

४. (१) प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरण,—

(क) या अधिनियमान्वये देण्यात आलेला माहितीचा अधिकार मिळणे सोईचे होईल अशा रीतीने सार्वजनिक प्राधिकरणांवरील आणि स्वरूपात सर्व अभिलेख योग्य रीतीने सूचिबद्ध करील आणि त्यांची निर्देशसूची तयार करील आणि संगणकीकरण करणे योग्य आहे, अशा सर्व अभिलेखांचे वाजवी कालावधीत आणि आबंधने. आणि त्यांचे संगणकीकरण करणे योग्य आहे. अशा सर्व अभिलेखांचे वाजवी कालावधीत आणि साधनसंपत्तीच्या उपलब्धतेनुसार संगणकीकरण केले जात आहे याची आणि असे अभिलेख पाहावयास मिळणे सोयीचे व्हावे म्हणून संपूर्ण देशातील विविध प्रणालींमध्ये नेटवर्कमार्फत ते जोडले जात आहेत, याची खातरजमा करील.

(ख) हा अधिनियम अधिनियमित झाल्यापासून एकशेवीस दिवसांच्या आत,—

(एक) आपली रचना, कार्ये व कर्तव्ये यांचा तपशील ;

(दोन) आपले अधिकारी व कर्मचारी यांचे अधिकार व कर्तव्ये ;

(तीन) निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत अनुसरण्यात येणारी कार्यपद्धती, तसेच पर्यवेक्षण आणि उत्तरदायित्व प्रणाली ;

(चार) स्वतःची कार्ये पार पाडण्यासाठी त्यांच्याकडून ठरविण्यात आलेली मानके ;

(पाच) त्यांच्याकडे असलेले किंवा त्यांच्या नियंत्रणात असलेले किंवा त्यांची कार्ये पार पाडण्यासाठी त्यांच्या कर्मचारीवर्गाकडून वापरण्यात येणारे नियम, विनियम, सूचना, नियमपुस्तिका आणि अभिलेख ;

(सहा) त्यांच्याकडे असलेल्या किंवा त्यांच्या नियंत्रणाखाली असलेल्या दस्तऐवजांच्या प्रवर्गांचे विवरण ;

(सात) आपले धोरण तयार करण्यासंबंधी किंवा त्याची अंमलबजावणी करण्याच्या संबंधात, लोकांशी विचारविनिमय करण्यासाठी किंवा लोकांकडून निवेदने केली जाण्यासाठी अस्तित्वात असलेल्या कोणत्याही व्यवस्थेचा तपशील ;

(घ) " मुख्य माहिती आयुक्त " आणि " माहिती आयुक्त " यांचा अर्थ, कलम १२, पोटकलम (१) अन्वये नियुक्त करण्यात आलेला मुख्य माहिती आयुक्त आणि माहिती आयुक्त, असा आहे ;

(ङ) " सक्षम प्राधिकारी " याचा अर्थ,—

(एक) लोकसभेच्या किंवा राज्य विधानसभेच्या बाबतीत किंवा अशा प्रकारच्या सभा असणाऱ्या संघराज्य क्षेत्राच्या बाबतीत, अध्यक्ष आणि राज्यसभा किंवा राज्य विधानपरिषद यांच्या बाबतीत, सभापती ;

(दोन) सर्वोच्च न्यायालयाच्या बाबतीत, भारताचा मुख्य न्यायमूर्ती ;

(तीन) उच्च न्यायालयाच्या बाबतीत, उच्च न्यायालयाचा मुख्य न्यायमूर्ती ;

(चार) संविधानाद्वारे किंवा तदन्वये स्थापन किंवा घटित करण्यात आलेल्या अन्य प्राधिकरणांच्या बाबतीत, यथास्थिति, राष्ट्रपती किंवा राज्यपाल ;

(पाच) संविधानाच्या अनुच्छेद २३९ अन्वये नियुक्त करण्यात आलेला प्रशासक, असा आहे ;

(च) " माहिती " याचा अर्थ, कोणत्याही स्वरूपातील कोणतेही साहित्य असा असून त्यामध्ये, अभिलेख, दस्तऐवज, ज्ञापने, ई-मेल, अभिप्राय, सूचना, प्रसिध्दिपत्रके, परिपत्रके, आदेश, रोजवह्या, संविदा, अहवाल, कागदपत्रे, नमुने, प्रतिमाने (मॉडेल), कोणत्याही इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील आधार-सामग्री आणि त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यान्वये सार्वजनिक प्राधिकरणास मिळविता येईल अशी कोणत्याही खाजगी निकायाशी संबंधित माहिती, यांचा समावेश होतो ;

(छ) " विहित " याचा अर्थ, यथास्थिति, समुचित शासन किंवा सक्षम प्राधिकारी यांनी या अधिनियमान्वये तयार केलेल्या नियमांद्वारे विहित केलेले, असा आहे ;

(ज) " सार्वजनिक प्राधिकरण " याचा अर्थ,—

(क) संविधानाद्वारे किंवा तदन्वये ;

(ख) संसदेने तयार केलेल्या कोणत्याही अन्य कायद्याद्वारे ;

(ग) राज्य विधानमंडळाने तयार केलेल्या कोणत्याही अन्य कायद्याद्वारे ;

(घ) समुचित शासनाने काढलेल्या अधिसूचनेद्वारे किंवा आदेशाद्वारे स्थापन करण्यात आलेले किंवा घटित करण्यात आलेले कोणतेही प्राधिकरण किंवा निकाय किंवा स्वराज्य संस्था, असा आहे आणि त्यामध्ये,

(एक) समुचित शासनाची मालकी असलेला, त्याचे नियंत्रण असलेला किंवा त्याच्याकडून निधीद्वारे ज्याला प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे मोठ्या प्रमाणात वित्त पुरवठा केला जातो असा निकाय ;

(दोन) समुचित शासनाकडून निधीद्वारे जिला प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे मोठ्या प्रमाणात वित्त पुरवठा केला जातो, अशी अशासकीय संघटना,

यांचा समावेश होतो ;

(झ) " अभिलेख " यामध्ये,—

(क) कोणताही दस्तऐवज, हस्तलिखित व फाईल ;

(ख) एखाद्या दस्तऐवजाची कोणतीही मायक्रोफिल्म, मायक्रोफिश आणि प्रतिरूप प्रत ;

(ग) अशा मायक्रोफिल्ममध्ये समाविष्ट केलेल्या प्रतिमेची किंवा प्रतिमांची कोणतीही नक्कल (मग ती परिवर्धित केलेली असो वा नसो) ;

(घ) संगणकाद्वारे किंवा कोणत्याही अन्य उपकरणाद्वारे तयार केलेले कोणतेही अन्य साहित्य, यांचा समावेश होतो ;

(ञ) " माहितीचा अधिकार " याचा अर्थ, कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणाकडे असलेली किंवा त्याच्या नियंत्रणात असलेली व या अधिनियमान्वये मिळवता येण्याजोगी माहिती मिळविण्याचा अधिकार, असा आहे आणि त्यामध्ये,—

५. (१) प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरण, हा अधिनियम अधिनियमित झाल्यापासून शंभर दिवसांच्या आत, या अधिनियमान्वये माहिती मिळण्याची विनंती करणाऱ्या व्यक्तींना माहिती देण्यासाठी, त्याच्या अखत्यारीतील अधिकाऱ्यांना सर्व प्रशासकीय युनिटांमध्ये किंवा कार्यालयांमध्ये आवश्यक असतील तेवढ्या जास्तीत जास्त अधिकाऱ्यांना, पदनिर्देशित करणे यथास्थिति, केंद्रीय जन माहिती अधिकारी किंवा राज्य जन माहिती अधिकारी म्हणून पदनिर्देशित करील.

(२) पोटकलम (१) च्या तरतुदींना बाध न येऊ देता, प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरण, हा अधिनियम अधिनियमित झाल्यापासून शंभर दिवसांच्या आत, या अधिनियमान्वये माहिती मिळण्यासाठी केलेले अर्ज किंवा अपिले स्वीकारून, ती तात्काळ केंद्रीय जन माहिती अधिकाऱ्यास किंवा राज्य जन माहिती अधिकाऱ्यास, किंवा कलम १९ च्या पोटकलम (१) अन्वये विनिर्दिष्ट केलेल्या वरिष्ठ अधिकाऱ्यास अथवा केंद्रीय माहिती आयोगास, किंवा यथास्थिति, राज्य माहिती आयोगास पाठविण्यासाठी, प्रत्येक उप विभागीय स्तरावर किंवा अन्य उप-जिल्हा स्तरावर, एखाद्या अधिकाऱ्यास केंद्रीय सहायक जन माहिती अधिकारी, किंवा यथास्थिति, राज्य सहायक जन माहिती अधिकारी म्हणून पदनिर्देशित करील :

परंतु, माहिती मिळण्याबाबतचा अर्ज किंवा अपील, केंद्रीय सहायक जन माहिती अधिकाऱ्यास, किंवा यथास्थिति, राज्य सहायक जन माहिती अधिकाऱ्याकडे देण्यात आला असेल त्याबाबतीत, कलम ७ च्या पोट-कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या उत्तर देण्याच्या कालावधीची संगणना करताना, त्यात आणखी पाच दिवसांचा कालावधी मिळविण्यात येईल.

(३) प्रत्येक, केंद्रीय जन माहिती अधिकारी, किंवा यथास्थिति, राज्य जन माहिती अधिकारी, माहिती मिळण्याची विनंती करणाऱ्या व्यक्तींनी, केलेल्या विनंतीवर कार्यवाही करील आणि अशी माहिती मागणाऱ्या व्यक्तींना वाजवी सहाय्य करील.

(४) प्रत्येक केंद्रीय जन माहिती अधिकाऱ्यास, किंवा यथास्थिति, राज्य जन माहिती अधिकाऱ्यास, त्याची किंवा तिची कर्तव्ये योग्य प्रकारे पार पाडण्यासाठी त्याला किंवा तिला आवश्यक वाटेल अशा अशा कोणत्याही अधिकाऱ्याचे सहाय्य मागता येईल.

(५) पोटकलम (४) अन्वये ज्याचे सहाय्य मागण्यात आले आहे असा कोणताही अधिकारी, त्याचे किंवा तिचे सहाय्य मागणाऱ्या केंद्रीय जन माहिती अधिकाऱ्यास किंवा यथास्थिति, राज्य जन माहिती अधिकाऱ्यास, संपूर्ण सहाय्य करील आणि या अधिनियमाच्या तरतुदींच्या कोणत्याही उल्लंघनाच्या प्रयोजनार्थ, असा अन्य अधिकारी, हा, यथास्थिति, केंद्रीय जन माहिती अधिकारी किंवा राज्य जन माहिती अधिकारी असल्याचे समजण्यात येईल.

६. (१) या अधिनियमान्वये कोणतीही माहिती मिळविण्याची इच्छा असलेली व्यक्ती, त्याने किंवा तिने माहिती मागणी केलेल्या माहितीचा तपशील विनिर्दिष्ट करणारी, इंग्रजीमधील किंवा हिंदीमधील अथवा अर्ज ज्या क्षेत्रात करण्यात येत असेल त्या क्षेत्राच्या राजभाषेमधील लेखी स्वरूपात केलेली किंवा इलेक्ट्रॉनिक साधनाद्वारे केलेली विनंती, विहित करण्यात येईल अशा फीसह,—

(क) संबंधित सार्वजनिक प्राधिकरणाच्या केंद्रीय जन माहिती अधिकाऱ्याकडे, किंवा यथास्थिति, राज्य जन माहिती अधिकाऱ्याकडे ;

(ख) केंद्रीय सहायक जन माहिती अधिकाऱ्याकडे, किंवा यथास्थिति, राज्य सहायक जन माहिती अधिकाऱ्याकडे ;

सादर करील :

परंतु, जेव्हा अशी विनंती लेखी स्वरूपात करता येऊ शकत नसेल अशा बाबतीत, यथास्थिति, केंद्रीय जन माहिती अधिकारी, किंवा राज्य जन माहिती अधिकारी, मौखिक विनंती करणाऱ्या व्यक्तीस, ती लेखी स्वरूपात आणण्यासाठी सर्व वाजवी सहाय्य करील.

(२) माहिती मिळण्याची विनंती करणाऱ्या अर्जदारास, माहितीसाठी विनंती करण्यास कोणतेही कारण देण्यास किंवा त्याच्याशी संपर्क साधण्यासाठी आवश्यक असेल त्याखेरीज अन्य कोणताही वैयक्तिक तपशील देण्यास, भाग पाडण्यात येणार नाही.

(३) (एक) जी माहिती अन्य सार्वजनिक प्राधिकरणाकडे असेल, किंवा

(आठ) आपला एक भाग म्हणून किंवा सल्ला देण्याच्या प्रयोजनासाठी म्हणून घटित केलेल्या दोन किंवा अधिक व्यक्तींच्या मिळून बनलेल्या मंडळांचे, परिषदांचे, समित्यांचे आणि अन्य निकायांचे विवरण, आणि त्या मंडळांच्या, परिषदांच्या, समित्यांच्या आणि अन्य निकायांच्या बैठकी लोकांसाठी खुल्या आहेत किंवा कसे किंवा अशा बैठकींची कार्यवृत्ते जनतेला पहावयास मिळण्याजोगी आहेत किंवा कसे याबाबतचे विवरण ;

(नऊ) आपल्या अधिकाऱ्यांची आणि कर्मचाऱ्यांची निर्देशिका ;

(दहा) आपल्या प्रत्येक अधिकाऱ्याला व कर्मचाऱ्याला मिळणारे मासिक वेतन ; तसेच प्राधिकरणाच्या विनियमांमध्ये तरतूद केल्याप्रमाणे नुकसानभरपाई देण्याची पद्धती ;

(अकरा) सर्व योजनांचा तपशील, प्रस्तावित खर्च दर्शविणारा, आपल्या प्रत्येक अभिकरणाला नेमून दिलेला अर्थसंकल्प आणि संवितरित केलेल्या रकमांचा अहवाल ;

(बारा) अर्थसहाय्य कार्यक्रमाच्या अंमलबजावणीची रीत तसेच वाटप केलेल्या रकमा आणि अशा कार्यक्रमांच्या लाभाधिकाऱ्यांचा तपशील ;

(तेरा) ज्या व्यक्तींना सवलती, परवाने किंवा प्राधिकारपत्रे दिलेली आहेत अशा व्यक्तींचा तपशील ;

(चौदा) इलेक्ट्रॉनिक स्वरूपात त्यास उपलब्ध असलेल्या किंवा त्याच्याकडे असलेल्या माहितीच्या संबंधातील तपशील ;

(पंधरा) माहिती मिळविण्यासाठी नागरिकांना उपलब्ध असणाऱ्या सुविधांचा तपशील, तसेच सार्वजनिक वापरासाठी चालविण्यात येत असलेल्या ग्रंथालयाच्या किंवा वाचनालयाच्या कामकाजाच्या वेळांचा तपशील ;

(सोळा) जन माहिती अधिकाऱ्यांची नावे, पदनामे आणि इतर तपशील ;

(सतरा) विहित करण्यात येईल अशी इतर माहिती ;

प्रसिद्ध करील आणि त्यानंतर दरवर्षी ती प्रकाशने अद्ययावत करील ;

(ग) ज्यामुळे लोकांना बाधा पोहोचते अशी महत्त्वाची धोरणे आखताना आणि असे निर्णय जाहीर करताना सर्व संबंधित वस्तुस्थिती प्रसिद्ध करील ;

(घ) आपल्या प्रशासनिक किंवा न्यायिकवत् निर्णयांबाबतची कारणे बाधित व्यक्तींना कळवील.

(२) माहिती मिळवण्यासाठी लोकांना या अधिनियमाचा कमीतकमी आधार घ्यावा लागावा यासाठी, नियमित कालांतराने, लोकांना इंटरनेटसह, संपर्काच्या विविध साधनांद्वारे, स्वतःहून माहिती पुरविण्यासाठी, पोटकलम (१) च्या खंड (ख) च्या आवश्यकतांनुसार उपाययोजना करण्याकरिता प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरण सतत प्रयत्नशील राहील.

(३) पोटकलम (१) च्या प्रयोजनांसाठी, प्रत्येक माहिती, विस्तृत प्रमाणात आणि लोकांना सहजपणे उपलब्ध होईल अशा स्वरूपात आणि अशा रीतीने प्रसारित करण्यात येईल.

(४) पुरेपूर मोबदला देणारा खर्च, स्थानिक भाषा आणि त्या स्थानिक भागातील संपर्काची सर्वात प्रभावी पद्धती या बाबी विचारात घेऊन, सर्व माहिती प्रसारित करण्यात येईल आणि यथास्थिति, केंद्रीय जन माहिती अधिकारी किंवा राज्य जन माहिती अधिकारी यांच्याकडे, शक्यतो इलेक्ट्रॉनिक स्वरूपात ती माहिती मोफत किंवा विहित करण्यात येईल इतक्या माध्यमाच्या खर्चाएवढ्या किंवा मुद्रणाच्या खर्चाएवढ्या किंमतीला सहजपणे उपलब्ध असावी.

स्पष्टीकरण.—पोटकलम (३) आणि (४) च्या प्रयोजनार्थ, " प्रसारित " याचा अर्थ, सूचनाफलक, वृत्तपत्रे, जाहीर घोषणा, प्रसारमाध्यमांकडून ध्वनिक्षेपण, इंटरनेट यांच्याद्वारे किंवा कोणत्याही अन्य मार्गाने लोकांना माहिती करून देणे किंवा कळविणे, तसेच कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणाच्या कार्यालयाची पाहणी करू देणे, असा आहे.

(७) पोट-कलम (१) अन्वये कोणताही निर्णय घेण्यापूर्वी, यथास्थिति, केंद्रीय जन माहिती अधिकारी, किंवा राज्य जन माहिती अधिकारी, त्रयस्थ पक्षाने कलम ११ अन्वये केलेले निवेदन विचारात घेईल.

(८) जेव्हा पोट-कलम (१) अन्वये विनंतीचा अर्ज फेटाळण्यात आला असेल त्याबाबतीत, यथास्थिति, केंद्रीय जन माहिती अधिकारी, किंवा राज्य जन माहिती अधिकारी, माहिती मिळण्याची विनंती करणाऱ्या व्यक्तीस,—

(एक) असा विनंतीचा अर्ज फेटाळण्याची कारणे ;

(दोन) ज्या कालावधीत असा विनंतीचा अर्ज फेटाळल्याच्या विरोधात अपील करता येईल तो कालावधी ; आणि

(तीन) अपील प्राधिकरणाचा तपशील ;

कळवील.

(९) सार्वजनिक प्राधिकरणाची साधनसामग्री या कामासाठी प्रमाणाबाहेर वळवावी लागत नसल्यास, किंवा प्रस्तुत अभिलेख सुरक्षित ठेवण्याच्या, किंवा जतन करण्याच्या दृष्टीने ते हानीकारक नसल्यास, माहिती ज्या स्वरूपात मागण्यात आली असेल त्याच स्वरूपात ती सर्वसाधारणपणे, पुरविण्यात येईल.

८. (१) या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, कोणत्याही नागरिकाला पुढील माहिती पुरविण्याचे बंधन असणार नाही,— माहिती प्रकट करण्याबाबत अपवाद.

(क) जी माहिती प्रकट केल्याने भारताच्या सार्वभौमत्वाला किंवा एकात्मतेला, राज्याच्या सुरक्षेला, युद्धतंत्रविषयक, वैज्ञानिक किंवा आर्थिक हितसंबंधांना, परकीय राज्यांबरोबरच्या संबंधांना बाधा पोहोचेल किंवा अपराधाला चिथावणी मिळेल, अशी माहिती ;

(ख) कोणत्याही न्यायालयाने किंवा न्यायाधिकरणाने जी प्रकाशित करण्यास स्पष्टपणे मनाई केली आहे किंवा जी प्रकट केल्यामुळे न्यायालयाचा अवमान होऊ शकेल, अशी माहिती ;

(ग) जी प्रकट केल्याने संसदेच्या किंवा राज्य विधानमंडळाच्या विशेषाधिकाराचा भंग होईल, अशी माहिती ;

(घ) वाणिज्य क्षेत्रातील विश्वासाहर्ता, व्यावसायिक गुपिते किंवा बौद्धिक संपदा यांचा समावेश असलेली जी माहिती प्रकट करणे व्यापक लोकहिताच्या दृष्टीने आवश्यक आहे, अशी सक्षम प्राधिकाऱ्याची खात्री पटली असेल त्या माहिती व्यतिरिक्त, जी प्रकट केल्याने त्रयस्थ पक्षाच्या स्पर्धात्मक स्थानाला हानी पोहोचेल, अशी माहिती ;

(ङ) जी माहिती प्रकट करणे व्यापक लोकहिताच्या दृष्टीने आवश्यक आहे अशी सक्षम प्राधिकाऱ्याची खात्री पटली असेल त्या माहिती व्यतिरिक्त, एखाद्या व्यक्तीच्या विश्वासाश्रित संबंधामुळे तिला उपलब्ध असणारी माहिती ;

(च) विदेशी शासनाकडून विश्वासपूर्वक मिळालेली माहिती ;

(छ) जी प्रकट केल्याने कोणत्याही व्यक्तीच्या जीवितास किंवा शारीरिक सुरक्षिततेस धोका निर्माण होईल अथवा कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी किंवा सुरक्षा प्रयोजनांसाठी विश्वासपूर्वक दिलेल्या माहितीचा स्रोत किंवा केलेले सहाय्य ओळखता येईल, अशी माहिती ;

(ज) ज्या माहितीमुळे अपराध्यांचा तपास करणे किंवा त्यांना अटक करणे किंवा त्यांच्यावर खटला दाखल करणे या प्रक्रियांमध्ये अडथळा येईल, अशी माहिती ;

(झ) मंत्रिमंडळाची कागदपत्रे, तसेच मंत्रिपरिषद, सचिव व इतर अधिकारी यांच्या विचारविनिमयाचे अभिलेख :

परंतु, मंत्रिपरिषदेचे निर्णय, त्यांची कारणे आणि ज्या आधारावर ते निर्णय घेण्यात आले होते ती सामग्री, निर्णय घेतल्यानंतर आणि ते प्रकरण पूर्ण झाल्यानंतर किंवा संपुष्टात आल्यानंतर जाहीर करण्यात येईल :

परंतु आणखी असे की, या कलमान्वये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या अपवादांतर्गत असणाऱ्या बाबी प्रकट करण्यात येणार नाहीत ;

(दोन) ज्या माहितीचा विषय अन्य सार्वजनिक प्राधिकरणाच्या कामकाजाशी अधिक संबंधित असेल,

अशी माहिती मिळविण्यासाठी एखाद्या सार्वजनिक प्राधिकरणाकडे अर्ज करण्यात आला असेल त्याबाबतीत, ज्यांच्याकडे असा अर्ज करण्यात आला आहे ते सार्वजनिक प्राधिकरण, असा अर्ज किंवा त्यास योग्य वाटेल असा त्याचा भाग, अशा अन्य सार्वजनिक प्राधिकरणाकडे हस्तांतरित करील आणि अशा हस्तांतरणाबाबत अर्जदारास तात्काळ माहिती देईल :

परंतु, या पोटकलमानुसार करावयाचे अर्जाचे हस्तांतरण, व्यवहार्य असेल तितक्या लवकर करण्यात येईल. मात्र, कोणत्याही परिस्थितीत ते अर्ज मिळाल्याच्या तारखेपासून पाच दिवसांपेक्षा अधिक विलंबाने करण्यात येणार नाही.

नंतीचा अर्ज तात काढणे. ७. (१) कलम ५ पोटकलम (२) च्या परंतुकास किंवा कलम ६, पोटकलम (३) च्या परंतुकास अधीन राहून, यथास्थिति, केंद्रीय जन माहिती अधिकारी, किंवा राज्य जन माहिती अधिकारी, कलम ६ अन्वये माहिती मिळण्याची विनंती करणारा अर्ज मिळाल्यावर, शक्य तितक्या शीघ्रतेने आणि कोणत्याही परिस्थितीत विनंती केल्यापासून तीस दिवसांच्या आत, एकतर विहित करण्यात येईल अशा फीचे प्रदान केल्यावर माहिती देईल, किंवा कलम ८ व ९ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कारणांपैकी कोणत्याही कारणासाठी विनंतीचा अर्ज फेटाळील :

परंतु, जर मागितलेली माहिती, एखाद्या व्यक्तीचे जीवित वा स्वातंत्र्य यासंबंधातील असेल तर, विनंतीचा अर्ज मिळाल्यापासून अठ्ठेचाळीस तासांच्या आत ती देण्यात येईल.

(२) जर केंद्रीय जन माहिती अधिकाऱ्याने, किंवा यथास्थिति, राज्य जन माहिती अधिकाऱ्याने, पोटकलम (१) अन्वये विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीत माहिती मिळण्याच्या विनंतीवर निर्णय देण्यात कसूर केली तर, अशा केंद्रीय जन माहिती अधिकाऱ्याने, किंवा यथास्थिति, राज्य जन माहिती अधिकाऱ्याने विनंती नाकारल्याचे मानण्यात येईल.

(३) माहिती देण्याचा खर्च दर्शविणारी कोणतीही जादा फी प्रदान केल्यावर, माहिती देण्याचा निर्णय घेण्यात आला असेल त्याबाबतीत, केंद्रीय जन माहिती अधिकारी, किंवा यथास्थिति, राज्य जन माहिती अधिकारी, विनंती करणाऱ्या व्यक्तीस,—

(क) पोटकलम (१) अन्वये विहित केलेल्या फीनुसार ही जादा रक्कम त्याने कशाच्या आधारे ठरवली त्या हिशेबासह, माहिती पुरविण्याचा त्याने निर्धारित केलेला खर्च दर्शविणारा जादा फीचा तपशील नमूद करणारी सूचना पाठवील, व त्याद्वारे तिला ती फी भरण्याची विनंती करील, आणि उक्त सूचना पाठविल्याच्या व फीचे प्रदान केल्याच्या दरम्यानचा कालावधी हा, त्या पोटकलमामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या तीस दिवसांच्या कालावधीची परिगणना करण्याच्या प्रयोजनार्थ, वगळण्यात येईल ;

(ख) आकारलेल्या फीच्या रकमेसंबंधीच्या किंवा दिलेल्या माहितीच्या स्वरूपासंबंधीच्या निर्णयाचे पुनर्विलोकन करण्याच्या बाबतीतील त्याचे किंवा तिचे अधिकार, तसेच अपील प्राधिकारी, कालमर्यादा, प्रक्रिया व इतर कोणतेही स्वरूप, याचा तपशील, यासंबंधीची माहिती देणारी सूचना पाठवील.

(४) या अधिनियमान्वये जेव्हा अभिलेखाची किंवा त्याच्या भागाची माहिती मिळवून द्यावयाची असेल आणि जिला ती माहिती मिळवून द्यावयाची आहे, अशी व्यक्ती ज्ञानेंद्रियांच्या दृष्टीने विकलांग असेल त्याबाबतीत, यथास्थिति, केंद्रीय जन माहिती अधिकारी, किंवा राज्य जन माहिती अधिकारी, माहिती मिळविणे ज्यायोगे शक्य होईल असे साहाय्य देईल, तसेच पाहणी करण्यासाठी उचित असेल असेही साहाय्य देईल.

(५) मागितलेली माहिती जेव्हा छापील स्वरूपात किंवा कोणत्याही इलेक्ट्रॉनिक स्वरूपात द्यावयाची असेल त्याबाबतीत, पोटकलम (६) च्या तरतुदींना अधीन राहून, अर्जदार, विहित करण्यात येईल अशी फी प्रदान करील :

परंतु, कलम ६ च्या पोटकलम (१) अन्वये आणि कलम ७ ची पोटकलमे (१) व (५) यांअन्वये विहित केलेली फी वाजवी असेल आणि अशी कोणतीही फी, ज्या व्यक्ती दारिद्र्यरेषेखाली आहेत असे समुचित शासनाकडून निर्धारित करण्यात येईल अशा व्यक्तींकडून, आकारण्यात येणार नाही.

(६) पोटकलम (५) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जर सार्वजनिक प्राधिकरणाने पोटकलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालमर्यादेचे पालन करण्यात कसूर केली असेल तर, माहिती मिळण्याची विनंती करणाऱ्या व्यक्तीस, ती माहिती मोफत देण्यात येईल.

११. (१) या अधिनियमान्वये केलेल्या विनंतीवरून जेव्हा, यथास्थिति, एखादा केंद्रीय जन माहिती अधिकारी किंवा राज्य जन माहिती अधिकारी, त्रयस्थ पक्षाशी संबंधित असलेली किंवा त्याच्याकडून पुरविण्यात आलेली आणि त्या त्रयस्थ पक्षाकडून गोपनीय समजली जाणारी कोणतीही माहिती किंवा अभिलेख किंवा त्याचा भाग पुरवावयाचा असेल तेव्हा, यथास्थिति, केंद्रीय जन माहिती अधिकारी किंवा राज्य जन माहिती अधिकारी अशी विनंती मिळाल्यापासून पाच दिवसांच्या आत त्या विनंतीबाबत आणि, यथास्थिति, केंद्रीय जन माहिती अधिकारी किंवा राज्य जन माहिती अधिकारी ती माहिती किंवा अभिलेख किंवा त्याचा भाग प्रकट करण्यास इच्छुक असल्याबाबत लेखी नोटीस अशा त्रयस्थ पक्षास देईल आणि त्रयस्थ पक्षाला, अशी माहिती प्रकट करावी किंवा कसे, या संबंधात लेखी किंवा मौखिक निवेदन सादर करण्यासाठी आमंत्रित करील आणि माहिती प्रकट करण्याचा निर्णय घेताना त्रयस्थ पक्षाचे असे निवेदन विचारात घेण्यात येईल.

परंतु, कायद्याने संरक्षण दिलेल्या व्यावसायिक किंवा वाणिज्यिक गुपितांच्या बाबतीत असेल ते खेरीज करून, जर लोकहितार्थ अशी माहिती प्रकट करणे हे, अशा त्रयस्थ पक्षाच्या हिताला होणारी कोणतीही संभाव्य हानी किंवा क्षती यापेक्षा अधिक महत्त्वाचे असेल तर, ती माहिती प्रकट करण्याची परवानगी असेल.

(२) केंद्रीय जन माहिती अधिकाऱ्याकडून किंवा यथास्थिति, राज्य जन माहिती अधिकाऱ्याकडून कोणत्याही माहितीच्या किंवा अभिलेखांच्या किंवा त्यांच्या भागांच्या संबंधात, पोट-कलम (१) अन्वये त्रयस्थ पक्षावर नोटीस बजावण्यात आली असेल अशा बाबतीत, अशी नोटीस मिळाल्याच्या दिनांकापासून दहा दिवसांच्या आत, प्रस्तावित माहिती प्रकट करण्याविषयी निवेदन करण्याची त्रयस्थ पक्षास संधी देण्यात येईल.

(३) कलम ७ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, यथास्थिति, केंद्रीय जन माहिती अधिकारी, किंवा राज्य जन माहिती अधिकारी, कलम ६ अन्वये केलेला विनंतीचा अर्ज मिळाल्यानंतर चाळीस दिवसांच्या आत, पोट-कलम (२) अन्वये निवेदन करण्याची त्रयस्थ पक्षास संधी देण्यात आलेली असल्यास, ती माहिती किंवा अभिलेख किंवा त्याचा भाग प्रकट करावा किंवा करू नये, याबाबत निर्णय घेईल आणि त्याच्या निर्णयाची लेखी नोटीस त्रयस्थ पक्षास देईल.

(४) पोट-कलम (३) अन्वये दिलेल्या नोटिशीत, ज्याला नोटीस देण्यात आली असेल, असा त्रयस्थ पक्ष त्या निर्णयाविरुद्ध कलम १९ अन्वये अपील दाखल करण्यास हक्कदार असेल, या विधानाचा समावेश असेल.

## प्रकरण तीन

## केंद्रीय माहिती आयोग

१२. (१) केंद्र सरकार, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, "केंद्रीय माहिती आयोग" या नावाने ओळखला जाणारा निकाय, या अधिनियमान्वये त्यास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करण्यासाठी व त्याला नेमून दिलेली कार्ये पार पाडण्यासाठी, घटित करील. केंद्रीय माहिती आयोग घटित करणे.

(२) केंद्रीय माहिती आयोग पुढील व्यक्तींचा मिळून बनलेला असेल,—

(क) मुख्य माहिती आयुक्त, आणि

(ख) आवश्यक वाटतील त्याप्रमाणे दहा पेक्षा अधिक नसतील इतके केंद्रीय माहिती आयुक्त.

(३) मुख्य माहिती आयुक्ताची व माहिती आयुक्तांची नियुक्ती, राष्ट्रपती, पुढील व्यक्तींची मिळून बनलेल्या समितीच्या शिफारशीनुसार करील,—

(एक) प्रधानमंत्री, जो या समितीचा अध्यक्ष असेल ;

(दोन) लोकसभेतील विरोधी पक्षनेता ; आणि

(तीन) प्रधानमंत्र्याने नामनिर्देशित करावयाचा एक केंद्रीय कॅबिनेट मंत्री.

स्पष्टीकरण.— शंकानिरसनार्थ, याद्वारे असे घोषित करण्यात येते की, लोकसभेतील विरोधी पक्षनेता म्हणून एखाद्या व्यक्तीला मान्यता देण्यात आली नसेल त्याबाबतीत, लोकसभेतील, सरकारच्या विरोधी पक्षातील सर्वात मोठ्या गटाच्या नेत्यास विरोधी पक्षनेता मानण्यात येईल.

(४) केंद्रीय माहिती आयोगाच्या कामकाजाचे सर्वसाधारण अधीक्षण, संचालन आणि व्यवस्थापन हे मुख्य माहिती आयुक्ताकडे निहित असेल व त्याला माहिती आयुक्त साहाय्य करतील आणि केंद्रीय माहिती आयोगाला या अधिनियमाखालील कोणत्याही इतर प्राधिकरणाच्या निदेशांना अधीन न राहता स्वायत्तपणे वापरता येतील असे सर्व अधिकार त्यास वापरता येतील आणि करता येत असतील अशा सर्व कृती व गोष्टी त्यास करता येतील.

(ञ) जी माहिती प्रकट करणे हे व्यापक लोकहिताच्या दृष्टीने आवश्यक आहे अशी, यथास्थिति, केंद्रीय जन माहिती अधिकाऱ्याची, राज्य जन माहिती अधिकाऱ्याची किंवा अपील प्राधिकाऱ्याची खात्री पटली असेल, ती खेरीजकरून, जी प्रकट करण्याचा कोणत्याही सार्वजनिक कामकाजाशी किंवा हितसंबंधाशी काहीही संबंध नाही किंवा जी व्यक्तीच्या खाजगी बाबीत अनाठायी हस्तक्षेप करील, अशी वैयक्तिक तपशीलासंबंधातील माहिती :

परंतु, जी माहिती संसदेला किंवा राज्य विधानमंडळाला देण्यास नकार देता येणार नाही, ती माहिती कोणत्याही व्यक्तीला देण्यासही नकार देता येणार नाही.

(२) शासकीय गुपिते अधिनियम, १९२३ (१९२३ चा १९) किंवा पोट-कलम (१) अनुसार अनुज्ञेय असलेले कोणतेही अपवाद यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, माहिती प्रकट केल्याने साध्य होणारे लोकहित हे संरक्षित हितसंबंधास होणाऱ्या हानीपेक्षा अधिक असेल तर, सार्वजनिक प्राधिकरण ती माहिती पाहण्यास परवानगी देऊ शकेल.

(३) पोट-कलम (१) च्या खंड (क), (ग) आणि (झ) च्या तरतुदींना अधीन राहून, कलम ६ अन्वये ज्या दिनांकास विनंती केली असेल, त्या दिनांकापासून वीस वर्षापूर्वी झाली असेल, उद्भवली असेल किंवा घडली असेल अशी कोणतीही घटना, प्रसंग किंवा बाब यांसंबंधातील कोणतीही माहिती ही, कोणत्याही व्यक्तीस, त्या कलमान्वये विनंती करण्यात आल्यावर पुरविण्यात येईल :

परंतु, वीस वर्षांच्या उक्त कालावधीची गणना ज्यापासून करावयाची त्या दिनांकासंबंधात कोणताही प्रश्न उपस्थित झाल्यास, या अधिनियमात तरतूद केलेल्या सर्वसाधारण अपिलांना अधीन राहून, केंद्र सरकारचा निर्णय अंतिम असेल.

त प्रकरणांत हिती देण्यास कार देण्याची कारणे. ९. एखादी माहिती पुरविण्याच्या विनंतीमुळे जर, राज्याव्यतिरिक्त अन्य एखाद्या व्यक्तीच्या कॉपीराईटचे उल्लंघन होत असेल तर, कलम ८ च्या तरतुदींना बाधा न येऊ देता, यथास्थिति, केंद्रीय जन माहिती अधिकाऱ्यास, किंवा राज्य जन माहिती अधिकाऱ्यास, अशी माहिती पुरविण्याची विनंती नाकारता येईल.

पृथक्करणीयता. १०. (१) जी माहिती मिळण्यासाठी विनंती करण्यात आली आहे ती माहिती, जी प्रकट करण्याबाबत अपवाद केला होता अशा माहितीशी संबंधित असल्याच्या कारणास्तव नाकारण्यात आली असेल तेव्हा, या अधिनियमामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमान्वये प्रकट करण्याबाबत अपवाद केलेल्या कोणत्याही माहितीचा ज्यात अंतर्भाव नसेल आणि अपवाद केलेल्या माहितीचा समावेश असलेल्या कोणत्याही भागापासून तो व्यवस्थितपणे पृथक करता येत असेल, असा अभिलेखाचा भाग, पुरविण्यात येईल.

(२) पोट-कलम (१) अन्वये अभिलेखाच्या एखाद्या भागातील माहिती देण्यात आली असेल अशा प्रकरणात, केंद्रीय जन माहिती अधिकारी, किंवा यथास्थिति, राज्य जन माहिती अधिकारी, अर्जदारास,—

(क) मागणी करण्यात आलेल्या अभिलेखापैकी जी प्रकट करण्याबाबत अपवाद करण्यात आला आहे, अशी, माहिती अंतर्भूत असणारा अभिलेख पृथक केल्यानंतरचा उर्वरित भाग पुरविण्यात येत असल्याची ;

(ख) वस्तुस्थितीसंबंधातील कोणत्याही महत्त्वपूर्ण प्रश्नावरील कोणत्याही निष्कर्षासह, ते निष्कर्ष ज्या सामग्रीवर आधारले होते त्या सामग्रीचा निर्देश करून, निर्णयाच्या कारणांची ;

(ग) निर्णय देणाऱ्या व्यक्तीचे नाव आणि पदनाम यांची ;

(घ) त्याने किंवा तिने परिगणना केलेल्या फीचा तपशील आणि अर्जदाराने जमा करणे आवश्यक असलेली फीची रक्कम यांची ; आणि

(ङ) माहितीचा भाग प्रकट न करण्यासंबंधातील निर्णयाचे पुनर्विलोकन करण्याच्या बाबतीतील, त्याचे किंवा तिचे हक्क, कलम १९ च्या पोट-कलम (१) अन्वये किंवा केंद्रीय माहिती आयोगाकडून, किंवा यथास्थिति, राज्य माहिती आयोगाकडून विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या वरिष्ठ अधिकाऱ्याचा तपशील, कालमर्यादा, प्रक्रिया आणि माहिती पुरविण्याचा इतर कोणताही प्रकार यांसह आकारलेल्या फीची रक्कम किंवा माहिती पुरविण्याचा प्रकार यांची ; माहिती देणारी नोटीस देईल.

परंतु तसेच, मुख्य माहिती आयुक्तांचे व माहिती आयुक्तांचे वेतन, भत्ते व सेवेच्या इतर शर्ती यांमध्ये, त्यांच्या नियुक्तीनंतर, त्यांना अहितकारक असतील असे बदल करण्यात येणार नाहीत.

(६) केंद्र सरकार, मुख्य माहिती आयुक्तास व माहिती आयुक्तांना या अधिनियमाखालील त्यांची कार्ये कार्यक्षमपणे पार पाडण्यासाठी आवश्यक असतील इतक्या अधिकाऱ्यांच्या व कर्मचाऱ्यांच्या सेवा पुरवील आणि या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ नियुक्त केलेले अधिकारी व इतर कर्मचारी यांना देय असलेले वेतन व भत्ते व त्यांच्या सेवेच्या अटी व शर्ती विहित करण्यात येतील अशा असतील.

१४. (१) पोट-कलम (३) च्या तरतुदींना अधीन राहून, मुख्य माहिती आयुक्त किंवा कोणताही माहिती आयुक्त यांच्या बाबतीत, राष्ट्रपतीने सर्वोच्च न्यायालयाकडे निर्देश केल्यावरून, न्यायालयाने चौकशीअंती, यथास्थिति, मुख्य माहिती आयुक्तास किंवा कोणत्याही माहिती आयुक्तास, सिद्ध झालेल्या गैरवर्तनाच्या किंवा असमर्थतेच्या कारणास्तव त्यास पदावरून दूर केले पाहिजे, असा अभिप्राय दिल्यानंतर राष्ट्रपतीच्या आदेशान्वये केवळ, अशा कारणास्तव, त्याला त्याच्या पदावरून दूर करण्यात येईल.

(२) ज्यांच्या बाबतीत पोट-कलम (१) अन्वये सर्वोच्च न्यायालयाकडे निर्देश करण्यात आला आहे, अशा मुख्य माहिती आयुक्तास किंवा माहिती आयुक्तास, राष्ट्रपती, अशा निर्देशावर सर्वोच्च न्यायालयाकडून अभिप्राय प्राप्त होऊन आपल्याकडून आदेश दिला जाईपर्यंत पदावरून निलंबित करू शकेल आणि आवश्यक वाटल्यास, चौकशी चालू असताना, त्यास कार्यालयात उपस्थित राहण्यास मनाई देखील करू शकेल.

(३) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, यथास्थिति, मुख्य माहिती आयुक्तास, किंवा माहिती आयुक्तास जर,

(क) नादार म्हणून ठरविण्यात आले असेल तर ; किंवा

(ख) राष्ट्रपतीच्या मते ज्यात नैतिक अधःपतनाचा अंतर्भाव आहे अशा एखाद्या अपराधाबद्दल दोषी ठरवले असेल तर ; किंवा

(ग) तो आपल्या पदावधीत आपल्या पदाच्या कर्तव्यांव्यतिरिक्त इतर कोणतेही काम सवेतन करीत असेल तर ; किंवा

(घ) राष्ट्रपतीच्या मते, मानसिक किंवा शारीरिक विकलतेमुळे त्या पदावर राहण्याचे चालू ठेवण्यास तो अपात्र असेल तर ; किंवा

(ङ) मुख्य माहिती आयुक्त किंवा माहिती आयुक्त म्हणून कार्य करण्यात बाधा आणू शकतील असे त्याचे आर्थिक किंवा इतर हितसंबंध असतील तर, राष्ट्रपतीस आदेशाद्वारे त्याला त्याच्या पदावरून दूर करता येईल.

(४) मुख्य माहिती आयुक्त किंवा माहिती आयुक्त, एखाद्या विधिसंस्थापित कंपनीचा सदस्य म्हणून नव्हे तर अन्य कोणत्याही प्रकारे, त्या कंपनीच्या अन्य सदस्यांसह सामाईकपणे भारत सरकारने अथवा त्याच्या वतीने केलेल्या कोणत्याही संविदेशी किंवा कराराशी कोणत्याही रीतीने संबंधित किंवा हितसंबंधित असेल, किंवा त्याच्या नफ्यात किंवा त्यांपासून उद्‌भवणाऱ्या कोणत्याही लाभात किंवा वित्तलब्धीत कोणत्याही रीतीने सहभागी झाला असेल तर, तो, पोट-कलम (१) च्या प्रयोजनासाठी गैरवर्तनाबद्दल दोषी असल्याचे मानले जाईल.

## प्रकरण चार

## राज्य माहिती आयोग

१५. (१) प्रत्येक राज्य शासन, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, (राज्याचे नाव) माहिती आयोग या नावाने ओळखला जाणारा निकाय, या अधिनियमान्वये त्याला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करण्यासाठी आणि त्याला नेमून दिलेली कार्ये पार पाडण्यासाठी, राज्य माहिती आयोग गठित करील.

(२) राज्य माहिती आयोग पुढील व्यक्तींचा मिळून बनलेला असेल :—

(क) राज्य मुख्य माहिती आयुक्त ; आणि

(ख) आवश्यक असतील त्याप्रमाणे, दहापेक्षा अधिक नसतील इतके राज्य माहिती आयुक्त.

(३) राज्य मुख्य माहिती आयुक्तांची आणि राज्य माहिती आयुक्तांची नियुक्ती, राज्यपाल, पुढील व्यक्तींची मिळून बनलेल्या समितीच्या शिफारशीनुसार करील —

(५) मुख्य माहिती आयुक्त आणि माहिती आयुक्त हे, कायदा, विज्ञान व तंत्रज्ञान, समाजसेवा, व्यवस्थापन, पत्रकारिता, जनसंपर्क माध्यम किंवा प्रशासन आणि शासन या विषयांचे व्यापक ज्ञान व अनुभव असलेल्या, सार्वजनिक जीवनातील प्रख्यात व्यक्ती असतील.

(६) मुख्य माहिती आयुक्त किंवा कोणताही माहिती आयुक्त हा, यथास्थिति, संसदेचा सदस्य किंवा कोणत्याही राज्याच्या किंवा संघ राज्यक्षेत्राच्या विधानमंडळाचा सदस्य असणार नाही, किंवा इतर कोणतेही लाभपद धारण करणार नाही किंवा कोणत्याही राजकीय पक्षाशी संबंधित असणार नाही किंवा कोणताही उद्योगधंदा अथवा व्यवसाय करणार नाही.

(७) केंद्रीय माहिती आयोगाचे मुख्यालय दिल्ली येथे असेल आणि केंद्रीय माहिती आयोगास, केंद्र सरकारच्या पूर्वमान्यतेने, भारतात अन्य ठिकाणी कार्यालये स्थापन करता येतील.

पदावधी व सेवेच्या शर्ती.

१३. (१) मुख्य माहिती आयुक्त ज्या दिनांकास आपले पद धारण करील त्या दिनांकापासून पाच वर्षांच्या कालावधीसाठी ते पद धारण करील, आणि तो पुनर्नियुक्तीस पात्र असणार नाही :

परंतु, कोणताही मुख्य माहिती आयुक्त, त्याच्या वयाची पासष्ट वर्षे पूर्ण झाल्यानंतर ते पद धारण करणार नाही.

(२) प्रत्येक माहिती आयुक्त, ज्या दिनांकास आपले पद धारण करील त्या दिनांकापासून पाच वर्षांच्या कालावधीपर्यंत किंवा त्याच्या वयाची पासष्ट वर्षे पूर्ण होईपर्यंत, यांपैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत, आपले पद धारण करील, आणि तो, असा माहिती आयुक्त म्हणून पुनर्नियुक्तीस पात्र असणार नाही :

परंतु, प्रत्येक माहिती आयुक्त, या पोट-कलमान्वये आपले पद रिक्त केल्यानंतर, कलम १२ च्या पोट-कलम (३) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या रीतीने, मुख्य माहिती आयुक्त म्हणून नियुक्त केला जाण्यास पात्र असेल :

परंतु आणखी असे की, माहिती आयुक्ताची मुख्य माहिती आयुक्त म्हणून नियुक्ती झाली असेल त्याबाबतीत, माहिती आयुक्त आणि मुख्य माहिती आयुक्त म्हणून होणारा त्याचा एकूण पदावधी पाच वर्षांहून अधिक असणार नाही.

(३) मुख्य माहिती आयुक्त किंवा एखादा माहिती आयुक्त, आपले पद ग्रहण करण्यापूर्वी, राष्ट्रपतींच्या समक्ष किंवा त्यासंदर्भात त्याने नियुक्त केलेल्या इतर कोणत्याही व्यक्तीच्या समक्ष, पहिल्या अनुसूचीत त्या प्रयोजनार्थ दिलेल्या नमुन्यानुसार शपथ किंवा प्रतिज्ञा घेईल.

(४) मुख्य माहिती आयुक्तास किंवा माहिती आयुक्तास, कोणत्याही वेळी, राष्ट्रपतीस उद्देशून आपल्या सहीनिशी पत्र लिहून आपल्या पदाचा लेखी राजीनामा देता येईल :

परंतु, मुख्य माहिती आयुक्तास किंवा माहिती आयुक्तास कलम १४ अन्वये विनिर्दिष्ट केलेल्या रीतीने पदावरून दूर करता येईल.

(५) देय असलेले वेतन व भत्ते आणि सेवेच्या इतर अटी व शर्ती या,—

(क) मुख्य माहिती आयुक्तांच्या बाबतीत मुख्य निवडणूक आयुक्तांप्रमाणे असतील;

(ख) माहिती आयुक्तांच्या बाबतीत निवडणूक आयुक्तांप्रमाणे असतील :

परंतु, मुख्य माहिती आयुक्त किंवा माहिती आयुक्त हा, त्याच्या नियुक्तीच्या वेळी, भारत सरकारच्या किंवा राज्य शासनाच्या अधीन असलेल्या कोणत्याही पूर्वोक्त सेवेच्या संबंधात, विकलांगता किंवा जखम निवृत्तिवेतनाव्यतिरिक्त अन्य निवृत्तिवेतन घेत असेल तर, मुख्य माहिती आयुक्त किंवा माहिती आयुक्त म्हणून असलेल्या सेवेच्या संबंधातील त्याच्या वेतनातून, सेवानिवृत्ति-उपदानाच्या एकरकमी निवृत्तिवेतन वगळून अंशराशीकृत निवृत्तिवेतनाचा कोणताही भाग व इतर स्वरूपातील सेवानिवृत्ति लाभ यांची मिळून होणारी निवृत्तिवेतनाची एकूण रक्कम कमी करण्यात येईल :

परंतु आणखी असे की, मुख्य माहिती आयुक्तास किंवा माहिती आयुक्तास, त्याच्या नियुक्तीच्या वेळी, कोणत्याही केंद्रीय अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये किंवा राज्य अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये स्थापन केलेल्या महामंडळात किंवा केंद्र सरकारच्या किंवा राज्य शासनाच्या मालकीच्या किंवा त्यांच्या नियंत्रणाखालील शासकीय कंपनीत केलेल्या आधीच्या कोणत्याही सेवेच्या संबंधातील सेवानिवृत्ति लाभ मिळत असतील तर, मुख्य माहिती आयुक्त किंवा माहिती आयुक्त म्हणून केलेल्या सेवेच्या संबंधातील त्याच्या वेतनातून, सेवानिवृत्ति लाभांइतकी निवृत्तिवेतनाची रक्कम कमी करण्यात येईल :

(५) देय असलेले वेतन व भत्ते आणि तिच्या इतर अटी व शर्ती या,—

(७)

(क) राज्य मुख्य माहिती आयुक्ताच्या बाबतीत निवडणूक आयुक्ताप्रमाणे असतील ;

(ख) राज्य माहिती आयुक्ताच्या बाबतीत राज्य शासनाच्या मुख्य सचिवाप्रमाणे असतील :

परंतु, राज्य मुख्य माहिती आयुक्त किंवा राज्य माहिती आयुक्त, हा त्याच्या नियुक्तीच्या वेळी भारत सरकारच्या अधीन किंवा राज्य शासनाच्या अधीन असलेल्या कोणत्याही पूर्वीच्या सेवेच्या संबंधात, विकलांगता किंवा जखम निवृत्तिवेतनाव्यतिरिक्त अन्य निवृत्तिवेतन घेत असेल तर, राज्य मुख्य माहिती आयुक्त किंवा राज्य माहिती आयुक्त म्हणून असलेल्या सेवेच्या संबंधातील त्याच्या वेतनातून, सेवानिवृत्ति-उपदानाच्या समतुल्य निवृत्तिवेतन वगळून अंशराशीकृत निवृत्तिवेतनाचा कोणताही भाग व इतर स्वरूपातील सेवानिवृत्ति लाभ यांची मिळून होणारी निवृत्तिवेतनाची एकूण रक्कम कमी करण्यात येईल :

परंतु आणखी असे की, राज्य मुख्य माहिती आयुक्तास किंवा राज्य माहिती आयुक्तास त्याच्या नियुक्तीच्या वेळी, कोणत्याही केंद्रीय अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये किंवा राज्य अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये स्थापन केलेल्या महामंडळात किंवा केंद्र सरकारच्या किंवा राज्य शासनाच्या मालकीच्या किंवा त्यांच्या नियंत्रणाखालील शासकीय कंपनीत केलेल्या आधीच्या कोणत्याही सेवेच्या संबंधातील सेवानिवृत्ति लाभ मिळत असतील तर, राज्य मुख्य माहिती आयुक्त किंवा राज्य माहिती आयुक्त म्हणून केलेल्या सेवेच्या संबंधातील त्याच्या वेतनातून सेवानिवृत्ति लाभांइतकी, निवृत्तिवेतनाची रक्कम कमी करण्यात येईल :

परंतु तसेच, राज्य मुख्य माहिती आयुक्तांचे व राज्य माहिती आयुक्तांचे वेतन, भत्ते व सेवेच्या इतर शर्ती यांमध्ये त्यांच्या नियुक्तीनंतर त्यांना अहितकारक असतील असे बदल करण्यात येणार नाहीत.

(६) राज्य शासन, राज्य मुख्य माहिती आयुक्तास व राज्य माहिती आयुक्तांना या अधिनियमाखालील त्यांची कार्ये प्रभावीपणे पार पाडण्यासाठी आवश्यक असतील इतक्या अधिकाऱ्यांच्या व कर्मचाऱ्यांच्या सेवा पुरवील आणि या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ नियुक्त केलेले अधिकारी व इतर कर्मचारी यांना देय असलेले वेतन व भत्ते व त्यांच्या सेवेच्या अटी व शर्ती विहित करण्यात येतील अशा असतील.

१७. (१) पोटकलम (३) च्या तरतुदींना अधीन राहून, राज्य मुख्य माहिती आयुक्ताच्या किंवा राज्य माहिती आयुक्ताच्या बाबतीत, राज्यपालाने सर्वोच्च न्यायालयाकडे निर्देश केल्यावरून, त्या न्यायालयाने चौकशीअंती, यथास्थिति, राज्य मुख्य माहिती आयुक्ताला, किंवा राज्य माहिती आयुक्ताच्या बाबतीत झालेल्या गैरवर्तनाच्या किंवा असमर्थतेच्या कारणास्तव, त्यास पदावरून दूर केले पाहिजे असा अभिप्राय दिल्यानंतर राज्यपालाच्या आदेशाद्वारेच केवळ अशा कारणास्तव त्याला त्याच्या पदावरून दूर करण्यात येईल. राज्य मुख्य माहिती आयुक्तास किंवा राज्य माहिती आयुक्तास पदावरून दूर करणे.

(२) ज्याच्या बाबतीत पोटकलम (१) अन्वये सर्वोच्च न्यायालयाकडे निर्देश करण्यात आला आहे अशा, राज्य मुख्य माहिती आयुक्तास किंवा राज्य माहिती आयुक्तास, राज्यपाल, अशा निर्देशावर सर्वोच्च न्यायालयाकडून अभिप्राय प्राप्त होऊन आपल्याकडून आदेश दिला जाईपर्यंत पदावरून निलंबित करू शकेल आणि आवश्यक वाटल्यास चौकशी चालू असताना त्याला कार्यालयात उपस्थित राहण्यास मनाई देखील करू शकेल.

(३) पोटकलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, यथास्थिति, राज्य मुख्य माहिती आयुक्तास, किंवा राज्य माहिती आयुक्तास जर,—

(क) नादार म्हणून ठरवण्यात आले असेल तर ; किंवा

(ख) राज्यपालाच्या मते, ज्यामध्ये नैतिक अधःपतनाचा अंतर्भाव आहे अशा एखाद्या अपराधाबद्दल दोषी ठरवले असेल तर ; किंवा

(ग) तो आपल्या पदावधीत आपल्या पदाच्या कर्तव्याव्यतिरिक्त इतर कोणतेही काम सवेतन करीत असेल तर ; किंवा

(घ) राज्यपालाच्या मते, मानसिक किंवा शारीरिक विकलतेमुळे त्या पदावर राहण्यास चालू ठेवण्यास तो अपात्र असेल तर ; किंवा

(ङ) राज्य मुख्य माहिती आयुक्त किंवा राज्य माहिती आयुक्त म्हणून कार्य करण्यात बाधा आणू शकतील असे त्याचे आर्थिक किंवा इतर हितसंबंध असतील तर, राज्यपालास आदेशाद्वारे, त्याला त्याच्या पदावरून दूर करता येईल.

(एक) मुख्यमंत्री, जी या समितीची अध्यक्षपदीय व्यक्ती असेल ;

(दोन) विधानसभेतील विरोधी पक्षनेता ; आणि

(तीन) मुख्यमंत्र्याने नामनिर्देशित करावयाचा एक कॅबिनेट मंत्री.

स्पष्टीकरण.— शंकानिरसनार्थ, याद्वारे, असे घोषित करण्यात येते की, विधानसभेतील विरोधी पक्षनेता म्हणून एखाद्या व्यक्तीला मान्यता देण्यात आली नसेल त्याबाबतीत, विधानसभेतील सरकारच्या विरोधी पक्षातील सर्वात मोठ्या गटाच्या नेत्यास विरोधी पक्षनेता मानण्यात येईल.

(४) राज्य माहिती आयोगाच्या कामकाजाचे सर्वसाधारण अधीक्षण, संचालन व व्यवस्थापन हे राज्य मुख्य माहिती आयुक्तांकडे निहित असेल व त्याला राज्य माहिती आयुक्त सहाय्य करतील आणि राज्य माहिती आयोगाला, या अधिनियमाखाली कोणत्याही इतर प्राधिकरणाच्या निदेशांना अधीन न राहता, स्वायत्तपणे वापरता येत असतील असे सर्व अधिकार वापरता येतील आणि करता येत असतील अशा सर्व कृती व गोष्टी करता येतील.

(५) राज्य मुख्य माहिती आयुक्त आणि राज्य माहिती आयुक्त हे कायदा, विज्ञान व तंत्रज्ञान, समाजसेवा, व्यवस्थापन, पत्रकारिता, जनसंपर्क माध्यम किंवा प्रशासन आणि शासन या विषयांचे व्यापक ज्ञान व अनुभव असलेल्या, सार्वजनिक जीवनातील प्रख्यात व्यक्ती असतील.

(६) राज्य मुख्य माहिती आयुक्त किंवा कोणताही राज्य माहिती आयुक्त, हा यथास्थिती, संसदेचा सदस्य किंवा कोणत्याही राज्याच्या, किंवा संघ राज्यक्षेत्राच्या विधानमंडळाचा सदस्य असणार नाही, किंवा इतर कोणतेही लाभपद धारण करणार नाही, किंवा कोणत्याही राजकीय पक्षाशी संबंधित असणार नाही किंवा कोणताही उद्योगधंदा अथवा व्यवसाय करणार नाही.

(७) राज्य माहिती आयोगाचे मुख्यालय हे, राज्य शासन राजपत्रातील अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील अशा ठिकाणी असेल, आणि राज्य माहिती आयोगास, राज्य शासनाच्या पूर्वमान्यतेने, राज्यात अन्य ठिकाणी कार्यालये स्थापन करता येतील.

पदावधी व सेवेच्या शर्ती. १६. (१) राज्य मुख्य माहिती आयुक्त, ज्या दिनांकास आपले पद धारण करील त्या दिनांकापासून पाच वर्षांच्या कालावधीसाठी ते पद धारण करील, आणि तो पुनर्नियुक्तीस पात्र असणार नाही :

परंतु, कोणताही राज्य मुख्य माहिती आयुक्त, त्याच्या वयाची पासष्ट वर्षे पूर्ण झाल्यानंतर ते पद धारण करणार नाही.

(२) प्रत्येक राज्य माहिती आयुक्त, ज्या दिनांकास आपले पद धारण करील त्या दिनांकापासून पाच वर्षांच्या कालावधीपर्यंत किंवा त्याच्या वयाची पासष्ट वर्षे पूर्ण होईपर्यंत, यांपैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत आपले पद धारण करील, आणि, तो राज्य माहिती आयुक्त म्हणून पुनर्नियुक्तीस पात्र असणार नाही :

परंतु, प्रत्येक राज्य माहिती आयुक्त, या पोट-कलमान्वये आपले पद रिक्त केल्यानंतर, कलम १५ च्या पोट-कलम (३) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या रीतीने, राज्य मुख्य माहिती आयुक्त म्हणून नियुक्त केला जाण्यास पात्र असेल :

परंतु, आणखी असे की, राज्य माहिती आयुक्ताची राज्य मुख्य माहिती आयुक्त म्हणून नियुक्ती झाली असेल त्याबाबतीत, राज्य माहिती आयुक्त आणि राज्य मुख्य माहिती आयुक्त म्हणून होणारा त्याचा एकूण पदावधी पाच वर्षांहून अधिक असणार नाही.

(३) राज्य मुख्य माहिती आयुक्त किंवा एखादा राज्य माहिती आयुक्त, आपले पद ग्रहण करण्यापूर्वी, राज्यपालाच्या समक्ष किंवा त्यासंदर्भात त्याने नियुक्त केलेल्या इतर कोणत्याही व्यक्तीच्या समक्ष, पहिल्या अनुसूचीत त्या प्रयोजनार्थ दिलेल्या नमुन्यानुसार, शपथ किंवा प्रतिज्ञा घेईल.

(४) राज्य मुख्य माहिती आयुक्तास किंवा राज्य माहिती आयुक्तास, कोणत्याही वेळी, राज्यपालास उद्देशून आपल्या सहीनिशी पत्र लिहून आपल्या पदाचा लेखी राजीनामा देता येईल :

परंतु, राज्य मुख्य माहिती आयुक्तास किंवा राज्य माहिती आयुक्तास कलम १७ अन्वये विनिर्दिष्ट केलेल्या रीतीने पदावरून दूर करता येईल.

(४) संसदेच्या, किंवा यथास्थिति, राज्य विधानमंडळाच्या अन्य कोणत्याही अधिनियमात विरोधात असे काहीही अंतर्भूत असले तरी, यथास्थिति, केंद्रीय माहिती आयोग किंवा राज्य माहिती आयोग, या अधिनियमान्वये कोणत्याही तक्रारीची चौकशी करताना, सार्वजनिक प्राधिकरणाच्या नियंत्रणाखालील ज्या अभिलेखास हा अधिनियम लागू होतो, अशा कोणत्याही अभिलेखाची तपासणी करील, आणि सार्वजनिक प्राधिकरण कोणत्याही कारणास्तव, आयोगापासून असा कोणताही अभिलेख रोखून ठेवणार नाही.

(पहिले अपील)

अपील. १९. (१) ज्या कोणत्याही व्यक्तीला, कलम ७ च्या पोटकलम (१) किंवा पोटकलम (३) चा खंड (क) अन्वये त्यामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या वेळेत निर्णय प्राप्त झाला नसेल, किंवा यथास्थिति, केंद्रीय जन माहिती अधिकारी, किंवा राज्य जन माहिती अधिकारी यांच्या निर्णयाने जी व्यथित झालेली असेल, अशी कोणत्याही व्यक्तीला, अशी मुदत संपल्यापासून किंवा असा निर्णय प्राप्त झाल्यापासून तीस दिवसांच्या आत प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणांमधील यथास्थिति, केंद्रीय जन माहिती अधिकारी, किंवा राज्य जन माहिती अधिकारी यांच्यापेक्षा वरिष्ठ दर्जाच्या अशा अधिकाऱ्याकडे अपील करता येईल:

परंतु, अपीलकर्त्याला वेळेत अपील दाखल न करण्यास पुरेसे कारण होते, अशी त्या अधिकाऱ्याची खात्री पटल्यास, त्याला किंवा तिला तीस दिवसांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर अपील दाखल करून घेता येईल.

(२) कलम ११ अन्वये, त्रयस्थ पक्षाची माहिती प्रकट करण्याबाबत, यथास्थिति, केंद्रीय जन माहिती अधिकाऱ्याने किंवा राज्य जन माहिती अधिकाऱ्याने दिलेल्या आदेशाविरुद्ध अपील दाखल करण्यात आलेले असेल अशा प्रकरणात, संबंधित त्रयस्थ पक्षाद्वारे करावयाचे अपील हे आदेशाच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत करण्यात येईल.

(दुसरे अपील)

(३) पोटकलम (१) खालील निर्णयाविरुद्धचे दुसरे अपील, ज्या दिनांकास निर्णय घ्यावयास हवा होता किंवा प्रत्यक्षात मिळाला होता त्या दिनांकापासून नव्वद दिवसांच्या आत, केंद्रीय माहिती आयोगाकडे किंवा राज्य माहिती आयोगाकडे दाखल करता येईल:

परंतु, अपीलकर्त्याला वेळेत अपील दाखल न करण्यास वाजवी कारण होते अशी, यथास्थिति, केंद्रीय माहिती आयोगाची किंवा राज्य माहिती आयोगाची खात्री पटली तर, नव्वद दिवसांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर त्याला अपील दाखल करून घेता येईल.

(४) ज्याच्या संबंधात अपील दाखल करण्यात आले असेल, असा यथास्थिति, केंद्रीय जन माहिती अधिकाऱ्याचा, किंवा राज्य जन माहिती अधिकाऱ्याचा निर्णय जर, त्रयस्थ पक्षाच्या माहितीच्या संबंधात असेल तर, यथास्थिति, केंद्रीय माहिती आयोग, किंवा राज्य माहिती आयोग त्या त्रयस्थ पक्षाला, आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देईल.

(५) कोणत्याही अपील कार्यवाहीमध्ये विनंती नाकारणे हे समर्थनीय होते हे सिद्ध करण्याचा भार, ज्याने विनंती नाकारली होती त्या, यथास्थिति, केंद्रीय जन माहिती अधिकाऱ्यावर, किंवा राज्य जन माहिती अधिकाऱ्यावर असेल;

(६) पोटकलम (१) किंवा पोटकलम (२) अन्वये केलेले अपील, ते मिळाल्याच्या दिनांकापासून यथास्थिति, तीस दिवसांच्या आत, किंवा ते दाखल केल्याच्या दिनांकापासून एकूण पंचेचाळीस दिवसांपेक्षा अधिक होणार नाही अशा वाढविलेल्या कालावधीच्या आत, कारणे लेखी नमूद करून, निकालात काढण्यात येईल.

(७) केंद्रीय माहिती आयोगाचा, किंवा यथास्थिति, राज्य माहिती आयोगाचा निर्णय बंधनकारक असेल.

(८) केंद्रीय माहिती आयोगास किंवा यथास्थिति, राज्य माहिती आयोगास, आपल्या निर्णयाद्वारे पुढील अधिकार असतील,—

(क) या अधिनियमाच्या तरतुदीचे अनुपालन करणे सुनिश्चित करण्यासाठी आवश्यक असतील अशा उपाययोजना करण्यास सार्वजनिक प्राधिकरणाला फर्मावणे; ज्यामध्ये पुढील गोष्टींचाही समावेश असेल,—

(एक) एखाद्या विशिष्ट स्वरूपात माहिती मिळण्याची विनंती केली असल्यास त्या स्वरूपात माहिती पुरवणे;

(४) राज्य मुख्य माहिती आयुक्त किंवा राज्य माहिती आयुक्त, एखाद्या विधिसंस्थापित कंपनीचा सदस्य म्हणून नव्हे तर, अन्य कोणत्याही प्रकारे आणि त्या कंपनीच्या अन्य सदस्यांसह सामाईकपणे जर राज्य शासनाने अथवा त्याच्या वतीने केलेल्या कोणत्याही संविदेशी किंवा करारांशी कोणत्याही रीतीने संबंधित किंवा हितसंबंधित असेल किंवा त्याच्या नफ्यात किंवा त्यामधून उद्भवणाऱ्या कोणत्याही लाभांत किंवा वित्तलब्धीत कोणत्याही रीतीने सहभागी झाला असेल तर, तो पोटकलम (१) च्या प्रयोजनासाठी गैरवर्तनाबद्दल दोषी असल्याचे मानले जाईल.

## प्रकरण पाच

### माहिती आयोगांचे अधिकार व कार्ये, अपीले व शास्ती

...ती आयोगांचे ...कार व कार्ये.

१८. (१) या अधिनियमाच्या तरतुदींना अधीन राहून, पुढील व्यक्तीकडून तक्रार स्वीकारणे व त्याची चौकशी करणे हे, यथास्थिति, केंद्रीय माहिती आयोग, किंवा राज्य माहिती आयोग यांचे कर्तव्य असेल.—

(क) एकतर, या अधिनियमानुसार कोणताही असा अधिकारी नियुक्त करण्यात आला नाही या कारणास्तव किंवा केंद्रीय सहायक जन माहिती अधिकारी, किंवा यथास्थिति, राज्य सहायक जन माहिती अधिकारी याने, ज्या व्यक्तीचा या अधिनियमान्वये माहितीसाठीचा किंवा अपिलासाठीचा अर्ज, यथास्थिति, केंद्रीय जन माहिती अधिकाऱ्याकडे, राज्य जन माहिती अधिकाऱ्याकडे, कलम १९ च्या पोटकलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या वरिष्ठ अधिकाऱ्याकडे, केंद्रीय माहिती आयोगाकडे किंवा राज्य माहिती आयोगाकडे अग्रेषित करण्यासाठी स्वीकारण्यास नकार दिला असल्याच्या कारणास्तव, यथास्थिति, केंद्रीय जन माहिती अधिकाऱ्याकडे, किंवा राज्य जन माहिती अधिकाऱ्याकडे विनंतीचा अर्ज सादर करण्यास जी असमर्थ ठरली असेल अशी व्यक्ती ;

(ख) या अधिनियमान्वये मागणी करण्यात आलेली कोणतीही माहिती मिळण्यास नकार मिळालेली व्यक्ती ;

(ग) या अधिनियमान्वये माहितीसाठी किंवा माहिती मिळवण्यासाठी केलेल्या मागणीस विनिर्दिष्ट मुदतीत प्रतिसाद न मिळालेली व्यक्ती ;

(घ) अवाजवी वाटत असलेली फी भरण्यास जिला भाग पाडण्यात आले असेल अशी व्यक्ती ;

(ङ) या अधिनियमान्वये, आपल्याला अपुरी, दिशाभूल करणारी किंवा खोटी माहिती देण्यात आली असे जिला वाटत असेल अशी व्यक्ती ; आणि

(च) या अधिनियमान्वये अभिलेख मिळविता येण्याच्या किंवा त्यासाठी विनंती करण्याच्या संबंधातील इतर कोणत्याही बाबीविषयी तक्रार करणारी व्यक्ती.

(२) एखाद्या प्रकरणामध्ये चौकशी करण्यासाठी वाजवी कारणे आहेत याबाबत जर, यथास्थिति, केंद्रीय माहिती आयोगाची किंवा राज्य माहिती आयोगाची खात्री झाली असेल तर आयोग त्याबाबतची चौकशी सुरू करील.

(३) या कलमान्वये कोणत्याही बाबीची चौकशी करताना, यथास्थिति, केंद्रीय माहिती आयोगाला, किंवा राज्य माहिती आयोगाला पुढील बाबतीत, दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ (१९०८ चा ५) याअन्वये दाव्याची न्यायचौकशी करताना दिवाणी न्यायालयाकडे जे अधिकार निहित करण्यात आलेले आहेत, तेच अधिकार असतील :—

(क) व्यक्तींना हजर राहण्याबाबत समन्स पाठवून त्यांना हजर करविणे आणि त्यांना शपथेवर तोंडी किंवा लेखी साक्षीपुरावा देण्यास व दस्तऐवज किंवा वस्तू सादर करण्यास भाग पाडणे ;

(ख) दस्तऐवजांचा शोध घेण्यास आणि पाहणी करण्यास फर्मावणे ;

(ग) शपथपत्रावर साक्षीपुरावा घेणे ;

(घ) कोणत्याही न्यायालयाकडून किंवा कार्यालयाकडून कोणताही शासकीय अभिलेख किंवा त्याच्या प्रती यांची मागणी करणे ;

(ङ) साक्षीदारांची किंवा दस्तऐवजांची तपासणी करण्याकरिता समन्स काढणे ; आणि

(च) विहित करता येईल अशी अन्य कोणतीही बाब ;

## प्रकरण सहा

### संकीर्ण

**सद्भावनेने केलेल्या कृतीला संरक्षण.**

२१. या अधिनियमान्वये किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही नियमान्वये सद्भावनेने केलेल्या किंवा सद्भावनेने करण्याचे अभिप्रेत असलेल्या कोणत्याही गोष्टीबद्दल, कोणत्याही व्यक्तीविरुद्ध कोणताही दावा, खटला किंवा अन्य कायदेशीर कार्यवाही दाखल करण्यात येणार नाही.

**अधिनियमाचा अधिभावी परिणाम.**

२२. या अधिनियमाच्या तरतुदी या, शासकीय गुपिते अधिनियम, १९२३ (१९२३ चा १९) यामध्ये, त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यामध्ये किंवा या अधिनियमाखेरीज कोणत्याही अन्य कायद्याच्या आधारे अंमलात असणाऱ्या कोणत्याही संलेखामध्ये त्यांच्याशी विसंगत असे काहीही अंतर्भूत असले तरी, अंमलात येतील.

**न्यायालयांच्या अधिकारितेस आडकाठी.**

२३. कोणतेही न्यायालय, या अधिनियमान्वये दिलेल्या कोणत्याही आदेशाच्या संबंधातील कोणताही दावा, अर्ज किंवा इतर कार्यवाही दाखल करून घेणार नाही आणि या अधिनियमान्वये केलेल्या अपिलाद्वारे असेल त्याखेरीज, अशा आदेशा प्रश्नास्पद करता येणार नाही.

**विवक्षित संघटनांना हा अधिनियम लागू नसणे.**

२४. (१) या अधिनियमात अंतर्भूत असलेली कोणतीही गोष्ट, दुसऱ्या अनुसूचीत विनिर्दिष्ट केलेल्या गुप्तवार्ता व सुरक्षा संघटना यांसारख्या, केंद्र सरकारने स्थापन केलेल्या संघटनांना किंवा अशा संघटनांनी त्या सरकारला सादर केलेल्या कोणत्याही माहितीला, लागू असणार नाही :

परंतु, भ्रष्टाचार व मानवी हक्कांचे उल्लंघन यांच्या आरोपांशी संबंधित माहिती या पोटकलमान्वये वगळण्यात येणार नाही :

परंतु आणखी असे की, मागितलेली माहिती ही, मानवी हक्कांच्या उल्लंघनाच्या आरोपासंदर्भात असल्यास, ती माहिती केंद्रीय माहिती आयोगाची मान्यता मिळाल्यावरच पुरवण्यात येईल, आणि कलम ७ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, अशी माहिती, विनंतीचा अर्ज मिळाल्याच्या दिनांकापासून पंचेचाळीस दिवसांच्या आत देण्यात येईल.

(२) केंद्र सरकारला, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे त्या सरकारने स्थापन केलेल्या अन्य कोणत्याही गुप्तवार्ता किंवा सुरक्षा संघटनांचा अनुसूचीमध्ये समावेश करून, किंवा तीमध्ये आधीपासून विनिर्दिष्ट केलेली कोणतीही संघटना त्यामधून वगळून, अनुसूचीमध्ये सुधारणा करता येईल आणि अशी अधिसूचना प्रसिद्ध झाल्यावर, अशी संघटना, यथास्थिती, अनुसूचीमध्ये समाविष्ट आल्याचे किंवा अनुसूचीमधून वगळल्याचे मानले जाईल.

(३) पोटकलम (२) अन्वये काढलेली प्रत्येक अधिसूचना, संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर ठेवण्यात येईल.

(४) अशा गुप्तवार्ता व सुरक्षा संघटना या, राज्य शासनाने स्थापन केलेल्या संघटना असल्याचे शासनाने राजपत्रातील अधिसूचनेद्वारे वेळोवेळी विनिर्दिष्ट केलेले असल्यामुळे, या अधिनियमात अंतर्भूत असलेली कोणतीही गोष्ट त्यांना लागू होणार नाही :

परंतु, भ्रष्टाचार व मानवी हक्कांचे उल्लंघन यांच्या आरोपांशी संबंधित माहिती, या पोटकलमान्वये वगळण्यात येणार नाही :

परंतु आणखी असे की, मागितलेली माहिती ही मानवी हक्कांच्या उल्लंघनाच्या आरोपासंदर्भात असेल तर, अशी माहिती, राज्य माहिती आयोगाची मान्यता मिळाल्यावरच देता येईल आणि कलम ७ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, अशी माहिती, विनंतीचा अर्ज मिळाल्याच्या दिनांकापासून पंचेचाळीस दिवसांच्या आत पुरवण्यात येईल.

(५) पोटकलम (४) अन्वये काढलेली प्रत्येक अधिसूचना राज्य विधानमंडळासमोर ठेवण्यात येईल.

**संनियंत्रण करणे व अहवाल देणे.**

२५. (१) केंद्रीय माहिती आयोग, किंवा यथास्थिती, राज्य माहिती आयोग, यथाशक्य लवकर, प्रत्येक वर्ष संपल्यानंतर या अधिनियमाच्या तरतुदीच्या त्या वर्षातील अंमलबजावणीबाबतचा अहवाल तयार करील व त्याची एक प्रत समुचित शासनाला पाठवील.

(दोन) केंद्रीय जन माहिती अधिकाऱ्याची, किंवा यथास्थिति, राज्य जन माहिती अधिकाऱ्याची नियुक्ती करणे ;

(तीन) विवक्षित माहिती किंवा माहितीचे प्रवर्ग प्रसिद्ध करणे ;

(चार) अभिलेख ठेवणे, त्यांची व्यवस्था ठेवणे व ते नष्ट करणे, यासंबंधीतील त्याच्या पद्धतीत आवश्यक ते बदल करणे ;

(पाच) त्याच्या अधिकाऱ्यांना माहितीच्या अधिकाराचे प्रशिक्षण देण्याच्या तरतुदीत वाढ करणे ;

(सहा) कलम ४ च्या पोटकलम (१) च्या खंड (ख) चे अनुपालन करून आयोगाला वार्षिक अहवाल सादर करणे ;

(ख) कोणत्याही नुकसानीबद्दल किंवा झालेल्या अन्य हानीबद्दल भरपाई देण्यासाठी सार्वजनिक प्राधिकरणाला फर्मावणे ;

(ग) या अधिनियमामध्ये तरतूद केलेली कोणतीही शास्ती लादणे ;

(घ) अर्ज फेटाळणे.

(९) केंद्रीय माहिती आयोग, किंवा यथास्थिति, राज्य माहिती आयोग तक्रारदाराला व सार्वजनिक प्राधिकरणाला आपल्या निर्णयाबाबत तसेच अपिलाच्या कोणत्याही हक्काबाबत कळवील.

(१०) केंद्रीय माहिती आयोग, किंवा यथास्थिति, राज्य माहिती आयोग, विहित करण्यात येईल अशा कार्यपद्धतीनुसार अपिलावर निर्णय देईल.

शास्ती. २०. (१) केंद्रीय माहिती आयोगाने, किंवा यथास्थिति, राज्य माहिती आयोगाने कोणत्याही तक्रारीवर किंवा अपिलावर निर्णय देतेवेळी, यथास्थिती, केंद्रीय जन माहिती अधिकाऱ्याने, किंवा राज्य जन माहिती अधिकाऱ्याने, कोणत्याही वाजवी कारणाशिवाय माहिती मिळण्याबाबतचा अर्ज स्वीकारण्यास नकार दिला आहे, किंवा कलम ७ च्या पोटकलम (१) अन्वये विनिर्दिष्ट केलेल्या वेळेत माहिती सादर केलेली नाही, किंवा माहिती मिळवण्यासाठी केलेली विनंती दुष्ट हेतूने नाकारली आहे, किंवा जाणूनबुजून चुकीची, अपूर्ण किंवा दिशाभूल करणारी माहिती दिलेली आहे, किंवा मागितलेली माहिती नष्ट केलेली आहे, किंवा माहिती सादर करण्यात कोणत्याही प्रकारे अडथळा आणला आहे, असे आयोगाचे मत झाले असेल तर, तो, अर्ज स्वीकारीपर्यंत किंवा माहिती देईपर्यंत प्रत्येक दिवसाला रुपये दोनशे पन्नास इतकी शास्ती लादेल, तथापि, अशा शास्तीची एकूण रक्कम पंचवीस हजार रुपयांपेक्षा अधिक असणार नाही :

परंतु, केंद्रीय जन माहिती अधिकाऱ्यास, किंवा यथास्थिति, राज्य जन माहिती अधिकाऱ्यास, त्याच्यावर कोणतीही शास्ती लादण्यापूर्वी आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देण्यात येईल :

परंतु आणखी असे की, त्याने केलेली कृती ही वाजवी होती हे शाबीत करण्याची जबाबदारी, यथास्थिती, केंद्रीय जन माहिती अधिकाऱ्यावर, किंवा राज्य जन माहिती अधिकाऱ्यावर असेल.

(२) केंद्रीय माहिती आयोगाचे, किंवा यथास्थिति, राज्य माहिती आयोगाचे, कोणत्याही तक्रारीवर किंवा अपिलावर निर्णय देतेवेळी जर असे मत झाले असेल की, यथास्थिती, केंद्रीय जन माहिती अधिकाऱ्याने, किंवा राज्य जन माहिती अधिकाऱ्याने, कोणत्याही वाजवी कारणाशिवाय आणि सातत्याने, माहिती मिळण्याबाबतचा अर्ज स्वीकारण्यात कसूर केली आहे किंवा कलम ७ च्या पोटकलम (१) अन्वये विनिर्दिष्ट केलेल्या वेळेत माहिती सादर केलेली नाही, किंवा माहिती मिळवण्याची विनंती दुष्ट हेतूने नाकारलेली आहे किंवा जाणूनबुजून चुकीची, अपूर्ण किंवा दिशाभूल करणारी माहिती दिलेली आहे, किंवा मागितलेली माहिती नष्ट केलेली आहे, किंवा माहिती सादर करण्यात कोणत्याही प्रकारे अडथळा आणला आहे, तर, आयोग, यथास्थिति, केंद्रीय जन माहिती अधिकाऱ्याविरुद्ध, किंवा राज्य जन माहिती अधिकाऱ्याविरुद्ध, त्याला लागू असलेल्या सेवानियमांन्वये शिस्तभंगाच्या कारवाईची शिफारस करील.

(२) समुचित शासन, या अधिनियमाच्या प्रारंभापासून अठरा महिन्यांच्या आत, या अधिनियमात विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही अधिकारांचा वापर करण्यास इच्छुक असणाऱ्या व्यक्तीला वाजवीरीत्या आवश्यक असेल अशी माहिती असणारी मार्गदर्शिका, अगदी सहज आकलन होईल अशा स्वरूपात व अशा पद्धतीने आपल्या राजभाषेत संकलित करील.

(३) समुचित शासन, आवश्यक असल्यास, पोट-कलम (२) मध्ये निर्दिष्ट केलेली मार्गदर्शक तत्त्वे नियमित कालांतराने अद्यावत करून प्रसिद्ध करील, आणि विशेषतः व पोट-कलम (२) च्या सर्वसाधारणतेला बाध न येऊ देता या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये पुढील गोष्टींचा समावेश असेल —

(क) या अधिनियमाची उद्दिष्टे ;

(ख) प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाचा, कलम ५ च्या पोट-कलम (१) अन्वये नेमणूक केलेला यथास्थिति, केंद्रीय जन माहिती अधिकारी किंवा राज्य जन माहिती अधिकारी यांचा पत्रव्यवहाराचा पत्ता, दूरध्वनी व फॅक्स क्रमांक आणि, उपलब्ध असल्यास, ई-मेल ॲड्रेस ;

(ग) केंद्रीय जन माहिती अधिकारी, किंवा यथास्थिति, राज्य जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मिळविण्याकरिता विनंती करण्याची रीत व तिचे स्वरूप ;

(घ) या अधिनियमान्वये, सार्वजनिक प्राधिकरणाचा, यथास्थिति, केंद्रीय जन माहिती अधिकारी किंवा राज्य जन माहिती अधिकारी यांच्याकडून उपलब्ध होणारे सहाय्य व त्यांची कर्तव्ये ;

(ङ) केंद्रीय माहिती आयोग, किंवा यथास्थिति, राज्य माहिती आयोग यांच्याकडून उपलब्ध होणारे सहाय्य ;

(च) या अधिनियमाद्वारे प्रदान केलेल्या अधिकाराच्या किंवा लादलेल्या कर्तव्यांच्या बाबतीतील कृती किंवा कृती करण्यात केलेली कसूर यासंबंधात कायद्यातील उपाययोजना, तसेच आयोगाकडे अपील दाखल करण्याच्या पद्धती ;

(छ) कलम ४ अनुसार विविध प्रकारचे अभिलेख स्वेच्छेने प्रकट करण्यासाठी करण्यात आलेल्या तरतुदी ;

(ज) माहिती मिळविण्यासाठी केलेल्या विनंतीच्या संबंधात द्यावयाच्या फीसंबंधीची नोटीस ; आणि

(झ) या अधिनियमानुसार माहिती मिळविण्यासंबंधात करण्यात आलेले कोणतेही अतिरिक्त विनियम अथवा काढण्यात आलेली परिपत्रके.

(४) समुचित शासनाने, आवश्यकता वाटल्यास मार्गदर्शक तत्त्वे नियमित कालांतराने अद्यावत करून ती प्रसिद्ध केलीच पाहिजेत.

२७. (१) समुचित शासनाला, या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणण्यासाठी, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नियम करता येतील. समुचित शासनाचा नियम करण्याचा अधिकार.

(२) विशेषतः, आणि पूर्वगामी अधिकाराच्या सर्वसाधारणतेला बाध न येऊ देता या नियमांमध्ये, पुढीलपैकी सर्व किंवा कोणत्याही बाबीसाठी तरतूद करता येईल :—

(क) कलम ४ च्या पोट-कलम (४) अन्वये ज्याचा प्रसार करावयाचा आहे अशा साहित्याच्या माध्यमाच्या खर्चाएवढी किंवा मुद्रणाच्या खर्चाएवढी किंमत ;

(ख) कलम ६ च्या पोट-कलम (१) अन्वये देय असलेली फी ;

(ग) कलम ७ च्या पोट-कलमे (१) आणि (५) अन्वये देय असलेली फी ;

(घ) अधिकारी आणि कर्मचारी यांना कलम १३ च्या पोट-कलम (६) अन्वये देय असलेले वेतन व भत्ते आणि कलम १६ च्या पोट-कलम (६) खालील त्यांच्या सेवेच्या अटी व शर्ती ;

(ङ) कलम १९ च्या पोट-कलम (१०) अन्वये दाखल केलेल्या अपिलांवर निर्णय देतेवेळी यथास्थिति, केंद्रीय माहिती आयोगाने, किंवा राज्य माहिती आयोगाने अनुसरावयाची कार्यपद्धती ; आणि

(च) विहित करणे आवश्यक असेल अशी अथवा विहित करण्यात येईल अशी अन्य कोणतीही बाब.

(२) प्रत्येक मंत्रालय किंवा विभाग त्यांच्या अधिकारितेतील सार्वजनिक प्राधिकरणासंबंधी माहिती गोळा करील आणि या कलमान्वये अहवाल तयार करण्यासाठी आवश्यक असेल अशी माहिती, यथास्थिति, केंद्रीय माहिती आयोग, किंवा राज्य माहिती आयोग यांना देईल आणि ही माहिती पुरवण्यासंबंधातील आणि या कलमाच्या प्रयोजनांकरिता अभिलेख ठेवण्यासंबंधातील आवश्यक बाबींचे अनुपालन करील.

(३) प्रत्येक अहवालात, तो अहवाल ज्या वर्षासंबंधी असेल त्यासंबंधात पुढील गोष्टी नमूद केलेल्या असतील :—

(क) प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाकडे आलेल्या विनंतीच्या अर्जांची संख्या ;

(ख) ज्याद्वारे अर्जदार विनंतीला अनुसरून दस्तऐवज मिळण्यास हक्कदार नसल्याचे आढळले त्यासंबंधीत अशा निर्णयांची संख्या, हे निर्णय ज्या अधिनियमाच्या तरतुदीन्वये केले जातात त्या तरतुदी आणि अशा तरतुदींचा जितक्या वेळा आधार घेण्यात आला आहे ती संख्या ;

(ग) पुनर्विलोकनासाठी यथास्थिती, केंद्रीय माहिती आयोग किंवा राज्य माहिती आयोग यांच्याकडे विचारार्थ पाठविलेल्या अपिलांची संख्या, अपिलांचे स्वरूप आणि अपिलांची निष्पत्ती ;

(घ) या अधिनियमाच्या अंमलबजावणीबाबत कोणत्याही अधिकाऱ्याविरुद्ध केलेल्या कोणत्याही शिस्तभंगाच्या कार्यवाहीचा तपशील ;

(ङ) या अधिनियमान्वये प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाने वसूल केलेल्या आकारांची रक्कम ;

(च) या अधिनियमाचा आशय व हेतू याचे कार्यान्वयन व अंमलबजावणी करण्यासाठी सार्वजनिक प्राधिकरणांकडून केलेले प्रयत्न दर्शविणाऱ्या कोणत्याही गोष्टी ;

(छ) विकास, सुधारणा, आधुनिकीकरण, सुधार यांसाठी, विशेषतः सार्वजनिक प्राधिकरणाच्या संबंधातील शिफारशींसह सुधार करण्याकरिता केलेल्या शिफारशी, किंवा, हा अधिनियम किंवा इतर कायदा किंवा प्रारूढ विधि यातील सुधारणा किंवा माहिती मिळवण्याच्या अधिकाराची अंमलबजावणी करण्यासाठी संबद्ध असणारी अन्य उपाययोजना.

(४) केंद्र सरकारला, किंवा यथास्थिती, राज्य शासनाला व्यवहार्य असेल तितक्या, प्रत्येक वर्षाच्या अखेरीनंतर पोटकलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेली, यथास्थिती, केंद्रीय माहिती आयोग किंवा राज्य माहिती आयोग यांच्या अहवालाची एक प्रत, यथास्थिती, संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर किंवा राज्य विधानमंडळाची जेथे दोन सभागृहे आहेत तेथे त्या प्रत्येक सभागृहासमोर आणि जेथे राज्य विधानमंडळाचे एकच सभागृह असेल तेथे त्या सभागृहासमोर ठेवण्याची व्यवस्था करता येईल.

(५) या अधिनियमान्वये, सार्वजनिक प्राधिकरणाची कार्ये पार पाडण्यासंबंधीची त्यांची कार्यपद्धती या अधिनियमाच्या तरतुदींशी किंवा आशयाशी अनुरूप नाही, असे यथास्थिती, केंद्रीय माहिती आयोग किंवा राज्य माहिती आयोग यांना दिसून आल्यास, आयोगास अशी अनुरूपता आणण्यासाठी त्याच्या मते ज्या उपाययोजना करणे आवश्यक असेल त्या विनिर्दिष्ट करण्याची प्राधिकरणांना शिफारस करता येईल.

समुचित शासनाने कार्यक्रम तयार करणे.

२६. (१) समुचित शासनाला, वित्तीय व इतर साधनसंपत्तीच्या उपलब्धतेनुसार,—

(क) या अधिनियमान्वये अपेक्षित असलेल्या अधिकारांचा वापर कसा करावयाचा यासाठी समाजाचे, विशेषतः समाजातील उपेक्षित वर्गाचे प्रबोधन करण्याकरिता शैक्षणिक कार्यक्रम तयार करता येतील व त्यांचे आयोजन करता येईल ;

(ख) खंड (क) मध्ये निर्देश केलेले कार्यक्रम तयार करणे व त्यांचे आयोजन करणे, यांमध्ये सार्वजनिक प्राधिकरणांना सहभागी होण्यास आणि त्यांनी असे कार्यक्रम स्वतः हाती घेण्यास प्रोत्साहन देता येईल ;

(ग) सार्वजनिक प्राधिकरणांद्वारा त्यांच्या उपक्रमांविषयीची अचूक माहिती योग्यवेळी व प्रभावीपणे प्रसारित केली जाण्यास चालना देता येईल ; आणि

(घ) सार्वजनिक प्राधिकरणाचे, यथास्थिती केंद्रीय जन माहिती अधिकारी किंवा राज्य जन माहिती अधिकारी यांना, प्रशिक्षण देता येईल व सार्वजनिक प्राधिकरणांना त्यांच्या उपयोगाकरिता संबंधित प्रशिक्षण साहित्य पुरवता येईल.

[illegible]

महाराष्ट्र शासन,

सामान्य प्रशासन विभाग,

शासन आदेश क्रमांक-केमाअ-२००९/५३१/प्र.क्र.२६७/०९/माह

दिनांक - २४ जुलै २००९

वाचा:-

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ हा कायदा दिनांक १२/१०/२००५ पासून अमलात आला. या अधिनियमातील कलम ४ (१) (क) मधील तरतुदीप्रमाणे सार्वजनिक प्राधिकरणांनी सर्व अभिलेख रीतीने सूचिबद्ध करून त्यांची निर्देशसूची तयार करणे व संगणकीकरण करणे, संगणकीकरण करण्यास योग्य असलेल्या अभिलेखांचे वाजवी कालावधीत व साधन संपत्तीच्या उपलब्धतेनुसार संगणकीकरण करणे व ही माहिती नेटवर्कवर उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. कलम ४ (१) (ख) मधील तरतुदीनुसार हा अधिनियम अधिनियमित झाल्यापासून १२० दिवसाच्या आत १७ बाबींविषयीची माहिती तयार करून ती प्रसिद्ध करणे आवश्यक होते. तसेच ही माहिती वेळोवेळी अद्ययावतही करणे आवश्यक आहे. कलम ५(१) व ५ (२) मधील तरतुदी पाहता सार्वजनिक प्राधिकरणांनी आवश्यक असतील तेवढ्या कार्यालयात अधिनियमाखाली जन माहिती अधिकारी, व प्रथम अपिलीय प्राधिकारी म्हणून निर्देशित करणे आवश्यक आहे. शासनाने या कार्यवाहीबाबत वेळोवेळी सूचना निर्गमित केलेल्या आहेत. या उपरांत जनतेकडून या संदर्भात तक्रारी प्राप्त होत आहेत. दैनंदिन कामकाजाच्या व्यापामुळे अभिलेख सूचिबद्ध करणे व त्यांची निर्देशसूची तयार करणे इत्यादी कामे सार्वजनिक प्राधिकरणांनी पूर्ण न केल्याने माहिती पुरविण्यात विलंब होतो, असे निदर्शनास आले आहे.

अभिलेख सूचिबद्ध करणे व त्यांची निर्देशसूची तयार करणे याबाबीचे दीर्घकालीन महत्व विचारात घेता या कामासाठी विशेष मोहीम घेऊन ते प्राधान्याने पूर्ण करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याबाबत शासन पुढील आदेश देत आहे.

आदेश:-

(१) सर्व सार्वजनिक प्राधिकरणांनी ऑगस्ट २००९ मधील अंतिम सप्ताह हा अभिलेख सूचिबद्ध करणे व त्यांची निर्देशसूची तयार करणे, ही कामे या विशेष मोहिमेअंतर्गत प्राधान्याने हाती घ्यावीत. कार्यालयातील सर्व अभिलेखांची छाननी, वर्गवारी करून ते सर्व सूचिबद्ध करण्यात यावेत व त्यांच्या निर्देशसूच्या तयार करण्यात याव्यात. यासंदर्भात व आवश्यकतेनुसार दैनंदिन कामकाजाकडे या मोहिमेमुळे दुर्लक्ष होणार नाही, याचीही दक्षता सर्व सार्वजनिक प्राधिकरणांनी घेणे आवश्यक आहे.

(२) ज्या सार्वजनिक प्राधिकरणांनी अद्याप कलम ४ च्या तरतुदीस अनुसरून १७ बाबींवरील माहिती तयार करून जनतेकरीता उपलब्ध केलेली नाही व शासनाच्या वेबसाइटवर प्रसिद्ध केलेली नाही, त्यांनी सहायक जन माहिती अधिकारी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्यांना निर्देशित करून त्यांचे फलक दर्शनी ठिकाणी लावले नाहीत, अशा सार्वजनिक प्राधिकरणांनी ही कार्यवाही मोहिमेतील दिनांक ३१/८/२००९ पर्यंत अशी कार्यवाही पूर्ण करावी. दिनांक ३१/८/२००९ नंतर याबाबत जनतेकडून तक्रार प्राप्त झाल्यास संबंधितांविरुद्ध कठोर कारवाई करण्याची व संबंधित कार्यालय प्रमुखांच्या गोपनीय अहवालात नोंद घेण्याची कार्यवाही प्रशासकीय विभागांनी तत्काळ करावी.

(३) जिल्ह्यातील सर्व सार्वजनिक प्राधिकरणांनी जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचे फलक दर्शनी ठिकाणी प्रदर्शित करणे, १७ बाबींची माहिती तयार करून त्यास प्रसिद्धी देणे, या कामांकरीता घेतलेल्या आढाव्याचे अहवाल शासनाकडे प्राप्त झालेले नाहीत. त्यामुळे सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी त्यांच्या जिल्ह्याचे १०० टक्के अनुपालनासंबंधीचा एकत्रित अहवाल दिनांक ३१/८/२००९ पूर्वी शासनास पाठवावा. अहवाल पाठविताना जिल्ह्यातील सर्व सार्वजनिक प्राधिकरणांची यादी व त्यांच्या कार्यपूर्तीबाबतची नोंद त्यात असणे आवश्यक राहील.

(४) या मोहिमेच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या कार्यवाहीचा आढावा सर्व सार्वजनिक प्राधिकरणांनी त्यांच्या प्रशासकीय विभागांना सादर करावा व प्रशासकीय विभागांनी सामान्य प्रशासन विभागाकडे तो एकत्रितपणे दिनांक १५/०९/२००९ पूर्वी सादर करावा.

हे आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाइटवर संगणक संकेतांक २००९०७२४१०८५५००१ असा प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत.

२. उपरोक्त पार्श्वभूमी लक्षात घेता, शासन असे आदेश देत आहे की, माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये अर्जदारांना माहिती उपलब्ध होण्याच्या दृष्टीने शासनातील सर्व विभाग व त्यांच्या अधिपत्याखालील क्षेत्रिय कार्यालयांनी दरवर्षी दि. १ जानेवारी व १ जुलै रोजी असे वर्षातून किमान दोन वेळा संकेतस्थळावरील (website) माहिती अद्ययावत करावी. अधिकाऱ्यांसंदर्भातील काही माहिती जसे बदलीविषयक माहिती वेळोवेळी अद्ययावत केली जावी.

३. वरीलप्रमाणे माहिती संबंधित संकेतस्थळावर (website) वर दर्शविली जाईल याबाबत माहिती व तंत्रज्ञान विभागाने खातरजमा करावी.

(सही/-)

स्वाक्षरी/-

(डी.के. शंकरन)

शासनाच्या प्रधान सचिव

सक्षम प्राधिकाऱ्याचा नियम करण्याचा अधिकार.

२८. (१) या अधिनियमाच्या तरतुदी अमलात आणण्यासाठी, सक्षम प्राधिकाऱ्यास, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नियम करता येतील.

(२) विशेषतः, आणि पूर्वगामी अधिकाराच्या सर्वसाधारणतेस बाध न येऊ देता, या नियमांमध्ये पुढीलपैकी सर्व किंवा कोणत्याही बाबींसाठी तरतूद करता येईल :—

(एक) कलम ४ च्या पोट-कलम (४) अन्वये ज्याचा प्रसार करावयाचा आहे अशा साहित्याच्या प्रसिद्धी माध्यमाच्या खर्चाएवढी किंवा मुद्रणाच्या खर्चाएवढी किंमत ;

(दोन) कलम ६ च्या पोट-कलम (१) अन्वये देय असलेली फी ;

(तीन) कलम ७ च्या पोट-कलम (१) अन्वये देय असलेली फी ; आणि

(चार) विहित करणे आवश्यक असेल अशी अथवा विहित करण्यात येईल अशी, अन्य कोणतीही बाब.

नियम सभागृहांपुढे ठेवणे.

२९. (१) या अधिनियमान्वये केंद्र सरकारने केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर होईल तितक्या लवकर, संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर, ते सत्रासीन असताना, एका सत्राने बनलेल्या अथवा दोन किंवा अधिक क्रमवर्ती सत्रे मिळून बनलेल्या अशा एकूण तीस दिवसांच्या कालावधीकरिता ठेवला जाईल, आणि पूर्वोक्त सत्राच्या किंवा क्रमवर्ती सत्रांच्या पाठोपाठचे सत्र संपण्यापूर्वी जर, त्या नियमात कोणतेही फेरबदल करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले अथवा तो नियम करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले तर, त्यानंतर, तो नियम अशा फेरबदल केलेल्या स्वरूपातच अमलात येईल, किंवा यथास्थिति, मुळीच अमलात येणार नाही; तथापि, अशा कोणत्याही फेरबदलामुळे किंवा शून्यीकरणामुळे, तत्पूर्वी त्या नियमाखाली करण्यात आलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

(२) या अधिनियमान्वये राज्य शासनाने केलेला प्रत्येक नियम, तो अधिसूचित करण्यात आल्यानंतर होईल तितक्या लवकर, राज्य विधानमंडळापुढे ठेवण्यात येईल.

अडचणी दूर करण्याचा अधिकार.

३०. (१) या अधिनियमाच्या तरतुदी अमलात आणताना कोणतीही अडचण उद्भवली तर, केंद्र सरकारला, राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे, ती अडचण दूर करण्यासाठी त्यास आवश्यक वा इष्ट वाटतील अशा, या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसतील अशा तरतुदी करता येतील :

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर असा कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

(२) या कलमान्वये काढलेला प्रत्येक आदेश, तो काढण्यात आल्यानंतर होईल तितक्या लवकर, संसदेच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल.

निरसन.

३१. माहितीचे स्वातंत्र्य अधिनियम, २००२ (२००३ चा ५) हा याद्वारे निरसित करण्यात येत आहे.

माहितीचे दर

महाराष्ट्र शासनाने नियमांद्वारे विहित केलेले अर्जाचे व माहितीचे शुल्क

| माहितीचा प्रकार | शुल्क |
|---|---|
| अर्ज शुल्क | रुपये १०/- |
| माहितीचे शुल्क ए-४ व ए-३ आकाराचे कागद | रुपये २/- प्रति पृष्ठ |
| मोठ्या आकाराचे कागद, नकाशे इत्यादी. | प्रती देण्यासाठी प्रत्यक्ष येणारा खर्च (मात्र संबंधित विभागाने विशिष्ट दस्तऐवज नकाशे इत्यादींची किंमत आगोदर निश्चित केली असेल त्या बाबतीत निश्चित केलेली किंमत अधिक टपालखर्च) |
| काम, दस्तऐवज व अभिलेख यांचे पाहणी शुल्क | पहिला तास मोफत, त्यानंतर प्रत्येक पंधरा मिनिटांना किंवा त्याच्या भागाला रुपये ५/- |
| नमुना, मॉडेल | प्रत्यक्ष येणारा खर्च |
| डिस्केट, फ्लॉपी, सीडी, डीव्हीडी, इत्यादी | प्रत्येकी रुपये ५०/- |
| मुद्रित स्वरूपाचे साहित्य, पुस्तके, इत्यादी | प्रत्यक्ष छापील किंमत |

माहितीचे शुल्क भरण्याची पद्धती – डिमांड ड्राफ्ट, मनीऑर्डर, रोख रक्कम व बँकर्स चेक.

अर्जाचे शुल्क भरण्याची पद्धती – कोर्ट फी स्टँप, डिमांड ड्राफ्ट, रोख रक्कम व बँकर्स चेक.

[24]

महाराष्ट्र शासन
क्र. केमाअ-२००६/प्र.क्र.७/०६/भाग,
सामान्य प्रशासन विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २८.६.२००७

B.P.L.

प्रति,
सर्व अ.मु.स. / प्र.स. / सचिव,
सर्व मंत्रालयीन विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

विषय :- माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ दारिद्र्यरेषेखालील व्यक्तींनी सादर केलेल्या पुराव्या बाबत ग्राह्य धरण्याबाबत.

महोदय / महोदया,

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ७ च्या पोटकलम (५) मधील तरतुदीनुसार दारिद्र्यरेषेखालील व्यक्तीला माहिती मिळण्यासाठी कलम ६ च्या पोटकलम (१) तसेच कलम ७ च्या पोट कलम (१) व (५) नुसार कोणतीही फी भरावी लागणार नाही असे आहे. या तरतुदीचा लाभ घेण्यासाठी अर्जदार दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती आहे, याबाबतचा पुरावा अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. त्या संदर्भात पुढीलप्रमाणे स्पष्ट करण्यात येते :-

१. केंद्र शासनाकडून व राज्य शासनाकडून राबविण्यात येणाऱ्या कल्याणकारी योजनांचा लाभ दारिद्र्यरेषेखालील व्यक्तींना मिळवून देण्याकरीता विविध विभागांकडून दारिद्र्यरेषेखालील व्यक्तींचे सर्वेक्षण केले जाते.

२. शहरी क्षेत्रासाठी संबंधित महानगरपालिका, नगर परिषद, नगर पंचायत यांच्याकडून त्यांच्या क्षेत्रात [illegible] असलेल्या नागरिकांचे सर्वेक्षण करण्यात येते. त्यानुसार ज्या व्यक्तींचे वार्षिक उत्पन्न रु.५९१८०/- पेक्षा कमी आहे अशा व्यक्तिंना दारिद्र्यरेषेखालील व्यक्तींच्या यादीमध्ये समाविष्ट करण्यात येते. त्याची कार्यवाही करून तयार करण्यात आलेली यादी संबंधित महानगरपालिका, नगर परिषद, नगर पंचायत यांच्या कार्यालयात उपलब्ध असते.

३. तसेच ग्रामीण भागात राबविण्यात येणाऱ्या योजनांसाठी दारिद्र्यरेषेखालील व्यक्तींची माहिती घेण्याकरीता संबंधित ग्रामपंचायतीकडून अशा कुटुंबांचे सर्वेक्षण करण्यात येते. या सर्वेक्षणाकरीता पद्धतीमध्याच्या संबंधीच्या १३ बाबी निश्चित करून गुणांकन दिले जाते. या गुणांकनाच्या आधारे संबंधित ग्राम पंचायतीकडून दारिद्र्यरेषेखालील व्यक्तींची यादी तयार करण्यात येते व अशी यादी ग्रामपंचायतीकडे उपलब्ध असते.

३. तसेच अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या शासन निर्णय, क्र. सार्वित-१०९९/प्र.क्र.२८८(५)/ना.पु.२९, दि.३ ऑक्टोबर, १९९९ व क्र. सार्वित-१००१/प्र.क्र.८८(३)/ना.पु.२८, दि.८/८/२००१ अन्वये पिवळी शिधापत्रिका योजना राज्यात राबविण्यात येत आहे. या योजनेनुसार सर्व शासनाने त्यांच्या निकषानुसार निश्चित केलेल्या उत्पन्न मर्यादेपेक्षा कमी उत्पन्न असणाऱ्यांना पिवळ्या शिधापत्रिका देण्यात आल्या आहेत.

१) शहरी क्षेत्र ....... रु.१५,०००/-
२) ग्रामीण क्षेत्र (अनर्गल व आदिवासी क्षेत्रासह) ..... रु.१५,०००/-

या उत्पन्नाच्या मर्यादेत असलेल्या कुटुंबाकरीता पिवळ्या रंगाची शिधापत्रिका देण्यात पात्र ठरविण्यात आले आहे व असे कुटुंब सर्वसाधारणपणे दारिद्र्यरेषेखालील कुटुंब समजण्यात येते.

४. दारिद्र्यरेषेखालील कुटुंब ओळखण्याकरीता उपरोक्त तीन प्रकारे कार्यवाही करण्यात येते. या सर्व वस्तुस्थितीचा विचार करून सुचित करण्यात येते की, दारिद्र्यरेषेखालील ज्या अर्जदार व्यक्तीने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत केलेल्या अर्जासोबत किंवा सादर केलेल्या महानगरपालिका / नगर परिषद / ग्राम पंचायत / ग्रामपंचायत यांच्याकडे दारिद्र्यरेषेखालील असलेल्या व्यक्तींच्या यादीत त्याचे नाव असल्याचे संबंधितांकडून देण्यात आलेले प्रमाणपत्र किंवा पिवळ्या रंगाची शिधापत्रिका प्रतिची साक्षांकित प्रत जोडणे अनुज्ञेय राहील.

५. सदर बाबतीत आपल्या अधिनस्त असलेल्या विभागाशी निगडित असलेल्या सर्व सार्वजनिक प्राधिकरणांच्या निदर्शनास तत्काळ आणावे व या प्रकरणी आपल्याकडून करण्यात आलेल्या कार्यवाहीची माहिती या विभागास उपलब्ध करून द्यावी, ही विनंती.

(स्वाक्षरी/-)
(ज. द. जिचकार)
उपसचिव, महाराष्ट्र शासन

(७)



# महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम, २००५

भाग चार - अ

महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमान्वये तयार केलेले

(भाग एक, एक - अ आणि एक - ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश

सामान्य प्रशासन विभाग

मंत्रालय, मुंबई ४०००३२, दिनांक ११ ऑक्टोबर २००५

अधिसूचना

क्रमांक आरटीआय २००५/सी.आर.२१५/०५/५ : माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ (२००५ चा २२) याच्या कलम २७ च्या पोटकलम (२) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन याद्वारे पुढील नियम करत आहे :-

१. संक्षिप्त नाव व प्रारंभ :- (१) या नियमांना महाराष्ट्र माहिती अधिकार नियम, २००५ असे म्हणावे.

(२) ते दिनांक १२ ऑक्टोबर २००५ रोजी अमलात येतील.

२. व्याख्या - या नियमांमध्ये संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल, तर -

(क) "अधिनियम" याचा अर्थ माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ (२००५ चा २२) असा आहे.

(ख) "कलम" याचा अर्थ अधिनियमाचे कलम, असा आहे.

(ग) या नियमांमध्ये वापरण्यात आलेले परंतु व्याख्या न केलेले शब्द व शब्दप्रयोग यांना त्या अधिनियमामध्ये अनुक्रमे जे अर्थ नेमून दिलेले आहेत तेच अर्थ असतील.

३. माहिती मिळविण्याची कार्यपद्धती - कलम ६ च्या पोटकलम (१) अन्वये माहिती मिळविण्यासाठीचा विनंतीअर्ज, संबंधित राज्य जन माहिती अधिकाऱ्याकडे साध्या कागदावर जोडपत्र (अ)मध्ये दिलेल्या नमुन्यात करण्यात येईल, आणि त्यासोबत सार्वजनिक प्राधिकरणाला देय असलेली रुपये दहा इतकी अर्ज फी रोख स्वरूपात किंवा योग्य पावती घेऊन किंवा दर्शनी धनाकर्षाद्वारे किंवा बँकेच्या धनादेशाद्वारे जोडण्यात येईल किंवा त्यावर दहा रुपयांचा न्यायालयीन फी मुद्रांक चिकटविण्यात येईल.

(अ) ३क. एका विनंतीअर्जात केवळ एका विषयाशी संबंधित असणे - अधिनियमाच्या कलम ६ अन्वये माहिती मिळविण्यासाठीचा कोणताही विनंतीअर्ज एकाच विषयाशी संबंधित असावा आणि त्यात सर्वसाधारणपणे १५० पेक्षा अधिक शब्द नसावेत. अर्जदाराला एकापेक्षा अधिक विषयांची माहिती हवी असेल तर त्याकरिता स्वतंत्र अर्ज करील.

परंतु, एकापेक्षा अधिक विषयांशी संबंधित विनंती अर्ज केला असेल अशा प्रकरणी जन माहिती अधिकारी केवळ पहिल्या विषयाशी संबंधित विनंतीबद्दलच माहिती देईल आणि इतर विषयांसाठी स्वतंत्र विनंतीअर्ज करण्याचा सल्ला अर्जदाराला देईल.

सा. प्र. वि. अधिसूचना
दि : १६.०१.२०१२

(ब) ३ख. अभिलेख तपासण्याकरिता त्यांची मागणी करण्याची कार्यपद्धती - कलम ६ च्या पोटकलम (१) अन्वये अभिलेख तपासण्याकरिता त्याची मागणी करण्यासाठी अर्जदाराने दाखल केलेल्या अर्जावर निर्णय करण्यात आल्यानंतर, जन माहिती अधिकाऱ्याला सदर अर्ज योग्य असल्याचे आढळून आल्यास, अर्जदाराला अभिलेख तपासण्याकरिता परवानगी देण्यात येईल, आणि जर अशी परवानगी देण्यात आली तर जन माहिती अधिकारी, तपासणीसाठी अर्जदाराला पाहिजे असलेल्या अभिलेखांची विभागाच्या संबंधित कक्षाकडून मागणी करील आणि तो अभिलेख आपल्या उपस्थितीत किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या प्रतिनिधीच्या उपस्थितीत, कार्यालयीन वेळेत अर्जदाराला देईल. अशा अभिलेखाची तपासणी करताना अर्जदाराला केवळ पेन्सिलचा वापर करण्याची परवानगी असेल आणि अर्जदाराला पाहिजे असलेली माहिती त्याला पेन्सिलीने टिपून घेता येईल. जर अर्जदाराने पेन्सिलव्यतिरिक्त अन्य कोणतेही लेखनसाहित्य आणले तर तो ते लेखनसाहित्य जन माहिती अधिकाऱ्याकडे जमा करील आणि त्यानंतर त्याला अभिलेख तपासण्याची मुभा देण्यात येईल. अर्जदाराला तपासणीच्या वेळी जी पेन्सिल वापरण्याची मुभा देण्यात आलेली असेल त्या पेन्सिलीने अभिलेखांवर कोणत्याही प्रकारची खूण करता येणार नाही.

सा. प्र. वि. अधिसूचना दि. ३१.०१.२०१२

४. माहितीबद्दलची फी - (१) कलम ७ च्या पोटकलम (१) अन्वये माहिती पुरविण्यासाठी सार्वजनिक प्राधिकरणाला देय असलेली फी रोख स्वरूपात, किंवा योग्य पावती देऊन किंवा दर्शनी धनाकर्ष किंवा बँकेचा धनादेश या स्वरूपात किंवा न्यायालयीन फी मुद्रांकाच्या स्वरूपात पुढील दराने आकारण्यात येईल :-

(अ) (क) संबंधित विभागाने विनिर्दिष्ट केलेल्या किंवा निश्चित केलेल्या किंमत अथवा छायाप्रती, नकाशे इत्यादींची किंमत आगाऊच निश्चित केली असल्यास, खर्च.

(एक) तयार केलेल्या किंवा छापलेल्या साहित्याच्या बाबतीत,

(ख) माहिती असलेल्या प्रतीच्या (छायाप्रत किंवा) ... तयार केलेल्या प्रत्येक पृष्ठासाठी (ए-४ किंवा ए-३ आकारातील कागद) दोन रुपये अधिक

अन्य (प्रतीच्या) स्वरूपात पुरवावी लागणारी माहिती असेल त्या बाबतीत,

(दोन) मोठ्या आकारातील कागदाच्या प्रतीचा प्रत्यक्ष खर्च किंवा किंमत ... अधिक रुपये;

(ग) अभिलेख पाहण्यासाठी पहिल्या तासाकरिता कोणतीही फी नाही; आणि त्यानंतरच्या प्रत्येक पंधरा मिनिटांकरिता (किंवा त्याच्या भागासाठी) पाच रुपये इतकी फी;

परंतु, अर्जदार अधिनियमानुसार माहिती घेऊ इच्छित असेल त्या बाबतीत कोणतीही फी आकारण्यात येणार नाही.

क्र.रु.ओ.आर. ४१०/१२६२/सिव्हील/कॉन्फिडेंस/ओ बँच/दि.१९.८.२०१२ अन्वये अभिप्राय देताना पुढील प्रमाणे निरीक्षण नोंदले आहे.

" … the information which does not constitute any public interest and which would warrant overriding the provisions of Section 8(1)(j) of RTI Act, 2005 are not expected to be provided to the applicant under this Act, especially when it is intended to score the personal dispute with third party does not constitute public interest.

In view of above judgment of Karnataka High Court and the legal provision discussed above the State government can issue guidelines for the purpose of this Act as provided under Section 26(3)(a) of the RTI Act, 2005".

३. उपरोक्त पार्श्वभूमी लक्षात घेता सर्व मंत्रालयीन विभाग व त्यांच्या अधिपत्याखालील जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांना सूचित करण्यात येते की, वरिलप्रमाणे तसेच माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ८ पोट कलम (ज) मधील तरतूदी नुसार जी माहिती देण्याचे बंधन माहिती अधिकारावर नाही अशी आणि लोकहिताच्या दृष्टीने व्यापक जनहित साध्य न करणारी किंवा विशेषत: जी त्रयस्थाबरोबर उद्भवलेल्या वैयक्तिक वादांच्या अनुषंगाने मागविलेली माहिती, माहितीच्या अधिकारात अर्जदारास देण्यात येऊ नये.

३. सर्व मंत्रालयीन विभागांनी त्यांच्या अधिपत्याखालील सर्व सार्वजनिक प्राधिकरणे व त्यांच्या अधिपत्याखालील जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांना वरिलप्रमाणे सूचित करावे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१४१०१७१५२५४९२६०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Gosavi Pradeep P

Digitally signed by Gosavi Pradeep P
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=GAD, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Gosavi Pradeep P
Date: 2014.10.17 15:41:05 +05'30'

( प्र.प्र.गोसावी )
शासनाचे उपसचिव

प्रति,

१) मा.राज्यपाल यांचे सचिव,
२) मा.मुख्यमंत्री / मा.उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव/सचिव
३) उप सचिव, मुख्य सचिवांचे कार्यालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतूदींनुसार व्यापक जनहिताशी संबंध नसलेली वैयक्तिक स्वरुपाची माहिती न पुरविण्याबाबत



महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन परिपत्रक क्रमांक: संकीर्ण २०१३/८८९/प्र.क्र.४७४/सहा,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
तारीख: १७ ऑक्टोबर, २०१४

परिपत्रक :-

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ८ मध्ये जी माहिती पुरविण्याचे आबंधन माहिती अधिकाऱ्यावर असणार नाही त्या बाबी नमूद करण्यात आल्या आहेत. यांचे कलमाच्या पोटकलम (ज) मधील तरतूदीनुसार जी माहिती प्रकट करणे हे व्यापक लोकहिताच्या दृष्टीने आवश्यक आहे अशी, यथास्थिती केंद्रिय जन माहिती अधिकाऱ्याची, राज्य जन माहिती अधिकाऱ्याची किंवा अपील प्राधिकाऱ्याची खात्री पटली असेल, ती खेरीजकरुन, जी माहिती प्रकट करण्याचा कोणत्याही सार्वजनिक कामकाजाशी किंवा हितसंबंधाशी काहीही संबंध नाही किंवा जी व्यक्तीच्या खाजगी बाबीत अनाठायी हस्तक्षेप करील, अशी वैयक्तिक तपशीलासंबंधातील माहिती देण्याचे बंधनही माहिती अधिकाऱ्यांवर नसल्याबाबत स्पष्टता करण्यात आलेली आहे. त्याचबरोबर शासकीय कर्मचारी/अधिकाऱ्यास त्याच्या सेवाकालावधीत मिळालेली ज्ञापने, कारणे दाखवा नोटीस, शिक्षादेश, त्याच्या सेवा नियमांतर्गत कामगिरीबाबतचा अहवाल, त्याच्या चल/अचल संपत्तीबाबतची माहिती, त्याने केलेली आर्थिक गुंतवणूक वा बँक किंवा अन्य वित्तिय संस्थांकडून घेतलेली कर्जे, त्याच्या मुलांच्या विवाहात मिळालेल्या भेटी, आयकर विवरणपत्र यासारखी वैयक्तिक तपशीलासंबंधातील माहिती देण्याचे बंधन माहिती अधिकाऱ्यांवर नसल्याचा निर्णय स्पेशल लीव्ह पिटीशन क्र.२७७३४/२०१२ गिरिश रामचंद्र देशपांडे विरुध्द केंद्रीय माहिती आयोग या प्रकरणात दि.३.१०.२०१२ रोजी मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेला आहे. या संदर्भात निर्णय देताना मा.सर्वोच्च न्यायालयाने निर्णयपत्राच्या परिच्छेद १३ मध्ये पुढील प्रमाणे निरीक्षण नोंदले आहे.

१३. We are in the agreement with the CIC and the courts below that the details called for by the petitioner i.e. copies of all memos issued to the third respondent, show cause notices and orders of censure/punishment, etc. are qualified to be personal information as defined in clause (j) of section ८(१) of RTI Act. The performance of an employee/officer in an organization is primarily a matter between the employee and employer and normally those aspects are governed by the service rules which fall under the expression "personal information", the discloser of which would cause unwarranted invasion of privacy of that individual.

२. श्री.एच.ई.राजसरकरप्पा विरुध्द राज्य जन माहिती अधिकारी (याचिका क्र.१०६६३/२००६) मध्ये उच्च न्यायालय कर्नाटक यांनी दिलेल्या निर्णयाच्या आधारे विधि व न्याय विभागाने अशी संदर्भ

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ माहिती उपलब्ध करून देण्याकरिता घ्यावयाच्या शुल्काबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन परिपत्रक क्रमांक : केमाअ - २००७/प्र.क्र.३४/०७/५
मंत्रालय, मुंबई - ४०००३२
दिनांक : १२.०?.२००७

पहा :- १) माहितीचा अधिकार अधिनियम, २००५
२) महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम, २००५

परिपत्रक

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत मागणी करण्यात आलेली माहिती उपलब्ध करून देण्याकरिता अर्जदाराकडून घ्यावयाचे शुल्क "महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम, २००५" अन्वये विहित करण्यात आलेले आहे. त्यानुसार अर्जदाराकडून विभागात आलेली रक्कम, तसेच या अधिनियमांतर्गत प्राप्त होणारी रक्कम कोणत्या लेखाशीर्षाखाली जमा करावी व अर्जदारास कोणत्या प्रकारची पावती द्यावी यासंबंधीचे मार्गदर्शन करण्याची विनंती विविध कार्यालयांकडून करण्यात येत आहे.

२. या अनुषंगाने असा खुलासा करण्यात येतो की सर्वसाधारणपणे विविध प्रयोजनासाठी आकारण्यात येणाऱ्या शुल्कापोटी नागरिकांकडून त्या त्या कार्यालयाकडे भरल्या जाणाऱ्या रकमासाठी जी पावती दिली जाते, तशीच पावती माहिती अधिकारासंदर्भात प्राप्त होणाऱ्या रकमेसाठीसुद्धा दिली जाणे अपेक्षित आहे. अशा कार्यालयांनी ही जमा होणारी रक्कम ००७०, इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०००१६-२) या अर्थसंकल्पीय लेखाशीर्षाखाली जमा करणे अपेक्षित आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाइटवर प्रसिद्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २००७०५०८१२४५१००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

स्वाक्षरी/-

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन परिपत्रक क्रमांक : केमाअ - २००७/प्र.क्र.३४/०७/५
मंत्रालय, मुंबई - ४०००३२
दिनांक : १८.०५.२००७

संदर्भ :- सा. प्र. वि. शा. प. क्र. केमाअ- २००७/प्र.क्र.३४/०७/५, दि. ९/०५/२००७

शुद्धिपत्रक :-

दि. ९.०५.२००७ च्या संदर्भाधीन शासन परिपत्रकातील परिच्छेद २ मध्ये नमूद केलेल्या लेखाशीर्षाऐवजी पुढे नमूद केलेले लेखाशीर्ष वाचावे :- ००७० इतर प्रशासनिक सेवा, ६० इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१)

हे शुद्धिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाइटवर प्रसिद्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक २००७०५१८११११०२००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत प्राप्त होणाऱ्या अर्जासंदर्भात अधिकाऱ्यांशी पत्रव्यवहार टाळून विहित मुदतीत अर्ज निकालात काढण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक क्र. केमाअ-२००८/प्र.क्र.१३/०८/सहा (मा.अ.)
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- ६ सप्टेंबर २००८

परिपत्रक :-

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये माहिती अधिकाऱ्यांनी ३० दिवसात अर्जदारास माहिती पुरविणे आवश्यक आहे. अर्जदारास माहिती पुरविण्यासाठी जादा शुल्काची आवश्यकता असल्यास जन माहिती अधिकाऱ्यांनी महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम, २००५ मध्ये विहित केलेल्या दराप्रमाणे जादा शुल्क परिगणित करून अर्जदारास कळविणे व कळविलेले शुल्क प्राप्त झाल्यानंतर अर्जदारास तात्काळ माहिती पुरविणे आवश्यक आहे. मात्र, अशी कार्यवाही करताना रुपये २/-, ३/-, ४/- असा किरकोळ जादा शुल्काबाबतही जन माहिती अधिकाऱ्यांकडून अर्जदारांना पत्रे पाठविण्यात येत असल्याचे तसेच काही प्रकरणी पोस्टाने माहिती हवी असल्यास टपालाची तिकिटे लावलेले लिफाफे अर्जदारांकडून मागविण्यात येत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे. अर्जदारांकडून जादा शुल्क घेऊन माहिती पुरविण्याची कृती तांत्रिकदृष्ट्या व कायदेशीरदृष्ट्या योग्य असली, तरी असे किरकोळ जादा शुल्क भरण्याचे कळविण्यासाठी जन माहिती अधिकाऱ्यांकडून पत्रव्यवहार होतो व अर्जदारांकडून असे शुल्क प्रदान केल्यानंतर प्रत्यक्षात माहिती पाठविण्यासाठी पुन्हा पोस्टाचा दाखला घेऊन (अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टिंगने) पत्रव्यवहार करणे भाग पडते. अशा कार्यवाहीत खर्ची पडणारे मनुष्यबळ, स्टेशनरी, कार्यालयीन वेळ तसेच टपालखर्च इत्यादी विचारात घेता, अशा किरकोळ रकमेच्या मागणीपेक्षा प्रथम पत्रातच संबंधितांना माहिती पुरविल्यास ते आर्थिकदृष्ट्या किफायतशीर होईलच शिवाय प्रशासकीयदृष्ट्याही ते अधिक सोयीचे व मर्यादित मनुष्यबळ व साधनसामग्रीवरील ताण टाळणारे ठरू शकेल. तसेच सामान्य अर्जदारांनाही त्यांस हवी असणारी माहिती विनाविलंब पुरविण्याचा हेतू साध्य होईल. तरी वरील पार्श्वभूमी विचारात घेऊन, जेथे अत्यंत किरकोळ जादा शुल्क आवश्यक आहे, अशा अर्जांबाबत, [illegible] तर्कसंगती वापरून राज्य जन माहिती अधिकाऱ्यांनी प्रकरणपरत्वे उचित निर्णय घ्यावा. पुढे असेही स्पष्ट करण्यात येते, की जेथे अर्जदारास माहिती पाठविण्यासाठी अधिनियमातील कलम ७ (१) मधील जादा शुल्क मागविण्याची आवश्यकता नसून पहिल्याच पत्रोत्तरात माहिती पाठविणे शक्य आहे व त्यासाठी साधारण टपाल हशीलापेक्षा अधिक टपाल हशिल लागत नाही तेथे सदर टपाल हशीलाचा खर्च अर्जदारांकडून घेणे योग्य नाही.

२. याव्यतिरिक्त असेही स्पष्ट करण्यात येते, की जन माहिती अधिकाऱ्यांकडे प्राप्त झालेल्या अर्जातील माहिती किंवा माहितीचा भाग अन्य सार्वजनिक प्राधिकरणाशी संबंधित असेल तर तो अर्ज जन माहिती अधिकाऱ्याने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६ (३) अन्वये कोणत्याही परिस्थितीत ५ दिवसात त्या संबंधित प्राधिकरणाकडे हस्तांतरित करावा व अर्जदारास तत्संबंधी सूचना द्यावी. कलम ६ (३) मध्ये अन्य सार्वजनिक प्राधिकरण (Another Public Authority) या बाबत असणारा उल्लेख एकवचनी आहे. जेथे अर्जातील माहिती एकापेक्षा अधिक सार्वजनिक प्राधिकरणांशी संबंधित असेल तेथे अशा एकापेक्षा अधिक सार्वजनिक प्राधिकरणांकडे अर्जाच्या प्रती हस्तांतरित करणे आवश्यक नाही. अशा प्रकरणी ज्या जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झालेला आहे, त्याने स्वतःच्या प्राधिकरणाशी संबंधित माहिती पुरवून अर्जदारास इतर मुद्द्यांसंदर्भात संबंधित प्राधिकरणांकडे वेगळे अर्ज करण्याचे सुचवावे, अशा आशयाचे मार्गदर्शन केंद्र शासनाच्या मिनिस्ट्री ऑफ पर्सोनेल, पब्लिक ग्रीव्हन्सेस ॲन्ड पेन्शन्स, डिपार्टमेंट ऑफ पर्सोनेल ॲन्ड ट्रेनिंग यांच्या कार्यालयीन ज्ञापन क्रमांक - १०/२/२००८ - आयआर, दिनांक १२/६/२००८ अन्वये प्रसृत करण्यात आले आहे.

याव्यतिरिक्त या अधिनियमांतर्गत माहिती पुरविताना, सार्वजनिक प्राधिकरणांकडे कलम २ (च) मध्ये व्याख्या केलेली व उपलब्ध असलेली माहितीच पुरविणे अभिप्रेत असून, जेथे वेगळ्याने माहितीचे संकलन, संशोधन, पृथक्करण करणे आवश्यक आहे अशा स्वरूपातील माहिती पुरविणे अभिप्रेत नाही.

३. अर्ज करताना तसेच जादा शुल्काचे प्रदान करताना रोख रकमेव्यतिरिक्त दर्शनी धनाकर्ष, बँकेचा धनादेश तसेच मनीऑर्डर इत्यादी मार्गाने शुल्क भरण्याची सोय महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम, २००५ अन्वये अर्जदारांना उपलब्ध करून देण्यात आली आहे. मात्र, अनेक सार्वजनिक प्राधिकरणांकडून दर्शनी धनाकर्ष, बँकेचा धनादेश तसेच मनीऑर्डर इत्यादी कोणाच्या नावे (In favour of ...) काढण्यात यावे, याची प्रसिद्धी दिली जात नाही. त्यामुळे वेगळ्याच आदात्याच्या (Payee) नावे पाठविलेले शुल्क शासन तिजोरीत जमा करणे कठीण होते व अनावश्यक पत्रव्यवहार तसेच माहिती पाठविण्यास विलंब इत्यादी प्रसंग उद्भवतात. तरी अर्जदारांनी दर्शनी धनाकर्ष, बँकेचा धनादेश तसेच मनीऑर्डर इत्यादी कोणाच्या नावे (In favour of ... ) काढावेत याबाबत सर्व सार्वजनिक प्राधिकरणांनी नोटिस बोर्ड तसेच वेबसाईटवरून व्यापक प्रसिद्धी द्यावी.

हे परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाइटवर संगणक संकेतांक २००८०९०६१४२७३६००१ वर प्रसिद्ध करण्यात आलेले आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

स्वाक्षरी/-
विलास [illegible]

<u>माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या
अंमलबजावणीबाबत.</u>

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन परिपत्रक क्र.संकिर्ण २०१५ /प्र.क्र.( २२१/१५) सहा.**
मंत्रालय, मुंबई - ४००० ३२.
दिनांक- २६.१०.२०१५.

**पहा- मा.राज्य मुख्य माहिती आयुक्त यांचे दि. २.७.२०१५ चे आदेश.**

परिपत्रक:-

माहिती अधिकारातील अनेक प्रकरणात अर्जदारांनी अभिलेख तपासण्याची मागणी केलेली नसतानाही अर्जदारांना कार्यालयात अभिलेख तपासण्यासाठी जन माहिती अधिकाऱ्यांकडून बोलाविले जाते. त्यांच्याकडे कागदपत्राचे गठ्ठे ठेऊन त्यांना माहिती शोधण्यास सांगण्यात येते अशी तक्रार श्री. शैलेश गांधी यांनी मा.राज्य मुख्य माहिती आयुक्त यांचेकडे दि.२१.९.२०१५ रोजी केली होती. या प्रकरणी आवश्यक सूचना देणारे परिपत्रक सर्व शासकीय कार्यालयासाठी निर्गमित करावे असे आदेश मा.राज्य मुख्य माहिती आयुक्त यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (८) (क) नुसार दि. २.७.२०१५ रोजी दिले आहेत. या अनुषंगाने सर्व विभागांना सूचित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. तदनुसार शासन पुढीलप्रमाणे सूचित करीत आहे.

२. उपरोक्त पार्श्वभूमी लक्षात घेता, माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये माहिती मिळण्यासाठी अर्जदाराने मागणी केलेली माहिती व्यापक स्वरूपाची (voluminous) नसेल तर अर्जदारास कार्यालयात अभिलेख तपासण्यासाठी बोलाविण्यात येऊ नये. अशा प्रकरणात अर्जदाराने मागीतलेली माहिती, अर्जदारास विहित शुल्क आकारून उपलब्ध करून देण्यात यावी.

३. अर्जदाराने मागणी केलेली माहिती फारच व्यापक (voluminous) स्वरूपाची असेल तर ती पाहण्याची व तपासण्याची संधी देऊन अर्जदारास आवश्यक असलेल्या कागदपत्राच्या प्रती विहित शुल्क आकारून उपलब्ध करून देण्यात यावी.

४. अर्जदाराने मागणी केलेली माहिती व्यापक स्वरूपाची (voluminous) असेल तर किंवा त्याने अभिलेख तपासणीसाठी अर्ज केलेला असेल अशावेळी अर्जदारास अभिलेख तपासण्यास बोलाविण्यापूर्वी त्या अभिलेख्यांची एक निर्देशसूची तयार करावी व संबंधीत धारिकेतील पृष्ठांना क्रमांक देण्यात यावेत. अर्जदारास अभिलेख तपासण्यास बोलाविताना सोयीची वेळ तसेच तीन तारखा कळविण्यात याव्यात. सदर वेळ वा तारखा अर्जदारास सोयीची नसल्यास त्याला संबंधीत जन माहिती अधिकाऱ्यास संपर्क करण्यास कळविण्यात यावे.

५. अर्जदार अभिलेख तपासण्यासाठी येणार असलेल्या दिनांकास संबंधीत जन माहिती अधिकाऱ्यास महत्वाच्या कारणास्तव कार्यालयाबाहेर जावे लागणार असल्यास त्याने त्याच्या सहकारी अधिकारी किंवा अधिपत्याखालील कर्मचाऱ्याकडे अभिलेख तपासणीसाठी देण्याची जबाबदारी सोपवावी.

६. उपरोक्त परिपत्रकातील तरतूदी सर्व मंत्रालयीन विभाग प्रमुखांनी त्यांच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख, सार्वजनीक प्राधिकरण तसेच सर्व संबंधीतांच्या निदर्शनास आणून द्याव्यात व तदनुसार आवश्यक कार्यवाही करण्याबाबत त्यांना सूचित करण्यात यावे.

७. सदर परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा सांकेतांक क्र. २०१५१०२६१५१९३३१००७ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

Rajendra Shivanand Arwari

Digitally signed by Rajendra Shivanand Arwari
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Under Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Rajendra Shivanand Arwari
Date: 2015.10.26 15:20:42 +05'30'

(रा.शि.अरवारी)
शासनाचे अवर सचिव.

प्रति,

१) मा.राज्यपाल यांचे सचिव,
२) मा.मुख्यमंत्री / मा.उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव/सचिव.
३) सचिव, मुख्य सचिवांचे कार्यालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
४) राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य मुंबई.
५) सर्व राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य मुंबई.
६) *प्रबंधक, मूळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई
७) प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई
८) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
९) सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
१०) प्रबंधक, लोकआयुक्त व उपलोकआयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
११) मंत्रालयीन विभागाचे सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव
१२) महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई
१३) सर्व मंत्रालयीन विभाग (प्रशासकीय अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख/ कार्यालय प्रमुख यांच्या निदर्शनास आणण्याच्या विनंतीसह)
१४) सर्व विभागीय आयुक्त
१५) महासंचालक, यशदा, पुणे
१६) सर्व जिल्हाधिकारी
१७) निवडनस्ती, सा.प्र.वि. कार्यासन सहा.

*पत्राने

**माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या अंमल बजावणीबाबत द्वितीय अपील सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत.**

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
**शासन परिपत्रक क्र.संकिर्ण २०१५ /प्र.क्र.(२२२ /१५) सहा.**
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक- ०१.१२.२०१५.

पहा- **मा.राज्य माहिती आयुक्त, नागपूर यांचे दि. १२.५.२०१५ चे आदेश.**

परिपत्रक:-

माहिती अधिकारातील काही प्रकरणात अर्जदारांच्या माहिती अर्जास प्रतिसाद दिला जात नाही, अशा प्रकरणी झालेल्या प्रथम अपीलाकडे, माहिती उपलब्ध करून देण्यानुषंगाने तसेच माहिती अधिकार अधिनियम २००५ ची अंमलबजावणी करण्यानुषंगाने सकारात्मक कार्यवाही न करता, माहिती उपलब्ध करून देण्यानुषंगाने हेतुपुरस्सर टाळाटाळ केली जाते, प्रथम अपीलीय अधिकारी, तत्कालीन जन माहिती अधिकारी तसेच इतर संबंधीत अधिकारी आयोगाच्या पूर्वपरवानगीशिवाय किंवा कोणतीही लेखी सूचना न देता अपीलाच्या सुनावणीस गैरहजर राहतात असे शेरे श्रीमती दुर्गा जोहरी यांनी केलेल्या द्वितीय अपील क्र.२९४२/२०१४ मध्ये दि.१२.५.२०१५ रोजी निर्णय देताना मा.राज्य माहिती आयुक्त, नागपूर यांनी निर्णयात नमूद केले असून त्याकडे मा.मुख्य सचिव महोदयांचे लक्ष वेधले आहे. त्यावर आवश्यक सूचना निर्गमित करण्याचे मा.मुख्य सचिव महोदयांनी आदेशित केले आहे. या अनुषंगाने सर्व विभागांना सूचित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. तदनुसार शासन पुढीलप्रमाणे सूचित करीत आहे.

२. उपरोक्त पार्श्वभूमी लक्षात घेता, शासन असे आदेश देत आहे की, माहिती अधिकार प्रकरणात अर्जदारांना माहिती उपलब्ध करून देण्यानुषंगाने सकारात्मक कार्यवाही करण्यात यावी. माहिती उपलब्ध करून देण्यानुषंगाने संबंधीत जन माहिती अधिकाऱ्याने तसेच प्रथम अपीलीय अधिकाऱ्याने माहिती उपलब्ध करून देण्यात हेतुपुरस्सरपणे टाळाटाळ केल्याचे निदर्शनास आल्यास त्याची गंभीर दखल घेतली जाईल. द्वितीय अपील सुनावणीत तत्कालीन जन माहिती अधिकारी, आयोगाने आदेशित केले असल्यास प्रथम अपीलीय प्राधिकारी तसेच इतर संबंधीत

धिकारी आयोगाच्या पूर्वपरवानगीशिवाय किंवा कोणतीही लेखी सूचना न देता व्दितीय पीलाच्या सुनावणीस गैरहजर राहील्यास आवश्यकतेनुसार त्यांच्यावर नियमानुसार कार्यवाही स्तावित करण्यात येईल.

. उपरोक्त बाब सर्व मंत्रालयीन विभाग प्रमुखांनी त्यांच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख, ार्वजनीक प्राधिकरण तसेच सर्व संबंधीतांच्या निदर्शनास आणून द्याव्यात व तदनुसर आवश्यक ार्यवाही करण्याबाबत त्यांना सूचित करण्यात यावे.

. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर पलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५१२०११२२१०८२८०७ असा आहे. हे परिपत्रक डेजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

Rajendra M Jadhav

Digitally signed by Rajendra M Jadhav
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=GENERAL ADMINISTRATION DEPT., postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=656ebca17998fd5c29178a5abcf1aa60d7 2bd9513ddc791d9ad9786418f07e4f, cn=Rajendra M Jadhav
Date: 2015.12.01 12:21:49 +05'30'

(रा.मा.जाधव)
शासनाचे उप सचिव.

ति,

१) मा.राज्यपाल यांचे सचिव,
२) मा.मुख्यमंत्री / मा.उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव/सचिव.
३) सचिव, मुख्य सचिवांचे कार्यालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
४) राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य मुंबई.
५) सर्व राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य मुंबई.
६) *प्रबंधक, मूळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई
७) *प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई
८) *सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
९) *सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
१०) प्रबंधक, लोकआयुक्त व उपलोकआयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
११) मंत्रालयीन विभागाचे सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव
१२) महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई

माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत माहिती मागविणाऱ्या अर्जदारांना माहिती उपलब्ध करून देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन परिपत्रक क्र.संकिर्ण २०१५ /प्र.क्र.( २३६/१५) सहा.
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक- १९.१२.२०१५.

परिपत्रक:-

माहिती अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत माहिती मागविणाऱ्या अर्जदारांना वेगवेगळया सार्वजनिक प्राधिकरणांकडून वेगवेगळया नमुन्यात माहिती उपलब्ध करून देण्यात येते. माहितीचे स्वरूप सर्वत्र वेगवगळे असल्याने आणि सार्वजनिक प्राधिकरणांसाठी त्याबाबत विहित नमुना तयार करणे शक्य नसल्याने सार्वजनिक प्राधिकरणाने माहिती उपलब्ध करून देताना त्यामध्ये कोणकोणत्या बाबी समाविष्ट असाव्यात याबाबत स्पष्टता करणारे परिपत्रक केंद्र शासनाच्या परिपत्रक क्र.१०/१/२०१३-आय आर दि.६.१०.२०१५ अन्वये निर्गमित करण्यात आल्या असून त्यातील बाबी सर्व संबंधीतांच्या निदर्शनास आणण्याचे सूचित करण्यात आले आहे. या अनुषंगाने सर्व विभागांना सूचित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. तदनुसार शासन पुढीलप्रमाणे सूचित करीत आहे.

२. माहिती अधिकार अधिनियम, २००५ अन्वये माहिती उपलब्ध करून देताना त्यामध्ये सर्वसाधारणपणे खालील बाबी समाविष्ट असाव्यात.

(१) माहिती अधिकार अधिनियम, २००५ अन्वये प्राप्त झालेल्या माहिती अधिकार अर्जाचा क्रमांक व दिनांक आणि संबंधीत सार्वजनिक प्राधिकरणात सदर अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक.

(२) संबंधीत जन माहिती अधिकाऱ्याचे नाव, पदनाम, पत्ता, अधिकृत दुरध्वनी क्रमांक आणि ई - मेल नमूद करण्यात यावा.

(३) मागणी केलेली माहिती नाकारण्यात आलेली असल्यास, माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे संबंधीत कलम उधृत करण्यासह माहिती नाकारण्याची सविस्तर कारणमिमांसा नमूद करावी.

(४) माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६(३) अन्वये माहिती अधिकार अर्ज अन्य सार्वजनिक प्राधिकरणाकडे हस्तांतरित करण्यात येत असल्यास, ज्या सार्वजनिक प्राधिकरणाकडे सदर अर्ज हस्तांतरित करण्यात येणार आहे त्या प्राधिकरणाची सविस्तर माहिती नमूद करावी.

(५) माहिती अधिकार अधिनियम, २००५ अन्वये माहिती अर्ज उत्तरित करताना त्यामध्ये प्रथम अपील अधिकाऱ्याचे नाव, पदनाम, पत्ता, अधिकृत दुरध्वनी क्रमांक आणि ई - मेल नमूद करण्यात यावा. तसेच उत्तराच्या शेवटच्या परिच्छेदात "जन माहिती अधिकाऱ्याचे पत्र प्राप्त झाल्यापासून ३० दिवसात प्रथम अपील दाखल करण्यात यावे" असे स्पष्टपणे नमूद करावे.

(६) माहितीच्या अधिकारांतर्गत पत्रव्यवहार करताना, सर्व जन माहिती अधिकारी व प्रथम अपील अधिकारी यांनी त्यांच्या स्वाक्षरीखाली त्यांचे नाव, पदनाम तसेच विभागाचे नाव ठळकपणे नमूद करावे.

३. माहिती अधिकार अधिनियम, २००५ अन्वये अर्जदाराने माहिती साक्षांकीत करून मागीतलेली असल्यास संबंधीत जन माहिती अधिकाऱ्याने ती माहिती साक्षांकीत करून तसे माहितीवर नमूद करून माहिती उपलब्ध करून द्यावी. उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या कागदपत्राची/अभिलेखाची संख्या मोठी असल्यास माहितीचे साक्षांकन आवश्यकता असल्यास त्याच्या कनिष्ठ राजपत्रित अधिकाऱ्यास करता येईल. साक्षांकन पुढीलप्रमाणे नोंदविण्यात यावे.

| |
|---|
| माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या कागदपत्राची/अभिलेखाची सत्यप्रत.<br><br>सही व दिनांक/-<br>संबंधीत जन माहिती अधिकाऱ्याचे तसेच सार्वजनिक प्राधिकरणाचे नाव (ठसा). |

४. उपरोक्त परिपत्रकातील तरतूदी सर्व मंत्रालयीन विभाग प्रमुखांनी त्यांच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख, सार्वजनीक प्राधिकरण तसेच सर्व संबंधीतांच्या निदर्शनास आणून द्याव्यात व तदनुसार आवश्यक कार्यवाही करण्याबाबत त्यांना सूचित करण्यात यावे.

५ सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा सांकेतांक क्र. २०१५१२१९१२२८०९०००७ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

Rajendra M Jadhav

Digitally signed by Rajendra M Jadhav
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=GENERAL ADMINISTRATION DEPT., postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=656ebca17998fd5c29178a5abcf1aa60d72bd5515ddc791d9ad9786418f07c4f, cn=Rajendra M Jadhav
Date: 2015.12.19 12:30:07 +05'30'

( रा.मा.जाधव )
**शासनाचे उप सचिव.**

प्रति,

१) मा.राज्यपाल यांचे सचिव,
२) मा.मुख्यमंत्री / मा.उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव/सचिव.
३) सचिव, मुख्य सचिवांचे कार्यालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
४) राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य मुंबई.
५) सर्व राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य मुंबई.
६) *प्रबंधक, मूळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई
७) *प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई
८) *सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
९) *सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
१०) प्रबंधक, लोकआयुक्त व उपलोकआयुक्त यांचे कार्यालय, मुंबई

११) मंत्रालयीन विभागाचे सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव
१२) महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई
१३) सर्व मंत्रालयीन विभाग (प्रशासकीय अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख/ कार्यालय प्रमुख यांच्या निदर्शनास आणण्याच्या विनंतीसह )
१४) सर्व विभागीय आयुक्त
१५) महासंचालक, यशदा, पुणे
१६) सर्व जिल्हाधिकारी
१७) निवडनस्ती, सा.प्र.वि. कार्यासन सहा.

*पत्राने

# माहिती अधिकार कायद्यातील जनमाहिती अधिकाऱ्याच्या दृष्टीने महत्वाचे कलम व न्यायनिर्णय

| क्र | न्यायनिर्णय/ कलम | न्यायनिर्णय कशाबाबत आहे. | *कोर्टाचा निष्कर्ष* | पान नं |
|---|---|---|---|---|
| 1 | CIC/AT/A/2006/00185; DATE 18/9/2006 | कायदे, नियम, शासन निर्णय, परिपत्रके हे स्वत: माहिती या व्याख्येत बसतात आणि सार्वजानीक ठिकाणी उपलब्ध आहेत आणि ते सर्व नागरीकांसाठी खुले आहेत. | *"The Law, Rules and circulars are themselves 'Information' & being in public domain are accessible to all citizens of the country."* | 1 to 5 |
| 2 | CIC/AT/A/2006/20; DATE 23/3/2006 | अस्तित्वात नसलेली माहिती पुरविता येणार नाही. | *"There is no liabilities under the RTI act on a public authority to supply non – existent information."* | 6 to 7 |
| 3 | 69/IC (A)/2006 of 20.06.2006 | माहिती अधिकाराखाली कोणतेही वैयक्तीक मत, खुलासा मागविता येणार नाही. | *"The PIO is required to provide information which is available in any form with her office rather than giving her personal opinion."* | 8 to 9 |
| 4 | CIC/WB/C/2006/00018; DATE 28/9/2006 | माहिती अधिकाराखाली एखाद्या कर्मचाऱ्याची मदत मागितल्यास तोही दंडास पात्र असेल (Deemed PIO) | *"If their assistance had been sought under section 5(4) of the act, they would be liable to penalty under section 5(5)."* | 10 to 12 |
| 5 | श्री. एच. ई. राजसरकरप्पा वि राज्य माहिती अधिकारी (जनहित याचिका क्र १०६६३/२००६)........ | लोकहिताच्या दृष्टीने व्यापक जनहित साध्य न करणारी आणि त्रयस्थ पक्षाबरोबरच्या वैयक्तीक वादाशी संबंधीत माहिती देऊ नये. | • | 13 to 18 |
| 6 | सामन्य प्रशासन शासन निर्णय संकीर्ण २०१२/९८९/प्रक्र ४७९/सहा. दि. १७/१०/२०१४ | कर्मचाऱ्यांची वैयक्तीक माहिती देऊ नये. | • | 19 to 21 |
| 7 | Supreme Court Special Leave Petition(Civil) 34868/2009 | एखादा निर्णय का व कसा दिला हे माहिती अधिकाराखाली मागता येणार नाही. | *"Applicant Cannot ask any information that why such order have been passed."* | 22 to 24 |
| 8 | आदित्य बंडोपाध्याय वि सी. बी. एस. ई बोर्ड. (सर्वोच्च न्यायालय) | या दाव्यामध्ये सर्वोच्च न्यायालयाने कोणती माहिती देता येईल, माहिती म्हणजे काय, मागितलेली माहिती ही Public Authority कडील असावी. Fiduciary Relationship म्हणजे काय, नष्ट केलेली माहिती देणे अपेक्षीत नाही, मुदतीपेक्षा जास्त काळ माहिती जतन करुन ठेवण्याचा आदेश देता येणार नाही. अशा अनेक विषयांबाबत निर्णय दिला आहे. | • | 25 to 78 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 9 | CIC/SA/A/2014/000543 & CIC/SA/A/2014/000652 | वारंवार व त्रास देण्याच्या उद्देशाने माहिती मागत असल्यास त्यास अपात्र करणे आणि त्यानंतरही तशीच कृती चालु ठेवल्यास त्याविरुध्द फौजदारी कारवाई करणे. | • | 79 to 83 |
| 10 | माहिती अधिकार अधिनियम 2005 चे कलम 7(9) | मोठ्या प्रमाणात माहिती मागवल्यास अथवा सदर माहिती काढण्यासाठी प्रमाणापेक्षा जास्त मनुष्यबळ त्यासाठी वळवावे लागत असेल आणि त्यामुळे कार्यालयातील दैनंदिन कामकाजावर परिणाम होणार असेल तर अशी माहिती नाकारता येते. | • | माहिती अधिकार कायदा 2005 चे कलम 7(9) |
| 11 | माहिती अधिकार अधिनियम 2005 चे कलम 8(1) | तिरायीत पक्षाची माहिती देता येत नाही अथवा त्यासाठी त्या व्यक्तीची पुर्वपरवानगी घेणे आवश्यक आहे. अशी माहिती सार्वजानीक हित असेल तरच देता येईल. यासाठी पक्षकारानी सार्वजानीक हित असल्याचे सिध्द करणे आवश्यक आहे. | • | माहिती अधिकार कायदा 2005 चे कलम 8(1) |
| 12 | CIC - Order/Decision_ 27062006_2.pdf | एखादया कंपनीने किंवा मॅनेजरने माहिती मागितल्यास कलम 3 नुसार नाकारता येईल. | • | 84 to 87 |
| 13 | CIC/BS/A/2014/00023195 A. Mr. K. Bansal Vs Ministry Of Communication | निवृत्त अथवा शासकीय कर्मचारी हे वारंवार माहिती अधिकार अर्ज करुन त्रास देत असल्यास सक्षम प्राधिकरण त्या कर्मचाऱ्याविरुध्द खात्यातंर्गत अथवा दंडात्मक कारवाई करु शकतात...... | • | 88 to 105 |
| 14 | सर्वोच्च न्यायालयातील खटला ICAI Vs Shaunak H. Satya(2011) 8 SCC 781 | कोणीही व्यक्ती माहिती अधिकार कायदयाचा दुरुपयोग करीत असेल तर त्याचे असे वर्तन कायदयानुसार नियंत्रणात आणावे | *"A Beneficient statute, when made a Tool for mischief and abuse must be checked in accordance with Law."* | 106 to 134 |
| 15 | CIC/AT/A2008/00097 दि. 12/6/2008..... Shri Gopal Soni Vs The New India Assurance Company Ltd. | यामध्ये केंद्रीय मुख्य माहिती आयुक्त यांनी असे स्पष्ट केले आहे की, विश्लेषणात्मक, विस्तृत, अचूक हवी असणारी माहिती माहिती अधिकार अधिनियम कलम 7(9) नुसार देता येणार नाही. | *" Answering the elaborate & detailed quiries, which have to be both accurate & authentic, impose heavy cost on the public authority & tends to divert its resources; which brings it within the scope of section 7(9) of the RTI Act."* | 135 to 136 |
| 16 | CIC/AT/A/2007/2012. Shri K. Lal Vs Shri M. K. Bargi, Asst Registrar of Companies & CPIO | एखादी माहिती Public Domain वर उपलब्ध असेल तर ती सर्वासाठी उपलब्ध असते...... सबब पुन्हा तिच माहिती माहिती अधिकाराखाली मागता येणार नाही. | *"...... It would mean that once certain information is placed in public domain accessible to the citizens either freely or on payment of a predermined price, that information can not be said to be ' held' or ' under the control' of the public authority & thus would cease to be an 'information' accessible under the RTI Act "* | 137 to 141 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 17 | Mr. Nitish Kumar Tripati Vs CPIO of Minisrty Health & Family. दि. 4/7/2014 | वारंवार एकाच विषयाबाबत माहिती अधिकाराखाली अर्ज करत असल्यास असा माहिती अधिकार अर्ज नाकारता येईल | *" Every Repetition of RTI application which was earlier responded will be an obstruction to flow of information & defeats the purpose of the RTI Act. No scope for repeating under RTI Act"* | 142 to 149 |
| 18 | Mr. Nitish Kumar Tripati Vs CPIO of Minisrty Health & Family. दि. 4/7/2014 | माहिती अधिकार हा वारंवार वापरण्याचा अधिकार नाही. | *" ...... RTI Act that right of citizen to information is limited to one time & does not extend to repetition of request for that directly or indirectly . In short citizen has No Right To Repeat"* | |
| 19 | राज्य माहिती आयोग यांचा सुर्यकांत नाईक वि जनमाहिती अधिकारी, सावंतवाडी | माहिती अधिकार अर्जास Res Judicata तत्वाची बाधा येते. | * | 150 to 152 |
| 20 | Writ Petition 10974/2010. Karnataka High Court. | विना अट माफीनामा सादर केल्यामुळे दंडाचा आदेश कायम करण्यात येऊन विभागीय चौकशीचा आदेश रद्द केला. | * | 153 to 158 |
| 21 | The Gujrat Highcourt Special Civil Application 15887/2010 | माहिती आयोग हे न्यायालय नाही. त्यामुळे त्याच्या आदेशाचे पालन न केल्यास न्यायालयाचा अवमान या सदराखाली मोडत नाही. | * | 159 to 163 |
| 22 | The Gujrat Highcourt Special Civil Application 4150/2012 | 1991 पुर्वीची माहितीची मागणी करणे म्हणजे माहिती अधिकार कायद्याचा गैरवापर होय. | * | 164 to 168 |
| 23 | The Bombay High Court at Goa Writ Petition 449/2007 | माहिती अधिकार अर्ज जर वेळेत दुसऱ्या कार्यालयाकडे वर्ग केले आणि ते जनमाहिती अधिकारी मुदतीत माहिती न दिल्यास प्रथम जनमाहिती अधिकारी यांना दंड करता येणार नाही. | * | 169 to 173 |
| 24 | CIC/RM/A/2014/000210/ BS/8301 Date 10/8/2015 | माहिती अधिकार अर्जामध्ये Larger Public Interest आहे का हे सिध्द करण्यास जनमाहिती अधिकारी सांगु शकतो आणि ते सिध्द न झाल्यास माहिती न पुरविणे योग्य ठरेल | * | 174 to 177 |
| 25 | Ministry of Personnel चे OM दि. 24/9/2010 | माहिती आपल्या सार्वजानीक प्राधिकरणाकडे नसेल आणि ती माहिती इतर अनेक सार्वजानीक प्राधिकरणाकडे असेल तर अर्जदारांना वेगवेगळे अर्ज करण्यास कळवावे. | * | 178 |
| 26 | CIC/SM/A/2011/001207/ SG/15488 दि. 4/11/2011 | अन्य व्यक्ती माहिती विलंबाने देण्यास जबाबदार असेल तर त्या व्यक्तीस आयोगासमोर हजर राहण्यासाठी जनमाहिती अधिकारी यांनी कळवावे. | * | 179 to 181 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 27 | सामान्य प्रशासन **शासन** परिपत्रक क्र संकीर्ण/2014/प्रक्र((265/15) सहा. दि. 1/12/2015 | कारागृहातील न्यायाधीन किंवा शिक्षाधीन बंद्याना माहिती अधिकार कायद्याखाली BPL समजु नये | * | 182 to 184 |
| 28 | **महाराष्ट्र माहिती अधिकार सुधारणा नियम 2012** | माहिती अधिकार अर्जात एक पेक्षा जास्त विषय असेल आणि त्यात 150 पेक्षा जास्त शब्द असतील तर पहिल्या विषयाची माहिती द्यावी आणि अन्य विषयाबाबत स्वतंत्र अर्ज करणेस कळवावे.... | * | 185 to 186 |

**माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत माहिती मागविणाऱ्या अर्जदारांना माहिती उपलब्ध करून देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन परिपत्रक क्र.संकिर्ण २०१५ /प्र.क्र.( २३६/१५) सहा.**
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक- १९.१२.२०१५.

परिपत्रक:-

माहिती अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत माहिती मागविणाऱ्या अर्जदारांना वेगवेगळया सार्वजनिक प्राधिकरणांकडून वेगवेगळया नमुन्यात माहिती उपलब्ध करून देण्यात येते. माहितीचे स्वरूप सर्वत्र वेगवगळे असल्याने आणि सार्वजनिक प्राधिकरणांसाठी त्याबाबत विहित नमुना तयार करणे शक्य नसल्याने सार्वजनिक प्राधिकरणाने माहिती उपलब्ध करून देताना त्यामध्ये कोणकोणत्या बाबी समाविष्ट असाव्यात याबाबत स्पष्टता करणारे परिपत्रक केंद्र शासनाच्या परिपत्रक क्र.१०/१/२०१३-आय आर दि.६.१०.२०१५ अन्वये निर्गमित करण्यात आल्या असून त्यातील बाबी सर्व संबंधीतांच्या निदर्शनास आणण्याचे सूचित करण्यात आले आहे. या अनुषंगाने सर्व विभागांना सूचित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. तदनुसार शासन पुढीलप्रमाणे सूचित करीत आहे.

२. माहिती अधिकार अधिनियम, २००५ अन्वये माहिती उपलब्ध करून देताना त्यामध्ये सर्वसाधारणपणे खालील बाबी समाविष्ट असाव्यात.

(१) माहिती अधिकार अधिनियम, २००५ अन्वये प्राप्त झालेल्या माहिती अधिकार अर्जाचा क्रमांक व दिनांक आणि संबंधीत सार्वजनिक प्राधिकरणात सदर अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक.

(२) संबंधीत जन माहिती अधिकाऱ्याचे नाव, पदनाम, पत्ता, अधिकृत दुरध्वनी क्रमांक आणि ई - मेल नमूद करण्यात यावा.

(३) मागणी केलेली माहिती नाकारण्यात आलेली असल्यास, माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे संबंधीत कलम उधृत करण्यासह माहिती नाकारण्याची सविस्तर कारणमिमांसा नमूद करावी.

(४) माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६(३) अन्वये माहिती अधिकार अर्ज अन्य सार्वजनिक प्राधिकरणाकडे हस्तांतरित करण्यात येत असल्यास, ज्या सार्वजनिक प्राधिकरणाकडे सदर अर्ज हस्तांतरित करण्यात येणार आहे त्या प्राधिकरणाची सविस्तर माहिती नमूद करावी.

(५) माहिती अधिकार अधिनियम, २००५ अन्वये माहिती अर्ज उत्तरित करताना त्यामध्ये प्रथम अपील अधिकाऱ्याचे नाव, पदनाम, पत्ता, अधिकृत दुरध्वनी क्रमांक आणि ई - मेल नमूद करण्यात यावा. तसेच उत्तराच्या शेवटच्या परिच्छेदात "जन माहिती अधिकाऱ्याचे पत्र प्राप्त झाल्यापासून ३० दिवसात प्रथम अपील दाखल करण्यात यावे" असे स्पष्टपणे नमूद करावे.

(६) माहितीच्या अधिकारांतर्गत पत्रव्यवहार करताना, सर्व जन माहिती अधिकारी व प्रथम अपील अधिकारी यांनी त्यांच्या स्वाक्षरीखाली त्यांचे नाव, पदनाम तसेच विभागाचे नाव ठळकपणे नमूद करावे.

३. माहिती अधिकार अधिनियम, २००५ अन्वये अर्जदाराने माहिती साक्षांकीत करून मागीतलेली असल्यास संबंधीत जन माहिती अधिकाऱ्याने ती माहिती साक्षांकीत करून तसे माहितीवर नमूद करून माहिती उपलब्ध करून द्यावी. उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या कागदपत्राची/अभिलेखाची संख्या मोठी असल्यास माहितीचे साक्षांकन आवश्यकता असल्यास त्याच्या कनिष्ठ राजपत्रित अधिकाऱ्यास करता येईल. साक्षांकन पुढीलप्रमाणे नोंदविण्यात यावे.

> माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या कागदपत्राची/अभिलेखाची सत्यप्रत.
>
> सही व दिनांक/-
> संबंधीत जन माहिती अधिकाऱ्याचे तसेच सार्वजनिक प्राधिकरणाचे नाव (ठसा).

४. उपरोक्त परिपत्रकातील तरतूदी सर्व मंत्रालयीन विभाग प्रमुखांनी त्यांच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख, सार्वजनीक प्राधिकरण तसेच सर्व संबंधीतांच्या निदर्शनास आणून द्याव्यात व तदनुसार आवश्यक कार्यवाही करण्याबाबत त्यांना सूचित करण्यात यावे.

५ सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा सांकेतांक क्र. २०१५१२१९१२२८०९०००७ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

Rajendra M Jadhav

Digitally signed by Rajendra M Jadhav
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=GENERAL ADMINISTRATION DEPT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=[illegible], cn=Rajendra M Jadhav
Date: 2015.12.19 12:30:07 +05'30'

(रा.मा.जाधव)
**शासनाचे उप सचिव.**

प्रति,

१) मा.राज्यपाल यांचे सचिव,
२) मा.मुख्यमंत्री / मा.उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव/सचिव.
३) सचिव, मुख्य सचिवांचे कार्यालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
४) राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य मुंबई.
५) सर्व राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य मुंबई.
६) *प्रबंधक, मूळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई
७) *प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई
८) *सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
९) *सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
१०) प्रबंधक, लोकआयुक्त व उपलोकआयुक्त यांचे कार्यालय, मुंबई

माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम
४ मधील तरतूदींच्या अंमल बजावणीबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन परिपत्रक क्र. संकिर्ण २०१५ /प्र.क्र.(२५२/१५) सहा.
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक- २८.१. २०१६.

पहा- मा.राज्य मुख्य माहिती आयुक्त यांचे क्र.मुमाआ २०१५/तक्रार क्र.१३९८/२०१५/०२ दि. १८.११.२०१५ चे आदेश.

परिपत्रक:-

माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ४(१) (क) मधील तरतूदीनुसार माहितीचा अधिकार मिळणे सोयीचे होईल अशा रीतीने आणि स्वरूपात अभिलेख सुचिबध्द करणे, त्याची निर्देशसूची तयार करणे आणि ज्याचे संगणकीकरण करणे योग्य आहे अशा अभिलेख्याचे संगणकीकरण करणे व ते देशातील विविध प्रणालींमध्ये नेटवर्कमार्फत जोडणे आवश्यक आहे. अधिनियमातील कलम ४(१)(ख) मध्ये दर्शविलेल्या १७ बाबींवरील माहिती सर्व सार्वजनिक प्राधिकरणांनी तयार करून ती प्रसिध्द करणे अनिवार्य आहे. अशी माहिती वेबसाईटवर प्रसिध्द केल्याने जनतेस माहिती विनासायास व विनामुल्य मिळेल. परिणामी सार्वजनीक प्राधिकरणाच्या कामात पारदर्शकता येईल. या अनुषंगाने, ज्या कार्यालयांनी संकेतस्थळावरील (website) माहिती अद्ययावत केली नसेल त्यांनी ती तातडीने अद्ययावत करण्याच्या सूचनाही शासन परिपत्रक क्र.केमाअ २०१३/१५६/३६०/सहा दि.९.५.२०१४ अन्वये देण्यात आलेल्या आहेत. तरीही काही विभागांकडून संकेतस्थळावरील (website) वरील माहिती अद्ययावत केली जात नसल्याचे, श्री.विवेक वेलणकर यांनी, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये, मा.राज्य माहिती आयुक्त यांचेकडे केलेल्या तक्रारीमध्ये (Mumma २०१५/Com.no.१३९८/२०१५/०२) मध्ये निदर्शनास आणले आहे. सदर तक्रार निकाली काढताना, शासनातील सर्व विभाग व त्यांच्या अधिपत्याखालील क्षेत्रिय कार्यालयांनी दि. १ जानेवारी व १ जुलै रोजी असे वर्षातून किमान दोन वेळा संकेतस्थळावरील (website) माहिती अद्ययावत करावी, मात्र अधिकाऱ्यांसंदर्भातील काही माहिती, जसे बदल्यांबाबतची माहिती वेळोवेळी अद्ययावत केली जावी आणि सदर माहिती संकेतस्थळावरील (website) वर दर्शविली जाईल याबाबत, माहिती व तंत्रज्ञान विभागाने सुनिश्चिती/खातरजमा करावी असे मा.राज्य माहिती आयुक्त यांनी मा.मुख्य सचिव महोदयांना आदेशित केले आहे. या अनुषंगाने सर्व विभागांना सूचित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. तदनुसार शासन पुढीलप्रमाणे सूचित करीत आहे.

२. उपरोक्त पार्श्वभूमी लक्षात घेता, शासन असे आदेश देत आहे की, माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये अर्जदारांना माहिती उपलब्ध होण्याच्या दृष्टीने शासनातील सर्व विभाग व त्यांच्या अधिपत्याखालील क्षेत्रिय कार्यालयांनी दरवर्षी दि. १ जानेवारी व १ जुलै रोजी असे वर्षातून किमान दोन वेळा संकेतस्थळावरील (website) माहिती अद्ययावत करावी. अधिकाऱ्यांसंदर्भातील काही माहिती जसे बदल्यांविषयक माहिती वेळोवेळी अद्ययावत केली जावी.

३. वरिलप्रमाणे माहिती संबंधीत संकेतस्थळावर (website) वर दर्शविली जाईल याबाबत माहिती व तंत्रज्ञान विभागाने खातरजमा करावी

४. उपरोक्त बाब सर्व मंत्रालयीन विभाग प्रमुखांनी त्यांच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख, सार्वजनीक प्राधिकरण तसेच सर्व संबंधीतांच्या निदर्शनास आणून द्याव्यात व तदनुसर आवश्यक कार्यवाही करण्याबाबत त्यांना सूचित करण्यात यावे.

५. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०१२८१५२०१६७००७ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

Rajendra M Jadhav

( रा.मा.जाधव )
शासनाचे उप सचिव.

प्रति,

१) मा.राज्यपाल यांचे सचिव,
२) मा.मुख्यमंत्री / मा.उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव/सचिव.
३) सचिव, मुख्य सचिवांचे कार्यालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
४) राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य मुंबई.
५) सर्व राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य मुंबई.
६) *प्रबंधक, मूळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई
७) *प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई
८) *सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
९) *सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
१०) प्रबंधक, लोकआयुक्त व उपलोकआयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
११) मंत्रालयीन विभागाचे सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव
१२) सचिव, माहिती व तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई
१३) महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई
१४) सर्व मंत्रालयीन विभाग
१५) सर्व विभागीय आयुक्त
१६) महासंचालक, यशदा, पुणे
१७) सर्व जिल्हाधिकारी
१८) निवडनस्ती, सा.प्र.वि. कार्यासन सहा.

*पत्राने

माहितीचा अधिकार अधिनियम,२००५
अंतर्गत मा.मंत्री/राज्यमंत्री यांचे कार्यालयात
जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी
पदनिर्देशित करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय,क्र.तक्रार-२६१५/१४५०/प्र.क्र.२९९/२१
मंत्रालय,मुंबई ४०० ०३२.
दिनांक : १३ ऑक्टोबर, २०१६.

प्रस्तावना:

मा.मंत्री/राज्यमंत्री यांचे कार्यालयाकडून विविध प्रकारची कर्तव्ये पार पाडली जातात, जसे विविध विभागाकडून प्राप्त होणा-या धारिका, जनतेकडून प्राप्त होणारे अर्ज,अर्जांवर कार्यवाही करणे,जनतेकडून प्राप्त होणा-या तक्रारी यावर कार्यवाही करणे आणि विविध प्राधिकरणे/ कार्यालये यांचेशी पत्रव्यवहार करणे इत्यादी. त्यामुळे सदर कार्यालये माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २ (ज) (घ) च्या कक्षेत येत असल्यामुळे मा.मंत्री/ राज्यमंत्री यांचे कार्यालयात जन माहिती अधिकारी/ अपिलीय प्राधिकारी पदनिर्देशित करण्याबाबत मा.मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांनी निदेश दिले आहेत. त्या अनुषंगाने मा.मंत्री/ राज्यमंत्री यांचे कार्यालयात माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ५(१) अन्वये जन माहिती अधिकारी व कलम १९(१) अन्वये अपिलीय प्राधिकारी घोषित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

उपरोक्त पार्श्वभूमीवर मा.मंत्री/ राज्यमंत्री यांचे कार्यालयात प्राप्त होणा-या धारिका, जनतेकडून प्राप्त होणारे अर्ज,जनतेकडून प्राप्त होणा-या तक्रारी,यावर केलेली कार्यवाही आणि विविध प्राधिकरणे/ कार्यालये यांचेशी केलेला पत्रव्यवहार इ. बाबत मा.मंत्री/ राज्यमंत्री यांचे कार्यालयातील माहिती पुरविण्यासाठी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ५(१) अन्वये मा.मंत्री/ राज्यमंत्री यांचे कार्यालयाने जन माहिती अधिकारी व कलम १९(१) अन्वये अपिलीय प्राधिकारी नियुक्त करण्याची कार्यवाही करावी.

२. संबंधीत जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदींचे काटेकोरपणे पालन करावे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६१०१४१७५१०५८००७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Kiran Shantaram Parab

Digitally signed by Kiran Shantaram Parab
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Under Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=4c2548f01685133f2101688957e7a23 2926f42ddad4c294df0a59a75f205ac1, cn=Kiran Shantaram Parab
Date: 2016.10.14 17:55:03 +05'30'

**(कि. शां. परब)**
अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग

प्रत,

१) मा.राज्यपाल यांचे सचिव,राजभवन,मुंबई
२) मा.मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव/सचिव,मुख्यमंत्री सचिवालय,मंत्रालय,मुंबई
३) मा.मुख्य माहिती आयुक्त व सर्व माहिती आयुक्तांची कार्यालये
४) शासनाचे सर्व मा.अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,मंत्रालय,मुंबई
५) मा.सचिव,मुख्य सचिव कार्यालय,मंत्रालय,मुंबई
६) मा.आयुक्त,राज्य माहिती आयोग(सर्व)
७) *प्रबंधक,मा.उच्च न्यायालय,मूळ शाखा,मुंबई
८) *प्रबंधक,मा.उच्च न्यायालय,अपिल शाखा,मुंबई
९) *प्रबंधक,मा.लोक आयुक्त व उपलोक आयुक्त यांचे कार्यालय,मुंबई
१०) *मा.सचिव,महाराष्ट्र लोकसेवा आयोग,मुंबई
११) *सचिव,राज्य निवडणूक आयोग,नवीन प्रशासन भवन,मुंबई
१२) *मा.प्रधान सचिव,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई
१३) *प्रबंधक,महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण,मुंबई
१४) सर्व मा.मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव/विशेष कार्य अधिकारी/स्वीय सहायक,मंत्रालय,मुंबई
१५) सर्व मंत्रालयीन विभाग
१६) सर्व सह/उप सचिव,सामान्य प्रशासन विभाग,मंत्रालय,मुंबई
१७) निवड नस्ती

*पत्राने

२८ सप्टेंबर हा दिवस आंतरराष्ट्रीय माहिती अधिकार दिन म्हणून साजरा करणे

[33]

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्रमांक : केंमाअ-२००८/प्र.क्र. ३७८य०८/सहा,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

प्रस्तावना

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ हा कायदा देशभरात दि. १२/१०/२००५ पासून लागू करण्यात आला आहे. शासनाने वेळोवेळी जाणीवपूर्वक उचललेल्या पावलांमुळे अल्पावधीतच राज्यात हा कायदा लक्षणीय स्वरूपात लोकाभिमुख झाला आहे. महाराष्ट्रात माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ या कायद्याच्या व्यापक प्रसिद्धीकरिता व प्रभावी अंमलबजावणीकरिता शासनस्तरावरून सर्वतोपरी उपाययोजना करण्यात येत आहेत. दि. २८ सप्टेंबर हा दिवस आंतरराष्ट्रीय स्तरावर माहिती अधिकार दिन म्हणून साजरा करण्यात येतो. या दिवशी माहितीचा अधिकार अधिनियम या कायद्यातील तरतुदी आणि कार्यपद्धती विविध दृकश्राव्य माध्यमांतून व्यापक प्रसिद्धी देऊन प्रतिवर्षी २८ सप्टेंबर हा दिवस माहितीचा अधिकार दिन म्हणून राज्यभर साजरा करण्यांत यावा, असा निर्णय शासनाने घेतला आहे. त्या अनुषंगाने खालीलप्रमाणे निर्णय प्रसृत करण्यात येत आहे:

शासन निर्णय

दि:२८ सप्टेंबर हा दिवस राज्यपातळीवर प्रतिवर्षी माहिती अधिकार दिन म्हणून साजरा करण्यात यावा. या दिवशी शालेय शिक्षण विभाग तसेच उच्च व तंत्रशिक्षण विभागाने सर्व शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे व इतर शैक्षणिक संस्थांमध्ये माहितीचा अधिकार या विषयावर आधारित प्रश्नमंजूषा, चित्रकला, निबंध व वक्तृत्व इ. सारख्या स्पर्धा तसेच चर्चासत्र व व्याख्यानमाला आयोजित कराव्यात. सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी स्थानिक स्वराज्य संस्था व अशासकीय समाजसेवी संस्थांच्या मदतीने समाज कार्यकर्त्यांकरिता व इच्छुक गटाकरिता भित्तिपत्र स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, चर्चासत्र, व्याख्यानमाला इ. उपक्रम आयोजित करावेत. या उपक्रमांसाठीच्या पारितोषिकांची व्यवस्था स्थानिक पातळीवर लायन्स क्लब, रोटरी क्लब अशा विविध समाजसेवी संस्थांच्या सहयोगाने करण्यात यावी. अशा प्रकारे दि. २८ सप्टेंबर हा दिवस राज्यपातळीवर प्रतिवर्षी माहिती अधिकार दिन म्हणून साजरा करून माहितीच्या अधिकाराबाबत समाजात व्यापक पातळीवर राबविण्याची जबाबदारी सर्व जिल्हाधिकाऱ्यांवर सोपविण्यात येत आहे.

माहिती अधिकार दिनानिमित्त जिल्ह्यात राबविण्यात आलेल्या उपक्रमांचा अहवाल जिल्हाधिकाऱ्यांनी शासनास दर वर्षी ऑक्टोबर अखेर सादर करावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

(न.म.शिंदे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ करिताच्या बोधचिन्हा (LOGO) बाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
शासन परिपत्रक क्रमांक – केमाअ २०११/४०८/प्र.क्र. २२९/११/सहा,
मंत्रालय, मुंबई – ४०००३२.
दिनांक : २२/११/२०११

परिपत्रक :-

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ करिता केंद्र शासनाने "बोधचिन्ह" (LOGO) तयार केलेले आहे. (सोबत झेरॉक्स प्रत जोडली आहे.) हे बोधचिन्ह सर्व शासकीय कार्यालयात / सार्वजनिक प्राधिकरणात जेथे कार्यालयीन टपाल स्वीकारले जाते तेथे ठळकपणे दृष्टिपथास पडेल अशा ठिकाणी प्रदर्शित करावयाचे आहे, तसेच ते शासनाच्या सर्व प्रकारच्या लेखनसामग्रीवर प्रादेशिक मराठी भाषेत छापून घेणे आवश्यक आहे.

२. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या बोधचिन्हाचा (LOGO) वापर कसा करावा याबाबतच्या मार्गदर्शक सूचना केंद्र शासनाच्या www.rtigateway.org.in या संकेतस्थळावर तसेच सामान्य प्रशासन विभागाच्या gad.maharashtra.gov.in या संकेतस्थळावरही उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत.

३. सर्व मंत्रालयीन विभागांना विनंती करण्यात येते की, मंत्रालयीन विभागामध्ये तसेच त्यांच्या अधिपत्याखालील सर्व कार्यालयांच्या व संबंधित सार्वजनिक प्राधिकरणाच्या ठिकाणी हे बोधचिन्ह प्रदर्शित करण्याबाबत तसेच सर्व शासकीय सामुग्रीवरही छापून घेण्याबाबत सूचना देण्यात याव्यात. याची काटेकोरपणे अंमलबजावणी करुन अनुपालन अहवाल या विभागास तत्काळ सादर करण्यात यावा.

४. हे परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाइटवर उपलब्ध करण्यात आले असून, त्याचा संगणक संकेतांक २०११११२२१११४१४००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(नंदकुमार जंत्रे)
सचिव (प्र.सु.व र.व का.)

प्रति, मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई

राज्य माहिती आयोगाने माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी शासनास केलेल्या शिफारशींचे अनुपालन करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन परिपत्रक क्र.रामाआ २०१६ /प्र.क्र. (१७८/१६) सहा.
मंत्रालय, मुंबई - ४००० ३२.
दिनांक- १.२.२०१७.

परिपत्रक:-

राज्य माहिती आयोगाने माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी शासनास वेळोवेळी शिफारशी केलेल्या आहेत. सदर शिफारशींव्दारे करण्यात आलेल्या सूचनांचे अनुपालन करण्याची अपेक्षा राज्य माहिती आयोगाने आयोगाच्या सन २०१६ च्या वार्षिक अहवालात व्यक्त केली आहे. राज्य माहिती आयोगाने सन २००७ पासून केलेल्या शिफारशीनुसार सर्व सार्वजनिक प्राधिकरणांना शासनाने वेळोवेळी सूचित केलेले आहे. तथापि, अद्यापि, त्याबाबत पुरेसे अवधान सार्वजनिक प्राधिकरणांकडून दिले जात नसल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आलेली आहे. त्यामुळे राज्य माहिती आयोगाच्या शिफारसींसंदर्भात तातडीने कार्यवाही करण्याची बाब सर्व संबंधीतांच्या निदर्शनास आणण्याचे शासनाच्या विचाराधीन होते. तदनुसार शासन पुढीलप्रमाणे सूचित करीत आहे.

२. राज्य माहिती आयोगाने माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी माहिती अधिकार अधिनियम, २००५ अन्वये प्राप्त होणारे माहिती अर्ज तसेच प्रथम अपील अर्ज निकाली काढण्यासाठी पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

(१) माहिती अधिकार अधिनियम, २००५ अन्वये प्राप्त झालेल्या माहिती अधिकार अर्जाचा क्रमांक व दिनांक, संबंधीत सार्वजनिक प्राधिकरणात माहिती अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक संबंधीत जन माहिती अधिकाऱ्याचे नाव, पदनाम, पत्ता, अधिकृत दुरध्वनी क्रमांक आणि ई - मेल नमूद अर्जदारास पाठविण्यात येणाऱ्या पत्रात स्पष्टपणे नमूद करावा.

(२) माहिती अधिकार अधिनियम, २००५ अन्वये माहिती अर्ज उत्तरित करताना त्यामध्ये प्रथम अपील अधिकाऱ्याचे नाव, पदनाम, पत्ता, अधिकृत दुरध्वनी क्रमांक आणि ई - मेल नमूद करण्यात यावा. तसेच उत्तराच्या शेवटच्या परिच्छेदात "जन माहिती अधिकाऱ्याचे पत्र प्राप्त झाल्यापासून ३० दिवसात प्रथम अपील दाखल करण्यात यावे" असे स्पष्टपणे नमूद करावे.

(३) माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६(३) अन्वये माहिती अधिकार अर्ज अन्य सार्वजनिक प्राधिकरणाकडे हस्तांतरित करण्यात येत असल्यास, ज्या सार्वजनिक प्राधिकरणाकडे सदर अर्ज हस्तांतरित करण्यात येणार आहे त्या प्राधिकरणाची सविस्तर माहिती पत्रात नमूद करावी.

(४) संबंधीत कार्यालयातील कामाचा पुरेसा अनुभव व दर्जा असणाऱ्या योग्य वरिष्ठतेच्या अधिकाऱ्यांची जन माहिती अधिकारी/प्रथम अपील अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात यावी . माहितीच्या अधिकारांतर्गत पत्रव्यवहार करताना, सर्व जन माहिती अधिकारी व प्रथम अपील अधिकारी यांनी त्यांच्या स्वाक्षरीखाली त्यांचे नाव, पदनाम तसेच विभागाचे नाव ठळकपणे नमूद करावे.

(५) मागणी केलेली माहिती नाकारण्यात येत असल्यास, माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे संबंधीत कलम उधृत करण्यासह माहिती नाकारण्याची सविस्तर कारणमिमांसा नमूद करावी.

(६) माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(१) व (२) नुसार प्रथम अपील अधिकाऱ्याने अपीलकर्त्यास सुनावणीसाठी पुरेश्या कालावधीसह सुस्पष्ट नोटीस पाठवावी. सदर नोटीसीची प्रत जन माहिती अधिकाऱ्यासही पाठवावी. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी त्यांचा खुलासा/माहिती आवश्यकतेनुसार तोंडी वा लेखी घ्यावा. प्रथम अपील अधिकाऱ्याने तीस दिवसाचे आत प्रथम अपील निकाली काढणे आवश्यक आहे. अधिनियमातील कलम १९(६) नुसार अपील निकाली काढताना झालेल्या विलंबाबाबत कारणमिमांसा करून त्याबाबतचे आदेश निर्गमित करावेत. आदेशाची प्रत अपीलकर्त्यास तात्काळ उपलब्ध करून द्यावी.

(७) सर्व सार्वजनिक प्राधिकरणांनी त्यांच्या अधिपत्याखालील सर्व जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय प्राधिकारी यांची माहिती सर्वसामान्यास सहजी उपलब्ध होऊ शकेल अशी त्यांच्या विभागात दर्शनी भागावर लावावी. शक्य असल्यास सार्वजनिक प्राधिकरणांनी त्यांच्या अधिपत्याखालील सर्व जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय प्राधिकारी यांची माहिती असणारी पुस्तिका प्रसिध्द करावी.

(८) माहिती अधिकार अधिनियम, २००५ अन्वये अर्जदाराने माहिती साक्षांकीत करून मागीतलेली असल्यास संबंधीत जन माहिती अधिकाऱ्याने ती माहिती साक्षांकीत करून उपलब्ध करून द्यावी. उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या कागदपत्राची/अभिलेखाची संख्या मोठी असल्यास माहितीचे साक्षांकन आवश्यकता असल्यास त्याच्या कनिष्ठ राजपत्रित अधिकाऱ्यास करता येईल. साक्षांकनासाठी पुढीलप्रमाणे रबरी शिक्का तयार करून घ्यावा.

| |
|---|
| माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या कागदपत्राची/अभिलेखाची सत्यप्रत.<br><br>सही व दिनांक/-<br>संबंधीत जन माहिती अधिकाऱ्याचे तसेच सार्वजनिक प्राधिकरणाचे नाव (ठसा). |

(९) सर्व सार्वजनिक प्राधिकरणांनी त्यांच्याकडील योजनांचा तपशील, त्याचा प्रस्तावित खर्च, अर्थसंकल्पीय तरतूद, प्रत्यक्ष खर्च याबाबतची, माहिती अधिनियमातील कलम ४ अन्वये सकारात्मक प्रसिध्द करावी.

(१०) सर्व सार्वजनिक प्राधिकरणांनी त्यांच्याशी संबंधीत ज्या अशासकीय संस्थांना शासनाकडून प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे निधी पुरवठा केला जातो अशा संस्थांची यादी सकारात्मकपणे स्व:ताहून प्रसिध्द करावी.

(११) राज्य माहिती आयोगाने दिलेल्या निर्णयाची अंमलबजावणी तातडीने करण्यात यावी. राज्य माहिती आयोगाच्या आदेशाची अवहेलना झाल्यास शास्ती होऊ शकते याकडे लक्ष वेधण्यात येत आहे. ज्या प्रकरणांमध्ये संबधीत सार्वजनिक प्राधिकरणांनी आयोगाच्या आदेशानुसार अर्जदारास माहिती उपलब्ध करून देण्यात आलेली नाही, आयोगाच्या आदेशानुसार शास्तीची वसूली केलेली नाही किंवा शिस्तभंगाची कार्यवाही केलेली नाही अशा सार्वजनिक प्राधिकरणांविरूध्द योग्य ती कारवाई करण्यात यावी.

(१२) सर्व सार्वजनिक प्राधिकरणांनी त्यांच्याकडील त्यांच्या कडील अभिलेख सूचीबध्द करून घ्यावा. संगणकीकरण करण्यायोग्य अभिलेखांचे संगणकीकरण करण्यात यावे.

(१३) दारिद्र रेषेखालील अर्जदारांना हवी असलेली माहिती विनामुल्य देण्यात यावी. जास्त पृष्ठांची माहिती असल्यास त्यांना माहिती पाहणीकरिता कार्यालयात येण्याची विनंती करण्यात यावी व

पाहणीनंतर त्यांनी मागणी केलेली ५० पृष्ठांपर्यंतची माहिती विनामुल्य उपलब्ध करून देण्यात यावी. त्यापेक्षा जास्त माहिती असल्यास त्यासाठी नियमित दराने आकारणी करण्यात यावी.

(१४) माहितीचा अधिकार व माहिती अपीलांसाठी आवश्यकतेनुसार स्वतंत्र टपाल व्यवस्था करण्यात यावी. नागरिकाने माहिती ई-मेल व्दारा उपलब्ध करून देण्याची विनंती केली असल्यास, शक्य असल्यास माहितीच्या प्रती स्कॅन करून माहिती ई-मेल व्दारा उपलब्ध करून देण्यात यावी. ज्या सार्वजनिक प्राधिकरणांकडे मोठया प्रमाणावर माहिती अर्ज तसेच अपील अर्ज येतात त्या सार्वजनिक प्राधिकरणांनी विशेष कर्मचारी/अधिकारी वर्ग नेमून त्यांना योग्य ती साधनसामग्री व कार्यालयीन खर्चासाठी निधी उपलब्ध करून द्यावा.

(१५) शासकीय कामकाजामध्ये सुधारणा व कामकाजाची माहिती होण्यासाठी सर्व कर्मचाऱ्यांच्या सेवा प्रवेशोत्तर परिक्षा घेण्यात येतात, या परिक्षांच्या अभ्यासक्रमामध्ये माहितीचा अधिकार, अधिनियम २००५, महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख, २००५ तसचे महाराष्ट्र शासकीय कामात विलंब करणेस प्रतिबंध करण्याचा अधिनियम, २००५ चे प्रकरण ३ या विषयाचा समावेश करावा.

४. उपरोक्त परिपत्रकातील तरतूदी सर्व मंत्रालयीन विभाग प्रमुखांनी त्यांच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख, सार्वजनीक प्राधिकरण तसेच सर्व संबंधीतांच्या निदर्शनास आणून द्याव्यात व तदनुसार आवश्यक कार्यवाही करण्याबाबत त्यांना सूचित करण्यात यावे.

५ सदर परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा सांकेतांक क्र. २०१७०२०११५५५४०८१०७ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

Rajendra M Jadhav

Digitally signed by Rajendra M Jadhav
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=GENERAL ADMINISTRATION DEPT., postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=656ebca17998fd5c29178a5abcf1aa60d72bd5515ddc791d9ad9786418f07e4f, cn=Rajendra M Jadhav
Date: 2017.02.01 16:00:04 +05'30'

(रा.मा.जाधव)
शासनाचे उप सचिव.

प्रति,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव,
२. मा.मुख्यमंत्री / मा.उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव/सचिव.
३. सचिव, मुख्य सचिवांचे कार्यालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
४. राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य मुंबई.
५. सर्व राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य मुंबई.
६. *प्रबंधक, मूळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई
७. *प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई
८. *सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
९. *सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
१०. प्रबंधक, लोकआयुक्त व उपलोकआयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
११. मंत्रालयीन विभागाचे सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव
१२. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई

१३.सर्व मंत्रालयीन विभाग (प्रशासकीय अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख/ कार्यालय प्रमुख यांच्या निदर्शनास आणण्याच्या विनंतीसह )

१४.सर्व विभागीय आयुक्त

१५.महासंचालक, यशदा, पुणे

१६.सर्व जिल्हाधिकारी

१७.निवडनस्ती, सा.प्र.वि. कार्यासन सहा.

*पत्राने

माहितीच्या शुल्काची रक्कम अर्जदारास टपालखर्चासह कळविण्याबाबत आणि माहिती अधिकाराशी संबंधीत पत्रव्यवहाराचा आढावा घेऊन त्यासाठी आवश्यक आर्थिक तरतूद करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन परिपत्रक क्र.संकिर्ण २०१७ /प्र.क्र.(२०८/१७) सहा.
मंत्रालय, मुंबई - ४००० ३२.
दिनांक- १७.११.२०१७.

परिपत्रक:-

माहिती अधिकारात अर्जदाराला वेळेवर माहिती मिळण्यासाठी, जन माहिती अधिकाऱ्याने, माहिती अर्ज प्राप्त झाल्यानंतर १० व्या दिवसापर्यंत माहितीच्या शुल्काची रक्कम अर्जदारास जलदगती टपालाने टपालखर्चासह तपशीलवार कळविण्याबाबत एक परिपत्रक निर्गमित करण्याचे निर्देश व्दितीय अपील क्र.केआर ५०४१/२०१६ मध्ये दि.९.८.२०१७ रोजी मा. राज्य माहिती आयुक्त, कोकण यांनी दिले आहेत आणि अन्य व्दितीय अपील क्र.केआर ५१८४/२०१६ मध्ये १० व्या दिवसापर्यंत माहितीच्या शुल्काची रक्कम जलदगती टपालाने अर्जदारास टपालखर्चासह कळविण्यासह शासन कार्यालयातील माहिती अधिकाराशी संबंधीत पत्रव्यवहाराचा तपशीलवार आढावा घेऊन, माहिती अधिकार अधिनियमांतर्गत होणाऱ्या पत्रव्यवहारासाठी आवश्यक आर्थिक तरतूद तीन महिन्यात करण्याचे निर्देश मा. राज्य माहिती आयुक्त, कोकण यांनी दि.११.८.२०१७ रोजी दिले आहेत. मा.राज्य माहिती आयुक्त, कोकण खंडपीठ यांच्या सदर निर्देशानुषंगाने सर्व विभागांना सूचित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. तदनुसार शासन पुढीलप्रमाणे सुचित करीत आहे.

२. "जन माहिती अधिकाऱ्याने, माहिती अर्ज प्राप्त झाल्यानंतर, १० व्या दिवसापर्यंत माहितीच्या शुल्काची रक्कम अर्जदारास टपाल पृष्ठसंख्या व टपालखर्चासह, जलदगती टपालाने तपशीलवार कळवावी. तसेच सर्व सार्वजनिक प्राधिकरणांनी त्यांच्या कार्यालयातील माहिती अधिकाराशी संबंधीत पत्रव्यवहाराचा तपशीलवार आढावा घेऊन माहिती अधिकार अधिनियमांतर्गत होणाऱ्या पत्रव्यवहारासाठी दरवर्षी आवश्यक आर्थिक तरतूद करावी ".

३. उपरोक्त परिपत्रकातील तरतूदी सर्व मंत्रालयीन विभाग प्रमुखांनी त्यांच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख, सार्वजनिक प्राधिकरण तसेच सर्व संबंधीतांच्या निदर्शनास आणून द्याव्यात व तदनुसार आवश्यक कार्यवाही करण्याबाबत त्यांना सूचित करण्यात यावे.

४ सदर परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा सांकेतांक क्र. २०१७१११७११३२२९३००७ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Chhaya Kiran Wadte

Digitally signed by Chhaya Kiran Wadte
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=f311bd8712a7b94b3b73d0e88ad01cf3a49c098bcd5f62e16e7135388baa523c, serialNumber=5bac345149360802f8cd3e4ab4ec174f2fec1bff420e81931e638ee6cdfcc12d, cn=Chhaya Kiran Wadte
Date: 2017.11.17 11:34:55 +05'30'

(छा.कि.वडते)

शासनाच्या उप सचिव.

प्रति,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव,

२. मा.मुख्यमंत्री / मा.उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव/सचिव.

३. सचिव, मुख्य सचिवांचे कार्यालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

४. राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य मुंबई.

५. सर्व राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य मुंबई.

६. *प्रबंधक, मूळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई

७. *प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई

८. *सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई

९. *सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई

१०.*प्रबंधक, लोकआयुक्त व उपलोकआयुक्त यांचे कार्यालय, मुंबई

११.मंत्रालयीन विभागाचे सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव

१२.महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई

१३.सर्व मंत्रालयीन विभाग

१४.सर्व विभागीय आयुक्त/ सर्व जिल्हाधिकारी

१५.महासंचालक, यशदा, पुणे

१६.निवडनस्ती, सा.प्र.वि. कार्यासन सहा. *पत्राने

[41]

माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या अंमलबजावणीबाबत द्वितीय अपील सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन परिपत्रक क्र.संकिर्ण २०१५/प्र.क्र.(२२२/१५)सहा.
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक: ०१.१२.२०१५.

पहा - मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर यांचे दि. १२.५.२०१५ चे आदेश

परिपत्रक

माहिती अधिकारातील काही प्रकरणात अर्जदारांच्या माहिती अर्जास प्रतिसाद दिला जात नाही, अशा प्रकरणी झालेल्या प्रथम अपीलाकडे, माहिती उपलब्ध करून देण्यानुषंगाने तसेच माहिती अधिकार अधिनियम २००५ ची अंमलबजावणी करण्यानुषंगाने सकारात्मक कार्यवाही न करता, माहिती उपलब्ध करून देण्यानुषंगाने हेतुपुरस्सर टाळाटाळ केली जाते, प्रथम अपीलीय अधिकारी, तत्कालीन जन माहिती अधिकारी तसेच इतर संबंधीत अधिकारी आयोगाच्या पूर्वपरवानगीशिवाय किंवा कोणतीही लेखी सूचना न देता अपीलाच्या सुनावणीस गैरहजर राहतात असे श्रीमती दुर्गा जोहरी यांनी केलेल्या द्वितीय अपील क्र. ११४२/२०१४ मध्ये दि. १२.५.२०१५ रोजी निर्णय देताना मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर यांनी निर्णयात नमूद केले असून त्याकडे मा. मुख्य सचिव महोदयांचे लक्ष वेधले आहे. त्यावर आवश्यक सूचना निर्गमित करण्याचे मा. मुख्य सचिव महोदयांनी आदेशित केले आहे. या अनुषंगाने सर्व विभागांना सूचित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. तदनुसार शासन पुढीलप्रमाणे सूचित करीत आहे.

२. उपरोक्त पार्श्वभूमी लक्षात घेता, शासन असे आदेश देत आहे की, माहिती अधिकार प्रकरणात अर्जदारांना माहिती उपलब्ध करून देण्यानुषंगाने सकारात्मक कार्यवाही करण्यात यावी. माहिती उपलब्ध करून देण्यानुषंगाने संबंधीत जन माहिती अधिकाऱ्याने तसेच प्रथम अपीलीय अधिकाऱ्याने माहिती उपलब्ध करून देण्यात हेतुपुरस्सरपणे टाळाटाळ केल्याचे निदर्शनास आल्यास त्याची गंभीर दखल घेतली जाईल. द्वितीय अपील सुनावणीत तत्कालीन जन माहिती अधिकारी, आयोगाने आदेशित केले असल्यास प्रथम अपीलीय प्राधिकारी तसेच इतर संबंधीत अधिकारी आयोगाच्या पूर्वपरवानगीशिवाय किंवा कोणतीही लेखी सूचना न देता द्वितीय अपीलाच्या सुनावणीस गैरहजर राहिल्यास आवश्यकतेनुसार त्यांच्यावर नियमानुसार कार्यवाही प्रस्तावित करण्यात येईल.

३. उपरोक्त बाब सर्व मंत्रालयीन विभाग प्रमुखांनी त्यांच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख, सार्वजनिक प्राधिकरण तसेच सर्व संबंधीतांच्या निदर्शनास आणून द्याव्यात व तदनुसार आवश्यक कार्यवाही करण्याबाबत त्यांना सूचित करण्यात यावे.

४. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०१५१२०११२११०८२८०७ असा आहे. हे परिपत्रक डीजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(राजेंद्र मा. जाधव)
शासनाचे उप सचिव

Online RTI द्वारे प्राप्त झालेले अर्ज विहित
कालावधित निकाली काढण्यासंदर्भात

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन परिपत्रक क्र. संकिर्ण २०१६/प्र.क्र.१६१/२०१६/सहा.
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२
दि. २०.१०.२०१६

परिपत्रक

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ राज्यात दि. १२.१०.२००५ पासून अंमलात आला आहे. दि. १.१.२०१५ पासून Online R.T.I. ही सुविधा शासनाच्या मंत्रालयातील सर्व विभागात सुरु करण्यात आलेली आहे.

२. Online R.T.I. द्वारे प्राप्त झालेले अर्ज विहित कालावधित निकाली काढण्याबाबत काही विभागांमध्ये उचित कार्यवाही केली जात नसल्याने अर्जदाराकडून त्यावर अपील दाखल करण्यात येत असून अशी अपीले देखील मोठ्या प्रमाणावर प्रलंबीत राहत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे. Online R.T.I. portal चे सर्व्हर बऱ्याचवेळी कार्यान्वीत होत नसल्याची तक्रार अर्जदार तसेच अधिकाऱ्यांकडून केली जाणे, काही विभागातील Nodal Officers यांनी त्यांच्या विभागातील बदलीने पदस्थापित अधिकाऱ्यांची नावे/दुरध्वनी क्रमांक इ. बाबतचा सपशील न सुधारणे, तसेच अधिनियमातील कलम ४(१)(ब) नुसार काही विभागांनी त्यांच्या संकेत स्थळावरील माहिती वेळोवेळी सुधारीत केलेली नसणे इ. स्वरूपाच्या तक्रारी मा. मुख्यमंत्री सचिवालयाकडे प्राप्त होत आहेत.

३. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६(१) नुसार माहिती मिळविण्याची इच्छा असलेल्या व्यक्तीस इलेक्ट्रॉनिक साधनाद्वारे विनंती करण्यात येईल अशी तरतूद आहे. या अनुषंगाने Online माहिती अर्ज स्वीकारण्यासाठी व संबंधीतांना माहिती उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने rtionline.maharashtra.gov.in या नावाचे पोर्टल सुरू केले आहे. Online R.T.I. सुविधेच्या गतीमान अंमलबजावणीसाठी सर्वच विभागांनी तत्परतेने कार्यवाही करणे आवश्यक असून त्यांच्या विभागाकडे प्रलंबित असलेल्या प्रकरणांचा निपटारा करणे आवश्यक आहे. यासाठी प्रत्येक विभाग/कार्यालयाद्वारे नियुक्त केलेल्या Nodal Officer यांना महत्त्वाची भूमिका पार पाडावयाची असून वेळोवेळी आवश्यक त्या उपाययोजना करणे आवश्यक आहे. याबाबत उचित कार्यवाही करण्यासाठी सर्व प्रशासकीय विभाग प्रमुखांनी त्यांच्या विभागातील नियुक्त Nodal अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना द्याव्यात.

४. हे परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून, त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०१६१०२०१२२२५७७९०७ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(डॉ. भगवान सहाय)
अपर मुख्य सचिव (र.व.का.)

राज्य माहिती आयोगाकडून पारित होणारे निर्णय, निर्देश इत्यादिंचे काटेकोरपणे पालन होण्याबाबत [43]

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन परिपत्रक क्र.संकिर्ण २०१४/प्र.क्र.(२४०/१४)सहा.
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक १७.०२.२०१५.

परिपत्रक

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८(३) मध्ये नमूद केलेल्या बाबींसंदर्भात
चौकशी करण्यासाठी राज्य माहिती आयोगास दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ (१९०८ चा ५) अन्वये
दाव्याची न्यायचौकशी करताना, दिवाणी न्यायालयाकडे जे अधिकार निहित करण्यात आलेले आहेत, तेच
अधिकार असतील असे स्पष्ट करण्यात आले आहे. तसेच सदर अधिनियमाच्या कलम१९(७) अन्वये तक्रारी
व द्वितीय अपीलासंदर्भातील आयोगाचा निर्णय बंधनकारक असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे
आयोगाने सार्वजनिक प्राधिकरणांना दिलेले निर्देश, तक्रारी व द्वितीय अपीलावरील आयोगाचे निर्णय इत्यादिंचे
अनुपालन विहित कालावधीत करणे आवश्यक आहे. या अनुषंगाने शासनाने वेळोवेळी सूचनाही प्रसारित
केल्या आहेत. तथापि, काही सार्वजनिक प्राधिकरणाकडून आयोगास योग्य प्रतिसाद मिळत नसल्याचे
आणुषंगाने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २०(१) अन्वये आयोगाने शास्ती लावली
अथवा त्यांची वसूली संबंधितांकडून व्यवस्थित होत नसल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे.

२. उपरोक्त पार्श्वभूमी लक्षात घेता, सर्व मंत्रालयीन विभागांनी व त्यांच्या अधिपत्याखालील सर्व राज्य
जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय यांना सूचित करण्यात येते की, राज्य माहिती आयोगाने सर्वाजनिक
प्राधिकरणांना दिलेले निर्देश, तक्रारी व द्वितीय अपीलावरील आयोगाचे निर्णय इत्यादिंचे अनुपालन विहित
कालावधीत होण्यासाठी संबंधितांनी आवश्यक कार्यवाही करावी.

३. महाराष्ट्र कोषागार नियम, १९६८ नियम २५९(१) अन्वये ज्या अधिकाऱ्यांचे व कर्मचाऱ्यांचे वेतन
महाराष्ट्र कोषागार नियम, १९ मध्ये निघते, त्यांचे वेतन आहरित करणे, त्यामध्ये कपात करणे वा वेतन आहरण
व संवितरण अधिकारी व
शासकीय बाबी संबंधीत कर्मचारी/अधिकाऱ्याशी संबंधित विभागाच्या आहरण व संवितरण अधिकारी व
त्यांचे कार्यालय प्रमुख यांच्या कक्षेत येतात. एखाद्या कर्मचारी/अधिकाऱ्याच्या वेतनातून न्यायनिर्णयानुसार
वसूली करावयाची असल्यास अथवा त्याच्या वेतनावर जप्ती आलेली असल्यास अशा आदेशाच्या
अंमलबजावणीचे उत्तरदायित्व मुंबई वित्तिय नियमावली, १९५९ मधील नियम ८७ व ८९ नुसार संबंधित
कर्मचारी/अधिकाऱ्याशी संबंधित विभागाच्या आहरण व संवितरण अधिकाऱ्याचे आहे. त्यामुळे माहितीचा
अधिकाराच्या ज्या प्रकरणी अधिनियमातील २००५ च्या कलम २०(१) अन्वये माहिती आयोगाने शास्ती
लावली असेल त्या शास्तीची वसूली आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे किंवा जास्तीत जास्त तीन हप्त्यात
संबंधिताकडून करण्यात यावी. शास्तीच्या सदर रकमेची वसूली करण्याची जबाबदारी संबंधित कर्मचारी/
अधिकाऱ्याशी संबंधित विभागाच्या आहरण व संवितरण अधिकारी तसेच त्यांचे कार्यालय प्रमुख यांची
राहील. जेथे आयोगास यानुषंगाने अनुपालन अहवाल सादर होणे अपेक्षित आहे तेथे अनुपालन अहवाल विहित
कालावधीत सादर होईल अशी कटाक्षाने दक्षता घेण्यात यावी. अशा प्रकरणी कर्तव्यच्युती करणाऱ्याविरूद्ध
संबंधित सक्षम प्राधिकाऱ्याने तातडीने उचित विभागीय कार्यवाही करावी.

४. सदर शासन परिपत्रक वित्त विभागाचा अनौ. संदर्भ क्र.अनौसं २०१५/११/कोषा ५ दि. २७.१.२०१५
अनुसार त्या विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर
उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०१५०२१७१३१३५४५३०७ असा आहे. हे परिपत्रक
डीजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

(प्र.प्र गोसावी)
शासनाचे उप सचिव

माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या
कलम ४(१)(अे)(बी) च्या अंमलबजावणीबाबत.

[ 52 ]

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन परिपत्रक क्र.संकिर्ण २०१५/प्र.क्र.(४७/१५)सहा.
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: ५.५.२०१५.

पहा- (१) शासन आदेश क्र. केमाअ२००९/६३१/प्र.क्र.२६७/०९/सहा दि.१४.७.२००९
(२) शासन परिपत्रक क्र. केमाअ२०१३/१५६/प्र.क्र.३६०/सहा दि.९.५.२०१४
(३) शासन परिपत्रक क्र. संकिर्ण२०१४/प्र.क्र.(२४०/१४)सहा दि.१३.२.२०१५

परिपत्रक

माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८(३) मध्ये नमूद केलेल्या बाबींसंदर्भात चौकशी करण्यासाठी राज्य माहिती आयोगास दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ (१९०८ चा ५) अन्वये दाव्याची न्यायचौकशी करताना, दिवाणी न्यायालयाकडे जे अधिकार निहित करण्यात आलेले आहेत, तेच अधिकार असतील असे स्पष्ट करण्यात आले आहे. तसेच सदर अधिनियमाच्या कलम १९(७) अन्वये तक्रारी व द्वितीय अपीलासंदर्भातील आयोगाचा निर्णय बंधनकारक असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे आयोगाने सार्वजनिक प्राधिकरणांना दिलेले निर्देश, तक्रारी व द्वितीय अपीलावरील आयोगाचे निर्णय इत्यादिचे अनुपालन विहित कालावधीत करणे आवश्यक आहे. या अनुषंगाने शासनाने वेळोवेळी सूचनाही प्रसारित केल्या आहेत. तथापि, काही सार्वजनिक प्राधिकरणाकडून आयोगास योग्य प्रतिसाद मिळत नसल्याचे मा. मुख्य माहिती आयुक्तांनी दि. १६.३.२०१५ रोजी झालेल्या बैठकीत निदर्शनास आणले असून माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या अंमलबजावणीसाठी जिल्हाधिकारी यांना नोडल अधिकारी घोषित करून लोकशाही दिनाच्या दिवशी त्यांनी जिल्हा प्रमुखांच्या सभेत माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या अंमलबजावणीचा आढावा घ्यावा अशी सूचना काढण्याची आवश्यकता प्रतीत केली आहे. त्यावर मा. मुख्य सचिवांनी सर्व जिल्हाधिकाऱ्यांना सूचित करण्यात येईल असे बैठकीत सांगितले आहे. तदनुसार माहिती अधिकार अधिनियम २००५ च्यां अंमलबजावणीसाठी जिल्हाधिकारी यांना नोडल अधिकारी घोषित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. तदनुसार शासन पुढीलप्रमाणे आदेश देत आहे.

२. उपरोक्त पार्श्वभूमी लक्षात घेता, माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या अंमलबजावणीसाठी जिल्हाधिकारी याना नोडल अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. लोकशाही दिनाच्या दिवशी त्यांनी जिल्हा प्रमुखांच्या सभेत माहिती अधिकार अधिनियम २००५ च्यां अंमलबजावणीचा आढावा घेण्याचेही त्यांना सूचित करण्यात येत आहे. तदनुसार संबंधित जिल्हाधिकारी यांनी आवश्यक कार्यवाही करावी व त्याबाबतचा अहवाल राज्य माहिती आयोगास थेट सादर करावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

(र.व. गुरव)
शासनाचे उप सचिव

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय प्राधिकारी यांच्या नावाचे फलक लावण्याबाबत

[45]

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
परिपत्रक क्रमांक : अद्रत-१००८/प्र.क्र.१८/०८/११-अ,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : १५ मे २००८.

शासन परिपत्रक

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये नियुक्त करण्यात आलेल्या जन माहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय प्राधिकारी यांच्या नावाचे फलक अनेक क्षेत्रीय कार्यालयामध्ये लावण्यात आलेले नाहीत, असे मा. मुख्यमंत्री यांनी घेतलेल्या बैठकीत निदर्शनास आणून देण्यात आले. मा. मुख्यमंत्र्यांनी याबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली. फलक लावण्याचे काम पूर्ण झालेले नाही अशा ठिकाणी फलक लावण्याची कार्यवाही पुढील एक महिन्याच्या कालावधीत पूर्ण करावी, असे निर्देश मा. मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत.

२. सदर बैठकीमध्ये माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या नियम ४ खाली आवश्यक ठरविण्यात आलेली शासकीय कार्यालयांबाबतची १७ मुद्यांबाबतची माहिती अनेक कार्यालयांनी राज्य शासनाच्या वेबसाइटवर नोंदविलेली नाही, असे निदर्शनास आणून देण्यात आले. अशी माहिती प्रसिद्ध केली नसल्यास ती राज्य शासनाच्या वेबसाइटवर प्रसिद्ध करण्याची कार्यवाही तातडीने करण्यात यावी, अशा सूचना मा. मुख्यमंत्र्यांनी दिल्या. सदर माहिती वेळोवेळी अद्ययावत करण्यात यावी, असेही निर्देश बैठकीत देण्यात आले.

३. वरील निर्देशास अनुलक्षून मंत्रालयीन विभाग तसेच त्यांच्या अधिपत्याखालील सर्व क्षेत्रीय कार्यालये यामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये आवश्यक असलेले जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय प्राधिकारी यांचे फलक लावले जातील, तसेच माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या नियम ४ खालील १७ बाबींची माहिती प्रसिद्ध करण्याबाबत सर्व प्रशासकीय विभागांच्या सचिवांनी कार्यवाही करावी, असे या परिपत्रकाद्वारे निर्देशित करण्यात येत आहे. ही कार्यवाही पूर्ण करण्यासाठी तसेच माहिती वेळोवेळी अद्ययावत केली जाईल, हे पाहण्यासाठी प्रत्येक विभागाने एक नोडल अधिकारी नेमावा. नोडल अधिकारी नेमण्याबाबतचे आदेश शासनाच्या वेबसाइटवर प्रसिद्ध करण्यात यावे.

४. याबाबतचा पूर्तता अहवाल सर्व सचिवांनी सामान्य प्रशासन विभाग, कार्यासन क्रमांक ११-अ कडे दिनांक ३१ मे २००८ पर्यंत पाठवावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

स्वाक्षरी/-
(सतीश त्रिपाठी)
अपर मुख्य सचिव (सेवा)

[44]

**राज्य माहिती आयोगामार्फत [illegible] निर्देश, निर्णय इत्यादींचे अनुपालन करण्याबाबत**

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक क्र. केमाअ-२००८/६८८/प्र.क्र.२११/०८/६ (मा.अ.)
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : १० जून २००८

## परिपत्रक

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८(३) मध्ये नमूद केलेल्या बाबींसंदर्भात चौकशी करण्यासाठी राज्य माहिती आयोगास दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ (१९०८ चा ५) अन्वये दाव्यांची न्यायचौकशी करताना, दिवाणी न्यायालयाकडे जे अधिकार निहित करण्यात आलेले आहेत तेच अधिकार असतील असे स्पष्ट करण्यात आले आहे. तसेच कलम १९ (७) अन्वये तक्रारी व द्वितीय अपिलासंदर्भातील आयोगाचा निर्णय बंधनकारक असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे आयोगाने सार्वजनिक प्राधिकरणांना दिलेले निर्देश, तक्रारी व द्वितीय अपिलांवरील निर्णय इत्यादींचे अनुपालन विहित कालावधीत करणे आवश्यक आहे. मात्र, काही सार्वजनिक प्राधिकरणांकडून आयोगास योग्य प्रतिसाद दिला जात नसल्याचे निदर्शनास आले आहे.

वरील पार्श्वभूमी लक्षात घेता सर्व मंत्रालयीन विभागांनी तसेच सर्व मंत्रालयीन विभागांच्या अधिपत्याखालील सर्व राज्य जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी यांना सूचित करण्यात येते, की आयोगाने सार्वजनिक प्राधिकरणांना दिलेले निर्देश, तक्रारी व द्वितीय अपिलांवरील निर्णय इत्यादींचे योग्य रीतीने अनुपालन विहित कालावधीत करून आयोगाच्या निर्देशांप्रमाणे त्याचा अनुपालन अहवाल आयोगाने विहित केलेल्या कालावधीत आयोगास कटाक्षाने सादर करण्याची दक्षता घेण्यात यावी. याबाबत कर्तव्यच्युती करणाऱ्यांविरुद्ध संबंधित सक्षम प्राधिकाऱ्याने तातडीने उचित विभागीय कार्यवाही करावी.

हे परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाइटवर संगणक संकेतांक २००८०६१०१४५००००१ वर प्रसिद्ध करण्यात आलेले आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशाने व नावाने,

स्वाक्षरी/-
(प्र. मा. माळवदकर)
शासनाचे उपसचिव

महाराष्ट्र शासन

शासन परिपत्रक क्र. केमाअ-२००७/११८२/प्र.क्र.६५/०७/६ (मा.अ.)

सामान्य प्रशासन विभाग,

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२

दिनांक : १२ डिसेंबर २००७

परिपत्रक

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये माहिती अधिकाऱ्यांनी एक महिन्यात अर्जदारास माहिती पुरविणे आवश्यक आहे. पुरविलेल्या माहिती संदर्भात अर्जदार असमाधानी असल्यास तो प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्यांकडे अपील दाखल करू शकतो व त्यावर प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याने सर्वसाधारण परिस्थितीत ३० दिवसांत व अपवादात्मक परिस्थितीत ४५ दिवसात निर्णय घेणे आवश्यक आहे. प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्यांच्या निर्णयामुळे अर्जदाराचे समाधान झाले नसल्यास कलम १९ (३) अन्वये तो मुख्य आयुक्त, राज्य माहिती आयोग यांच्याकडे द्वितीय अपील दाखल करू शकतो.

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील उपरोक्त तरतुदीच्या अनुषंगाने राज्य माहिती आयोगाने शासनाच्या असे निदर्शनास आणून दिले आहे की, जवळजवळ ४५ टक्के प्रकरणांवर प्रथम अपीलीय प्राधिकारी अर्जदारांची अपिले निकाली काढताना आदेश पारित करीत नाहीत किंवा आदेश पारित केले असल्यास ते पारित करण्यापूर्वी संबंधित अर्जदारास सुनावणीची संधी देत नाहीत. अशा प्रकारे प्रथम अपीलीय प्राधिकारी या अधिनियमान्वये त्यांच्यावर सोपविण्यात आलेली जबाबदारी योग्यरीतीने पार पाडीत नाहीत. त्याचबरोबर त्यांच्या पर्यायाने अर्जदाराच्या हालअपेष्टांत भर पडत असून, त्यांना यथोचित न्याय मिळत नाही. या कार्यपद्धतीमुळे राज्य माहिती आयोगाकडे दाखल होणाऱ्या द्वितीय अपिलाच्या अनुषंगाने त्यांच्याही कामकाजात अनावश्यकपणे वाढ होत आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत राज्य शासनाकडील विविध मंत्रालयीन विभागांकडे व त्यांच्या अधिपत्याखालील क्षेत्रीय प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्यांकडे दाखल होणारी प्रथम अपिले ही अर्धन्यायिक (quasi-judicial) स्वरूपाची असून प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्यांनी या अनुषंगाने नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वाचे पालन करणे क्रमप्राप्त ठरते. म्हणून प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्यांनी अर्जदारास त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देऊन प्रकरण निकाली काढणे आवश्यक असते.

वरील पार्श्वभूमी लक्षात घेता सर्व मंत्रालयीन विभागातील तसेच सर्व मंत्रालयीन विभागाच्या अधिपत्याखालील सर्व प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्यांनी, त्यांच्याकडील प्रथम अपिलावर निर्णय घेण्यापूर्वी संबंधितांना त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी मिळण्याकरिता सुनावणीपूर्वी किमान ७ दिवस आगोदर नोटिस मिळेल अशा पद्धतीने सुनावणी घेऊन उचित समर्थनासह आवश्यक ते स्वयंस्पष्ट आदेश पारित करावेत. अपीलकर्त्यास नोटिस पाठविताना, त्याची इच्छा असल्यास तो स्वत: किंवा त्याचा प्रतिनिधी सुनावणीस उपस्थित राहू शकेल किंवा सुनावणीस उपस्थित न राहण्याचा पर्याय स्वीकारू शकेल, असा उल्लेख नोटिशीत करण्यात यावा व सदर नोटिस पोस्टाचा दाखला घेऊन (अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टिंग) पाठवावी. जेणेकरून अपीलकर्त्यास सुनावणीच्या वेळी त्याचे म्हणणे मांडण्यास पूर्ण वाव मिळून अन्याय झाल्याची भावना निर्माण होणार नाही व माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची अंमलबजावणी अधिनियमातील तरतुदीनुसार राज्यभरात काटेकोरपणे होईल.

हे परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाइटवर संगणक संकेतांक २००७१२१२१६४१५८००१ वर प्रसिद्ध करण्यात आलेले आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशाने व नावाने,

स्वाक्षरी/-

टी. एफ. थेक्केकरा

शासनाच्या प्रधान सचिव

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत प्राप्त अर्ज / अपिले विहित मुदतीत निकालात काढण्याबाबत.

[46]

महाराष्ट्र शासन

सामान्य प्रशासन विभाग,

शासन परिपत्रक क्रमांक - केंमाअर्ज - २००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६

मंत्रालय, मुंबई - ४०००३२ दिनांक : ३१ मार्च २००८

पहा: १) माहितीचा अधिकारी अधिनियम, २००५, दिनांक २२.१२.२००५

२) शासन अधिसूचना क्र. आरटीआय - २००५/सी/आर.३१५/०५/०५/दि.११/१०/२००५

३) शासन परिपत्रक क्र. केंमाअ-२००७/११८२/प्र.क्र६५/०७/०६/(मा.अ)दि. १२/१२/२००७

## परिपत्रक

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ हा राज्यात दिनांक १२/१०/२००५ पासून लागू झाला असून, अधिनियमांतर्गत प्राप्त झालेल्या अर्जांना जन माहिती अधिकाऱ्यांकडून विहित मुदतीत उत्तर दिले जात नाही, तसेच अधिनियमांतर्गत प्राप्त झालेल्या अपिलांची सुनावणी अपीलीय प्राधिकारी विहित मुदतीत घेत नाहीत, अशा प्रकारच्या तक्रारी नागरिकांकडून प्राप्त होत आहेत.

२. या अनुषंगाने असे पुन: प्रसारित करण्यात येते, की माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत प्राप्त झालेला अर्ज त्या प्राधिकरणाचा नसल्यास अधिनियमाच्या कलम ६ (३) अन्वये ५ दिवसांत योग्य प्राधिकरणाकडे हस्तांतरित करण्यात यावा. अधिनियमाच्या कलम ७(१) अन्वये कोणत्याही परिस्थितीत विनंती प्राप्त झाल्यापासून तीस दिवसांच्या आत, एकतर विहित करण्यात येईल अशा फीचे प्रदान केल्यावर माहिती देणे आवश्यक आहे अथवा कलम ८ व ९ च्या तरतुदीप्रमाणे नाकारणे बंधनकारक आहे. तसेच अधिनियमाच्या कलम १९ (१) किंवा कलम १९(२) अन्वये केलेले अपील ते मिळाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत किंवा दाखल केल्याच्या दिनांकापासून ४५ दिवसांत कारणे लेखी नमूद करून निकालात काढणे बंधनकारक आहे. अपिलावर निर्णय देताना उपरिनिर्दिष्ट दिनांक १२.१२.२००७ च्या परिपत्रकातील सूचनांचे अनुपालन करण्याची दक्षता घेणे आवश्यक आहे.

३. महाराष्ट्र शासनाने दिनांक ११/१०/२००५ रोजी प्रसारित केलेल्या अधिसूचनेच्या कलम ३ नुसार माहितीच्या अर्जासोबत सार्वजनिक प्राधिकरणाला देय असलेली फी रोख रकमेच्या स्वरूपात तिची योग्य पावती देऊन किंवा दर्शनी धनाकर्ष किंवा बँकेच्या धनादेशाद्वारे किंवा त्यांवर १० रुपयांचा न्यायालय फी मुद्रांक याद्वारे स्वीकारण्यात येईल. तसेच अधिनियमातील कलम ७ (१) अन्वये आकारावयाचे जादा शुल्क रोख स्वरूपात (योग्य ती पावती देऊन) किंवा दर्शनी धनाकर्ष किंवा बँकेच्या धनादेश किंवा मनीऑर्डर याद्वारे स्वीकारण्यात यावे.

४. वरील कार्यपद्धतीचे अनुपाल न करता अर्जदारास / अपीलकर्त्यांना त्रास होईल अशी कार्यवाही करणाऱ्या अधिकाऱ्यांविरुद्ध संबंधित कार्यालय प्रमुखांनी त्वरित शिस्तभंगाची कार्यवाही सुरू करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

स्वाक्षरी/-

न. म. शिंदे

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक : केंमाअ-२००६/११०२/प्र.क्र. ४४/०७/५
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २१.०५.२००७

पहा :- सा.प्र.वि.शा.प.क्र. केंमाअ-२००५/प्र.क्र.४३०/०५/५, दि. २०.०१.२००६

परिपत्रक

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम २५ मधील तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाला या अधिनियमाच्या प्रत्येक वर्षातील अंमलबजावणीबाबतचा अहवाल तयार करण्याकरिता या अधिनियमाच्या अंमलबजावणीसंदर्भातील विविध बाबींवरील माहिती विहित विवरणपत्रात दरमहा या विभागाकडे पाठविण्याबाबत सर्व मंत्रालयीन विभागांना उपरोक्त नमूद दि. २०.०१.२००६ च्या परिपत्रकान्वये सूचना देण्यात आल्या आहेत. सदर शासन परिपत्रकातील विवरणपत्र-३ हे प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्यांकडून कसूरदार जन माहिती अधिकाऱ्यांविरुद्ध करण्यात आलेल्या दंडात्मक कारवाईची माहिती देण्याबाबत आहे. त्यानुसार विविध मंत्रालयीन विभागांकडून प्राप्त झालेल्या या विवरणपत्र-३ मधील माहितीचे अवलोकन केले असता काही प्रकरणी प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्यांनी संबंधित जन माहिती अधिकाऱ्यांविरुद्ध दंडात्मक कारवाई केली असल्याचे दिसून आले आहे.

२. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदींनुसार कसूरदार जन माहिती अधिकाऱ्यांविरुद्ध दंडात्मक कारवाई करण्याचे व संबंधित अधिकाऱ्याविरुद्ध शिस्तभंगविषयक कारवाईची शिफारस करण्याचे सर्व अधिकार राज्य माहिती आयोगास प्रदान करण्यात आले आहेत. त्यामुळे या अधिनियमांतर्गत एखाद्या जन माहिती अधिकाऱ्यांविरुद्ध प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याने दंडात्मक कारवाई करण्याचे किंवा शिस्तभंग विषयक कारवाई करण्याचे आदेश पारित करण्याची बाब या अधिनियमातील तरतुदींशी विसंगत आहे, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

३. तसेच उपरोक्त नमूद केल्यानुसार दंडात्मक कारवाईचे सर्व अधिकार माहिती आयोगास असल्याने दि. २०.०१.२००६ च्या शासन परिपत्रकासोबतचे विवरणपत्र-३ रद्द करण्यात येत असून या विवरणपत्र-३ मध्ये आता या विभागाकडे माहिती पाठविण्याची आवश्यकता नाही, याचीही संबंधितांनी कृपया नोंद घ्यावी.

४. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाइटवर प्रसिद्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २००७०५३१११२५४०००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

स्वाक्षरी/-
(ज. व. दिवाण)
शासनाचे सह सचिव.

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(१) अन्वये [illegible]
[illegible]

महाराष्ट्र शासन [48]

शासन परिपत्रक क्र. केमाअ- २००७/११८२/प्र.क्र.६५/०७/६(मा.अ)

सामान्य प्रशासन विभाग,

मंत्रालय, मुंबई - ४०००३२

दिनांक : ६ नोव्हेंबर २००७

परिपत्रक

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये माहिती अधिकाऱ्यांनी एक महिन्यात अर्जदारास माहीती पुरविणे आवश्यक आहे. पुरविलेल्या माहितीसंदर्भात अर्जदार असमाधानी असल्यास तो प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्यांकडे अपील दाखल करू शकतो व त्यावर प्रथम अपील प्राधिकाऱ्याने सर्वसाधारण परिस्थितीत ३० दिवसात व अपवादात्मक परिस्थितीत ४५ दिवसात निर्णय घेणे आवश्यक आहे. प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्यांच्या निर्णयामुळे अर्जदाराचे समाधान झाले नसल्यास कलम १९(१) अन्वये तो मुख्य आयुक्त, राज्य माहिती आयोग यांच्याकडे द्वितीय अपील करू शकतो.

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील उपरोक्त तरतुदीच्या अनुषंगाने राज्य माहिती आयोगाने शासनाच्या असे निदर्शनास आणून दिले आहे, की जवळ जवळ ४५ टक्के प्रकरणांवर प्रथम अपीलीय प्राधिकारी अर्जदारांची अपिले निकाली काढताना आदेश पारित करीत नाहीत, किंवा आदेश पारित केले असल्यास ते पारित करण्यापूर्वी संबंधित अर्जदारास सुनावणीची संधी देत नाहीत, अशा प्रकारे प्रथम अपीलीय प्राधिकारी या अधिनियमान्वये त्यांच्यावर सोपविण्यात आलेली जबाबदारी योग्यरीतीने पार पाडीत नाहीत. पर्यायाने अर्जदाराच्या हालअपेष्टांत भर पडत असून त्यांना यथोचित न्याय मिळत नाही. त्याचबरोबर त्यांच्या या वर्तणुकीमुळे राज्य माहिती आयोगाकडे दाखल होणाऱ्या द्वितीय अपिलांच्या अनुषंगाने त्यांच्याही कामकाजात अनावश्यकपणे वाढ होत आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत राज्य शासनाकडील विविध मंत्रालयीन विभागांकडे व त्यांच्या अधिपत्याखालील क्षेत्रीय प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्यांकडे दाखल होणारी प्रथम अपिले ही समन्यायिक (quasi-judicial) स्वरूपाची असून, प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्यांनी या अनुषंगाने नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वांचे पालन करणे क्रमप्राप्त ठरते. म्हणून प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्यांनी अर्जदारास त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देऊन प्रकरण निकाली काढणे आवश्यक असते.

वरील पार्श्वभूमी लक्षात घेता सर्व मंत्रालयीन विभागांनी तसेच सर्व मंत्रालयीन विभागांच्या अधिपत्याखालील सर्व प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांनी त्यांच्याकडील प्रथम अपिलांवर विहित मुदतीत अर्जदारास त्याचे म्हणणे मांडण्याची संधी मिळण्याकरिता त्यांची सुनावणी घेऊन आवश्यक ते आदेश पारित करावेत, जेणेकरून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची अंमलबजावणी अधिनियमातील तरतुदीनुसार राज्यभरात कार्यक्षमरित्या होईल.

हे परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर संगणक संकेतांक २००७११०६१३२४११००१ वर प्रसिद्ध करण्यात आलेले आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशाने व नावाने,

स्वाक्षरी/-

टी.एफ. थेकेकरा

शासनाच्या प्रधान सचिव

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ बाबत प्राप्त होणाऱ्या पत्रांच्या तसेच अहवालांच्या**
**[illegible] अनावश्यक प्रती पाठविण्याबाबत [illegible]**

[51]

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक क्र. केमाअ-२००८/१२६४/प्र.क्र. ४३७/०८/सहा,
दिनांक : १३/५/२००९

परिपत्रक

राज्यामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ दिनांक १२ ऑक्टोबर, २००५ अमलात आला आहे. हा अधिनियम केंद्राचा असून, या अधिनियमाच्या अंमलबजावणीचे समन्वयन / संनियंत्रण करण्याच्या दृष्टीने सर्व मंत्रालयीन विभागांकडून विविध नियतकालिक / प्रासंगिक अहवाल या विभागामार्फत मागविले जातात. सर्व क्षेत्रीय कार्यालयांनी विहित पद्धतीनुसार त्यांची माहिती संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागाकडे पाठविणे व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनी ती संकलित स्वरूपात या विभागास पाठविणे आवश्यक आहे. याव्यतिरिक्त, कलम-६ अंतर्गत सार्वजनिक प्राधिकरणांकडे प्राप्त होणारे अर्ज त्यांनी त्यांच्या स्तरावरच निकाली काढणे आवश्यक आहे. मात्र, शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, बऱ्याच क्षेत्रीय कार्यालयांकडून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ याबाबतचे विविध अहवाल व पत्रांच्या प्रती अनावश्यकरीत्या सामान्य प्रशासन विभागास पृष्ठांकित केल्या जातात. त्यामुळे मनुष्यबळ, स्टेशनरी, कार्यालयीन वेळ तसेच टपालखर्च इत्यादी उपलब्ध मर्यादित संसाधनांवर अनावश्यक ताण पडतो. त्याचप्रमाणे शासनाकडे अनावश्यकरीत्या प्राप्त होणाऱ्या पत्रव्यवहारामुळे महत्त्वाच्या टपालाकडे दुर्लक्ष होऊ शकते.

सबब, या विभागामार्फत विनिर्दिष्टपणे मागविण्यात येणाऱ्या अहवालांव्यतिरिक्त, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ बाबतचे अहवाल तसेच पत्रव्यवहाराच्या प्रती या विभागास अनावश्यकरीत्या पाठविण्यात येणार नाहीत याची सर्व क्षेत्रीय कार्यालयांनी दक्षता घ्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

स्वाक्षरी/-
मं. ग. शिंदे
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**माहितीच्या अधिकारासंदर्भात अर्जदाराशी केल्या जाणाऱ्या पत्रव्यवहारावर कार्यालयाचा दूरध्वनी क्रमांक, फॅक्स क्रमांक, ई-मेल आयडी इत्यादी नमूद करण्याबाबत.**

[50]

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक क्र. केमाअ-२००८/८७०/प्र.क्र.३००/०८/सहा,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : १३/५/२००९.

परिपत्रक :-

माहिती अधिकारासंदर्भात अर्जदाराशी केल्या जाणाऱ्या पत्रव्यवहारावर कार्यालयाचा, जन माहिती अधिकाऱ्यांचा पूर्ण पत्ता, दूरध्वनी क्रमांक, उपलब्ध असल्यांस, फॅक्स क्रमांक, ई-मेल आयडी इत्यादी बाबी नमूद केलेल्या नसल्याने अर्जदारांना अनेक अडचणी उद्‌भवतात; असे निदर्शनास आले आहे. त्यामुळे सर्व सार्वजनिक प्राधिकरणांनी माहितीचा अधिकार व इतरही सर्वसाधारण बाबींसंदर्भात केल्या जाणाऱ्या पत्रव्यवहारावर संबंधित कार्यालयाचा, जन माहिती अधिकाऱ्यांचा पूर्ण पत्ता, दूरध्वनी क्रमांक, ई-मेल आयडी इत्यादी बाबी नमूद करण्याची दक्षता घ्यावी, जेणेकरून अर्जदारांना संबंधितांशी योग्य व जलद पद्धतीने संपर्क साधणे शक्य होईल, तसेच अनावश्यक पत्रव्यवहार व उपलब्ध मर्यादित संसाधनावर पडणारा ताण टाळण्याचेही सार्वजनिक प्राधिकरणांना शक्य होईल.

माहितीच्या अधिकारासंदर्भात देय असलेले शुल्क रोख रकमेच्या स्वरूपात / बँकेचा धनादेश किंवा मनीऑर्डरच्या स्वरूपात भरण्याबाबत अर्जदारांना सूचना देणाऱ्या पत्रव्यवहारामध्ये सदर रकम अथवा मनीऑर्डर कोणाच्या नावे पाठवावी, चलनाद्वारे रकम भरावयाची असल्यास बँकेचा तपशील व लेखाशीर्ष याचाही स्पष्ट उल्लेख सर्व सार्वजनिक प्राधिकरणांनी त्यांच्या पत्रव्यवहारामध्ये करण्याची दक्षता घ्यावी याव्यतिरिक्त पत्रव्यवहारातील भाषा सौजन्यपूर्वक तसेच अर्जदारांना मार्गदर्शक ठरेल अशीच ठेवण्याच्या अध्याहृत तत्त्वाचीही काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

स्वाक्षरी/-
नं. म. शिंदे
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत माहिती मागविणाऱ्या अर्जदारांना माहिती उपलब्ध करून देण्याबाबत. [52]

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन परिपत्रक क्र.संकिर्ण २०१५/प्र.क्र.(२७६/१५)सहा.
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक: ११.१२.२०१५.

परिपत्रक

माहिती अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत माहिती मागविणाऱ्या अर्जदारांना वेगवेगळ्या सार्वजनिक प्राधिकरणांकडून वेगवेगळ्या नमुन्यात माहिती उपलब्ध करून देण्यात येते. माहितीचे स्वरूप सर्वत्र वेगवेगळे असल्याने आणि सार्वजनिक प्राधिकरणासाठी त्यांबाबत विहित नमुना तयार करणे शक्य नसल्याने सार्वजनिक प्राधिकरणाने माहिती उपलब्ध करून देताना त्यामध्ये कोणकोणत्या बाबी समाविष्ट असाव्यात याबाबत स्पष्टता करणारे परिपत्रक केंद्रशासनाच्या परिपत्रक क्र. १०/१/२०१३-आयं आर दि. ६.१०.२०१५ अन्वये निर्गमित करण्यात आल्या असून त्यातील सर्व बाबी संबंधितांच्या निदर्शनास आणण्याचे सूचित करण्यात आले आहे. या अनुषंगाने सर्व विभागांना सूचित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. तदनुसार शासन पुढीलप्रमाणे सूचित करीत आहे.

२. माहिती अधिकार अधिनियम, २००५ अन्वये माहिती उपलब्ध करून देताना त्यामध्ये सर्वसाधारणपणे खालील बाबी समाविष्ट असाव्यात.

१) माहिती अधिकार अधिनियम, २००५ अन्वये प्राप्त झालेल्या माहिती अधिकार अर्जाचा क्रमांक व दिनांक आणि संबंधीत सार्वजनिक प्राधिकरणात सदर अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक

२) संबंधित जन माहिती अधिकाऱ्याचे नाव, पदनाम, पत्ता, अधिकृत दुरध्वनी क्रमांक आणि ई-मेल नमूद करण्यात यावा.

३) मागणी केलेली माहिती नाकारण्यात आलेली असल्यास, माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे संबंधीत कलम उधृत करण्यासह माहिती नाकारण्याची सविस्तर कारणमीमांसा नमूद करावी.

४) माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६(३) अन्वये माहिती अधिकार अर्ज अन्य सार्वजनिक प्राधिकरणाकडे हस्तांतरित करण्यात येत असल्यास, ज्या सार्वजनिक प्राधिकरणाकडे सदर अर्ज हस्तांतरित करण्यात येणार आहे त्या प्राधिकरणाची सविस्तर माहिती नमूद करावी.